सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, १९ ऑगस्ट २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २८० | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



सेवा म्हणजे केवळ दानधर्म नव्हे, ती एक साधना आहे. सेवा हेच संघाचे खरे साध्य आहे.

- कृ. सूर्यनारायण राव
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. सेवा प्रमुख

# मुंबईसह राज्यभरात मुसळधार!

**लोकल सेवा थंडावली | १६ जिल्ह्यात पुरस्थिती | अनेक घरांची पडझड**

**तभा वृत्तसेवा | जमीर काझी**
**मुंबई, दि. १८ ऑगस्ट:**

गेल्या दोन दिवसापासून मुंबईसह राज्यातील बहुताश जिल्ह्यात पावसाने थैमान घातले आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून अनेक ठिकाणी पुरस्थिती उदभवली आहे. मुसळधार पाऊस सुरू असून पुढील ४८ तास मुंबईकरांसाठी अति धोक्याची आहेत. यामुळे नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

आज सकाळी सात वाजण्याच्या आत ४८ तासात २०० मिलीमिटर पावसाची नोंद झाली. सकाळी सहा ते आठ या दोन तासात तब्बल १७०० मिली मिटर पाऊस झाला असून सर्वाधिक पाऊस हा चेंबूर भागात झाला.मुंबई शहर आणि पूर्व उपनगरात अधिक पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे या पावसातही मुंबईत अनेक ठिकाणी पाणी साचलं आहे. मुंबईत विविध १४ ठिकाणी पाणी साचले. त्यामध्ये अंधेरी, वडाळा, चुनाभट्टी, परळ, अंधेरी सब-वे, कुर्ला या ठिकाणी पाणी साचले आहे. पाणी साचल्यामुळे फक्त दोन ठिकाणचे ट्रॅफिक थांबवण्यात आलं आहे. बाकी संपूर्ण शहरात दळणवळण व्यवस्था कोलमडली. वाहनाच्या लांबवर रांगा लागून राहिल्या.

रस्ते वाहतुकी प्रमाणेच मुंबई लोकलसेवेवरही पावसाचा मोठा परिणाम झाला. मध्य, हार्बर व पश्चिम या तिन्ही मार्गावरील अनेक रेल्वे स्टेशनच्या छत्रीवर पाणी जमा झाले होते. त्यामुळे त्या सुमारे २५ ते ४० मिनटे उशिरा धावत होत्या. त्यामुळे चाकरमान्या मुंबईकरांचे मोठे हाल झाले. दरम्यान डॉपलरने दिलेल्या माहिती नुसार मुंबईत १० ते १२ तास तिव्र पाऊस होणार आहे. त्यामुळे रेड अलर्ट देण्यात आला आहे. आज शाळांना सुट्टी देण्यात आली आहे.



तर कर्मचाऱ्यांना चारनंतर घरी जाण्याची मुभा देण्यात आली आहे असं ही त्यांनी सांगितलं. नवी मुंबईत पाऊस सुरू असून सखल भागात पाणी साचले आहे. मुंबईत संततधार पावसामुळे चुनाभट्टी रेल्वे स्टेशन, समर्थ नगर, भक्ती धाम रोड, धावजी केणी मार्ग, भाजी मार्केट, वि.एन. पूर्व मार्ग, स्वदेशी मिल कामगाराच्या घरात पावसाचे पाणी साचले आहे. पालघर जिल्ह्यातील पश्चिम किनारपट्टी भागातील तारापूर चिंचणी भागात जोरदार पावसाच्या सरी बरसत आहेत. पालघर जिल्ह्यातील भात रोपण्या पूर्ण झाल्या असून भात पिकांना उभारी देणारा पाऊस सध्या पडत असल्याने शेतकऱ्यांकडून समाधान व्यक्त होत आहे. मुंबईतील वीरा देसाई येथील रस्ते पाण्याखाली गेले आहेत.

अंधेरी पश्चिमेकडील वीरा देसाई कंट्री क्लबसमोरील रस्त्यावर पाणी साचले आहे. संपूर्ण रस्ता पाण्यात बुडाला आहे. सकाळपासून पावसाचा फटका ठाणे ते बोरीवली, मिरा रोड, वसई,गुजरात महामार्गावरती जाणाऱ्या वाहनांना बसला आहे. गायमुख घाटानंतर आणि वर्सोवा ब्रिजच्या अलीकडे छोट्या-मोठ्या गावाच्या बाहेर रस्त्यावर पाणी साचाले आहे. करपे कंपाऊंडच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याचे चित्र दिसत आहे. वाहतूक विभागाकडून पाण्यात अडकलेल्या रिक्षा असेल इतर वाहना काढण्याचे काम सुरू आहे. ज्या रस्त्यावरती खड्डा आहे त्या ठिकाणी वाहतूक विभाग पोलीस कर्मचारी उभे आहेत जेणेकरून कुठलीही गाडी त्या खड्ड्यातून जाता कामा नये, याची काळजी वाहतूक विभाग घेत आहे. या डोंगराळ आणि खाडी किनारी भागात पाऊस पडत आहे.

पालघर, सिंधुदुर्गला ऑरेंज अलर्ट बाकी कोकणातील ठिकाणी रेड अलर्ट देण्यात आलाय. मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी आणि नाशिकच्या घाट परिसरासाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. यासोबतच मच्छिमारांना समुद्रात न जाण्याचा इशारा देखील देण्यात आलाय.मध्य रेल्वेची लोकल सेवा विस्कळीत झाली आहे. लोकल गाड्या थांबवण्यात आल्या आहेत. सायन माटुंगा दरम्यान लोकल गाड्या थांबल्या आहेत. चाकरमानी माटुंगा हून रेल्वे ट्रॅक वर चालत दादर स्थानक गाठत आहे.

### पावसाचा जोर वाढला

मागील दोन ते तीन दिवसांपासून पावसाचा जोर राज्यात वाढला आहे. भारतीय हवामान विभागाकडून आता मुंबईमध्ये मोठा अलर्ट देण्यात आलाय. मुंबईसाठी पुढील ४८ तास धोक्याची आहेत. मुंबईमध्ये ४८ तासांसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. यामुळे नागरिकांनी अति महत्वाचे काम असल्याशिवाय शक्यतो घराबाहेर पडणे टाळा. अनेक ठिकाणी लोकांच्या घरात पाणी शिरले असून रस्त्यांना नद्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. मुंबईतील शाळा आणि महाविद्यालयांना सुट्ट्या जाहीर करण्यात आल्या आहेत.

# पंढरपूर कॉरिडॉरसाठी ऑक्टोबरपासून भूसंपादन

- दुकानांसाठी ४० हजार तर घरांसाठी २२ हजार प्रती चौ.फू. दराचे नियोजन
- एमआयडीसी अधिकाऱ्यांची बैठक घेवून आयटी पार्कसाठी शासकीय जमीन
- बोरामणी विमानतळासाठी वनखात्यास पर्यायी जागेचा प्रस्ताव
- जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची पत्रकार परिषदेत माहिती

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

पंढरपूर कॉरिडॉरसाठी लवकरच येत्या आक्टोंबरपासून भूसंपादन करण्याचे नियोजन असून यात बाधित होणाऱ्या दुकानांसाठी ४० हजार रुयपे प्रती चौरस फूट आणि घरांसाठी २० ते २२ हजार रुयपे प्रती चौरस फूटइतका मोठा मोबदला देण्याचे विचाराधीन आहे. सोलापुरात आयटी पार्कसाठी जागा देण्यासाठी एमआयडीसीचे काय निकष यासाठी अधिकाऱ्यांची बैठक घेवून शासकीय जागा दिली जाईल, असे जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी पत्रकार परिषदेद्वारे सांगितले.



नुकतेच सोलापूर दौऱ्यावर आलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीरपणे भाषणात पालकमंत्र्यांसह प्रशासनाला सांगितले होते की, सोलापुरात आयटी पार्कसाठी योग्य ती जागा द्यावी. मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर जिल्हाधिकारी कार्यालय कामास लागले असून एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांसोबत निकषाबाबत बैठक घेवून आयटी पार्कसाठी शासकीय जमीन देणार आहे. कारण खासगी जमीन घ्यावयाची झाल्यास भूसंपादन करावे लागेल आणि त्यासाठी सहा महिन्यांचा कालावधी जाईल.

पंढरपूर येथे विठ्ठल मंदिरासमोर ५५० मीटर लांब आणि १३० मीटर रुंद असा कॉरिडॉर करण्यासाठीची प्रक्रिया सुरु असून येत्या आक्टोंबरपासून भूसंपादनाचे नियोजन आहे. त्यासाठी ६४२ कुटुंब म्हणजेच तीन हजार लोक बाधित होणार असून बाधित होणाऱ्या मिळकतदारांना चांगला मोबदला दिला जाणार आहे. दुकानांसाठी ४० हजार रुयपे प्रती चौरस फूट आणि घरांसाठी २० ते २२ हजार रुयपे प्रती चौरस फूट इतका मोठा मोबदला देण्याचे नियोजन असल्याचेही जिल्हाधिकारी आशिर्वाद यांनी सांगितले. होळकर आणि शिंदे वाड्याचे जतन करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. सात मंडलात अतिवृष्टी झाली असून याठिकाणच्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली जाणार आहे. याठिकाणी पंचनामे सुरु असून ३२ हजार शेतकरी बाधित असून लवकरच मदत शासनाकडून दिली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### सोलापूर-धाराशिव रेल्वे भूसंपादनासाठी १४१ कोटींचा अतिरिक्त मोबदला

सोलापूर-धाराशिव रेल्वे भूसंपादनात सुमारे १४१ कोटी रुपयांचा अतिरिक्त मोबदला मिळाला असून, यातील काही रक्कम वाटप करण्यात आली आहे. याबाबत चौकशी समितीकडून प्राप्त झालेला अहवाल राज्य शासनाच्या प्रधान सचिव यांच्याकडे पाठविण्यात आला असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिली.


### बोरामणी विमानतळासाठी वनखात्यास पर्यायी जागा देण्याचा प्रस्ताव

बोरामणी येथील आंतरराष्ट्रीय विमानतळावर ३३ हेक्टर जागा वनखात्याची आहे. ही जागा नेमकी नियोजित रनवेवर येत आहे. त्यामुळे याठिकाणी असलेल्या ३३ हेक्टर जमिनीच्या बदल्यात याच ठिकाणी असलेली महाराष्ट्र शासनाची जमीन वन खात्यास देण्याचा दुसऱ्यांदा प्रस्ताव वनखात्याकडे मुख्यमंत्री यांच्या सूचनेनुसार येत्या तीन दिवसात पाठविण्यात येत असल्याचेही जिल्हाधिकारी यांनी यावेळी सांगितले.

## महत्त्वाचे

### जीएसटी सुधारणांच्या घोषणेमुळे बाजारांत तेजी

**मुंबई** : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्यातील बैठकीनंतर तेल पुरवठ्याबाबत कमी झालेली चिंता आणि पंतप्रधान मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी केलेल्या जीएसटी प्रणालीत सुधारणा घोषणेचे शेअर बाजाराने सोमवारी जोरदार स्वागत झाले. सुरुवातीला सेन्सेक्स १,१०० अंकांची वाढ नोंदवली. त्यानंतर सेन्सेक्स ६७६ अंकांच्या वाढीसह ८१,२७३ वर स्थिरावला. निफ्टी २४५ अंकांनी वाढून २४,८७६ वर बंद झाला. आजच्या सत्रात ऑटो, ग्राहकोपयोगी सेक्टरमध्ये खरेदीचा जोर अधिक दिसून आला. आयटी वगळता इतर सर्व सेक्टर्स हिरव्या रंगात बंद झाले. ट्रम्प-पुतिन यांच्यात बैठक, जीएसटी प्रणालीत होणाऱ्या सुधारणा, आशियाई बाजाराती तेजीच्या बळावर शेअर बाजारांत तेजी आली.



### दिल्लीत ३२ शाळांना बॉम्बची धमकी

**नवी दिल्ली** : राजधानीतील ३२ शाळांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आल्याने पोलिस आणि प्रशासनाची तारांबळ उडाली. यामुळे पालकांमध्ये दहशत निर्माण झाली. दिल्ली अग्निशमन विभागाच्या कार्यालयात धमकीचे ईमेल प्राप्त होताच पोलिस आणि बॉम्बशोध पथक घटनास्थळी रवाना करण्यात आले. शाळांची तपासणी केली असता फेक कॉल्स असल्याचे उघड झाले. पोलिसांनी अज्ञाताविरोधात गुन्हे दाखल करीत तपास सुरू केला आहे.

### अमेझॉनने देशभरात दीड लाखांवर दिला रोजगार

**मुंबई** : आगामी उत्सवाच्या काळात लाखो ग्राहकांना सेवा देण्यासाठी अमेझॉन इंडियाने त्यांच्या फुलफिलमेंट सेंटर्स, सॉर्ट सेंटर्स आणि लास्ट माईल डिलिव्हरी स्टेशन्समध्ये १,५०,००० हून अधिक तात्पुरत्या नोकऱ्या निर्माण केल्या आहेत. यात मुंबई, दिल्ली, पुणे, बंगळुरू, हैदराबाद, लखनौ, कोचीन, कोईम्बतूर, इंदूर, रायपूर, जालंधर, जोधपूर, रांची, अनंतनाग, जळगाव आणि इतर अनेक शहरांसह ४०० वर शहरांमध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष नोकऱ्यांचा समावेश आहे. अमेझॉनने त्यांच्या नेटवर्कमध्ये हजारो महिला आणि दोन हजारांवर दिव्यांगांना ही संधी दिली आहे.

# परस्परांच्या यशात योगदान देऊ शकतात भारत-चीन

## वांग यी यांचे जयशंकर यांच्या भेटीनंतर वक्तव्य

**नवी दिल्ली, १८ ऑगस्ट**

अमेरिकेसोबत सुरू असलेल्या व्यापार शुल्क युद्धामुळे भारत आणि चीनमधील संबंध पुन्हा सुरळीत होत आहेत. सध्या चीनचे परराष्ट्र व्यवहार मंत्री वांग यी भारताच्या दौऱ्यावर असून, परस्परांच्या यशात भारत-चीन योगदान देऊ शकतात, असे वक्तव्य त्यांनी एस. जयशंकर यांची भेट घेतल्यानंतर केले.

जयशंकर यांच्यासोबत झालेल्या बैठकीत दोन्ही नेत्यांनी सीमावाद, द्विपक्षीय संबंधांवर चर्चा केली. दोन्ही देशांचे संबंध सध्या खराब असले, तरी भारत आणि चीनला ते सुधरवायचे आहेत, असे जयशंकर यांनी म्हटले. आम्ही सीमावर्ती भागात सौहार्द कायम ठेवले आहे, असे वांग यी म्हणाले. वांग यी येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांचीही भेट घेणार आहेत. दहशतवादाच्या सर्वच प्रकार आणि अभिव्यक्तींच्या विरोधात लढाईला आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. आपल्या विचारांचे आदान-प्रदान करण्याची मी प्रतीक्षा करीत आहे, असे वांग यी म्हणाले. (वृत्तसंस्था)



## पुतिन-मोदी यांच्यात चर्चा

**नवी दिल्ली, १८ ऑगस्ट**

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत दूरध्वनीवर चर्चा केली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबत मागील आठवड्यात अलास्का येते झालेल्या चर्चेची माहिती त्यांनी मोदींना दिली.

नरेंद्र मोदी यांनी पुतिन यांचे आभार मानत रशिया-युक्रेन युद्धावर शांततेच्या मार्गाने तोडगा काढण्याच्या भारताच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. कूटनीती आणि चर्चेच्या माध्यमातून तोडगा काढण्यात यावा, यावर भर देताना, भारताचे या दिशेने होणाऱ्या प्रयत्नांना समर्थन आहे, असे मोदी यांनी सांगितले.

दोन्ही नेत्यांनी भारत आणि रशियातील विशेष आणि विशेषाधिकार प्राप्त धोरणात्मक भागीदारी आणखी बळकट करण्यासाठी द्विपक्षीय सहकार्याच्या कित्येक मुद्यांवरही चर्चा केली. (वृत्तसंस्था)


# रघुजी राजे भोसले यांची तलवार मुंबईत दाखल

### प्रतीक्षा संपली

**मुंबई, १८ ऑगस्ट**

लंडनमधील लिलावात महाराष्ट्र सरकारने नुकतीच खरेदी केलेली प्रसिद्ध मराठा सेनापती श्रीमंत रघुजी राजे भोसले यांची प्रतिष्ठित तलवार सोमवारी सकाळी मुंबईत दाखल झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारताचा वारसा पुनर्संचयित करण्याचा हा प्रयत्न असल्याचे सांगत या घडामोडीचे कौतुक केले.

सकाळी १० वाजता छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर विमानाने तलवार आणली गेली आणि सुरक्षिततेसाठी प्रभादेवी परिसरातील पी. एल. देशपांडे अकादमीमध्ये हलवण्यात आली, अशी माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी दिली.



मुसळधार पाऊस आणि वाहतूक कोंडीमुळे तलवारीला सुरक्षित ठेवण्यासाठी नियोजित बाईक रॅली रद्द करण्यात आली.

तलवारीच्या परतीसह राज्य आपल्या इतिहासाशी आणि वारशाशी पुन्हा जोडले जात आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. या शस्त्राला मराठा साम्राज्याचे प्रतीक म्हणत फडणवीस यांनी सांगितले की, ही तलवार आमच्याकडून एक प्रकारे लुटली गेली होती आणि आता ती पुन्हा महाराष्ट्रात आली आहे. तलवारीच्या लिलावाची माहिती मिळताच राज्य सरकारने किती तत्परतेने कारवाई केली, याची आठवण त्यांनी करून दिली.

आशिष शेलार यांना दोन दिवसांत महाराष्ट्र सरकारच्या वतीने एक खरेदीदार सापडला आणि सोमवारी त्या व्यक्तीने तलवारीसाठी बोली लावली. आम्हाला वाटले होते की ही तलवार आम्हाला महागात पडेल. परंतु, आमच्या अपेक्षेच्या तुलनेत ती वाजवी दरात खरेदी करू शकलो. तथापि, अशा ऐतिहासिक तलवारीचे महत्त्व पैशांत मोजता येत नाही, असे फडणवीस म्हणाले. आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही भूतकाळात विदेशात गेलेल्या हजारो वस्तू परत आणल्या आहेत. हे आपल्या सर्वांसाठी एक स्वागतार्ह पाऊल आहे, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

## सुभांशु शुक्ला यांनी घेतली पंतप्रधान मोदी यांची भेट

**नवी दिल्ली** : ग्रुप कॅप्टन सुभांशु शुक्ला यांनी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरील (आयएसएस) ऐतिहासिक यशस्वी मोहिमेनंतर भारतात परतल्यानंतर सोमवारी नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. आयएसएसमध्ये प्रवास करणारे पहिले भारतीय ठरलेले ग्रुप कॅप्टन शुक्ला यांनी पंतप्रधानांना ॲक्सिओम-४ मिशन पॅच सादर केला आणि भेटीदरम्यान आयएसएसमधून घेतलेले पृथ्वीचे छायाचित्रे सामायिक केले. पंतप्रधान मोदींनी यापूर्वी ग्रुप कॅप्टन शुक्ला आयएसएसमध्ये असताना व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे त्यांच्याशी संवाद साधला होता, त्यांच्या कामगिरीचे कौतुक केले होते आणि भारताच्या अंतराळ कार्यक्रमासाठी त्याचे महत्त्व अधोरेखित केले होते.



# चपळगाववाडीत चार दिवसात २० शेळ्यांचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१८ ऑगस्ट**

तालुक्यातील चपळगाववाडी येथे लसीकरणाअभावी कोरोना सारखा पीपी साथीचे रोग मोठ्या प्रमाणात पसराल्याने चार दिवसात २० शेळ्या मृत्यूमुखी पडल्या आहेत. यामुळे तालुक्यात साथीच्या रोगाचा प्रसार झपाट्याने वाढत असल्याने पशू पालकांमध्ये घबराट निर्माण झाली आहे. जिल्हा परिषद प्रशासनाकडून कोणत्याच हालचाल सुरू नाही. याबाबत तात्काळ उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे.



चपळगाव मंडळातील बहुतेक गावात जनावराना नियमित लसीकरण न केल्याने कोरोनासारखा गंभीर पीपी रोगाची लागण झाली असून जनावरे या रोगांना बळी पडत आहेत. गेल्या मे आणि जून महिन्यात शेळयांना पीपीआर लसीकरण देणे गरजेचे असताना जिल्हा परिषद प्रशासनाकडून दिले नसल्याने अनेक गावात शेळया गंभीर रोगाने मृत्यूमुखी पडत आहेत. पीपीआर आणि लम्पी लसीकरण अद्यापही जनावराना देण्यात आलेले नाहीत. मुक्या जनावरांचे लसीकरण मोहीम उघडून वेळेत उपाययोजना होणे गरजेचे असून पशुसंवर्धन विभागाकडून पीपीआर आणि लम्पी लसीकरण सर्व जनावरे मृत्यू मुखी पडल्यावर चालू करणार का? असा सवाल पशू पालकामधून उपस्थित होत असून पशू पालकांमध्ये घबराट निर्माण झाली आहे. चपळगाववाडी येथील शेतकरी वनमाला शिवनिंगप्पा वंगे यांच्या २० शेळ्यांना कोरोना सारखा गंभीर पीपी रोग लागण झाले असून यापैकी चार शेळ्याची गाभण फेल तर तीन शेळ्यांचा मृत्यू झाला आहे. पशुपालक रासदबी सैपन नदाफ यांच्या २५ शेळयाना पीपी रोग लागण झाला असून १२ शेळ्यांचा मृत्यू झाला आहे. अंदव्वाबाई माणीक कारंडे यांच्या चार शेळ्यांना पीपी रोग लागण झाला असून दोन शेळ्यांचा मृत्यू झाला आहे. मृत्यू पावलेले पशुपालकाना जिल्हा परिषद प्रशासनाने किमान गाव भेट देऊन दिलासा देऊन वैधकीय मदत करण्याची आवश्यकता असताना कोणीही फिरकले नाहीत.

# केरळ बनणार देशातील पहिले महिला टुरिस्ट फ्रेंडली राज्य

## पर्यटनस्थळांवर चालक, गाईडपासून शेफपर्यंत सर्वत्र महिला



**तिरुवनन्तपुरम्, १८ ऑगस्ट**

टूर ऑपरेटर महिला, टुरिस्ट गाइड महिला, गेस्ट हाऊस-बोट हाऊस चालवणाऱ्या महिला, दुकानांत महिला, चालकापासून ते शेफपर्यंत सर्व महिलाच... लवकरच हे चित्र केरळच्या प्रत्येक पर्यटनस्थळावर दिसणार आहे.

केरळ देशातील पहिले महिला टुरिस्ट फ्रेंडली राज्य बनणार आहे.

एकट्याने वा समूहात पर्यटन करणाऱ्या महिलांना त्यामुळे असुरक्षित वाटणार नाही. कारण त्यांना सेवा देणाऱ्या बहुतांश महिलाच असतील. केरळ सप्टेंबरमध्ये 'तिचे पर्यटन' प्रकल्प सुरू करत आहे. त्यासाठी पर्यटनासाठी वेगळे धोरण आखले जाईल. त्याचा मसुदा तयार करण्यात आला आहे. तो रिस्पॉन्सिबल टुरिझ्म सोसायटी सप्टेंबरच्या आधी सरकारला सुपूर्द करणार आहे.

केरळला महिला सोलो ट्रॅव्हलर्सची पहिली पसंत बनवण्याची तयारी केली जात आहे. स्थानिक महिलांना शेफ, चालक, गाइडसारख्या पर्यटनाशी निगडित व्यवसायासाठी तयार केले जात आहे. पर्यटन केंद्र, दुकान, हॉटेल,



रेस्तराँ, होम स्टेसारख्या उद्योगांसाठी सरकार महिलांना बँकाकडून कर्ज देईल. १४० महिलांना पर्यटन मंत्रालय उद्योगासाठी आर्थिक मदत देत आहे. त्यासाठी पर्यटन मंत्रालयाने दीड कोटी रुपयेही मंजूर केले आहेत. त्यात होम स्टे आणि घरगुती जेवण यासारख्या उद्योगांवर लक्ष्य केंद्रित केले जाणार आहे. (वृत्तसंस्था)

### 'यूएन वुमन'च्या मदतीने १३ गावांत पायलट प्रोजेक्ट

राज्यभरात लागू करण्याआधी केरळ सरकारने युनायटेड नेशन्सची संस्था यूएन वुमनच्या सहकार्याने १३ गावांत पायलट प्रोजेक्ट सुरू केला. ऑक्टोबर २०२२ ला सुरू झालेला प्रोजेक्ट यशस्वी झाल्यानंतर आता संपूर्ण राज्यात लागू केला जाणार आहे. या प्रकल्पांतर्गत केरळच्या १४,००० आणि देशातील दुसऱ्या राज्यांच्या २१८८ महिला पर्यटक एकट्या वा समूहाने या गावांत पोहोचल्या.

### ७६ पर्यटनस्थळांवर महिला सुरक्षा, सुविधा तपासणी

या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी केरळच्या ७६ पर्यटनस्थळांवर सर्व्हे करण्यात आला. पाच ठिकाणी जेंडर ऑडिट करण्यात आले. तेथे येणाऱ्या महिलांची संख्या, मिळणाऱ्या सुविधा आणि सुविधा देणाऱ्या महिलांची संख्या आदींचा सर्व्हे करण्यात आला. या ठिकाणी त्यांना कोणत्या सुविधा पुरवल्या जातात हेही पाहिले गेले. आणखी १२ पर्यटनस्थळांवर जेंडर ऑडिट लवकरच होईल.६८ केंद्रांवर सुरक्षा ऑडिटही करण्यात आले आहे.

### मध्यप्रदेशात पोलिस भरती मंडळ स्थापन

**भोपाळ** : राज्यात पोलिस भरती मंडळ स्थापन करण्याचे आणि पोलिस, तुरुंग आणि शहर सुरक्षेतील शहीदांच्या विधवा आणि मुलांसाठी पदवीधर स्तरावरील जागांवर आरक्षण देण्याची घोषणा भोपाळ येथे झालेल्या राज्यस्तरीय पदक पुरस्कार समारंभात मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांनी केली. यावेळी त्यांनी राज्यात दरवर्षी ७५०० पोलिसांची भरती करणार असल्याचे सांगितले. सध्या पोलिस विभागाची भरती कर्मचारी निवड मंडळामार्फत केली जाते. मुख्यमंत्री मोहन यादव म्हणाले की, आपले पोलिस प्रचंड आव्हानांमध्येही आपली जबाबदारी पार पाडतात. सध्या पोलिस विभागाची भरती कर्मचारी निवड मंडळाद्वारे केली जाते, ज्याला थोडा वेळ लागतो.

# राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेची प्राथमिक फेरी २३ व २४ ऑगस्टला

### नाट्य परिषद करंडक स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मध्यवर्ती, मुंबई आयोजित 'नाट्य परिषद करंडक' या एकांकिका स्पर्धेची *सोलापूर केंद्रावरील प्राथमिक फेरी ही २३ व २४ ऑगस्टला होणार आहे, अशी माहिती अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा सोलापूरचे अध्यक्ष प्रकाश यलगुलवार यांनी दिली.

सोलापूर केंद्रासाठी नाट्य परिषद, सोलापूरचे सहकार्यवाह व मध्यवर्तीचे नियामक मंडळ सदस्य सुमित फुलमामडी हे केंद्रप्रमुख म्हणून काम पाहणार आहेत तर सोलापूर शाखेचे प्रमुख कार्यवाह प्रा.जोतिबा काटे,उपनगरीय शाखेचे इम्तियाज मालदार व महानगर शाखेचे संजय सावंत हे समन्वयक म्हणून काम पाहत आहेत. महाराष्ट्रातून या स्पर्धेला भरघोस प्रतिसाद मिळालेला असून राज्यातून सर्व केंद्र मिळून एकूण २५२ संघांनी या एकांकिका स्पर्धेत सहभाग नोंदविलेला आहे. सोलापूर केंद्राच्या वतीने सहभागी संघांसोबत दिनांक १५ ऑगस्ट सायंकाळी ५ वाजता मोदी येथील स्व. पद्माकर देव स्मृती सभागृहात सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी चिठ्ठी प्रक्रियेद्वारे प्राथमिक फेरीत सादर होणाऱ्या एकांकिकांच्या सादरीकरणाचा क्रम ठरविण्यात आला. सोलापूर केंद्रावरून या स्पर्धेत १४ संघ सहभागी झाले असून येत्या २३ व २४ ऑगस्टला *सकाळी ९ वाजल्यापासून ते रात्री ७ वाजेपर्यंत ह.दे. प्रशालेतील,मुळे सभागृहात ही प्राथमिक फेरी तालीम स्वरूपात होणार आहे. तरी नाट्य रसिकांनी या स्पर्धेचा आस्वाद घ्यावा असे आवाहन सोलापूर शाखेचे अध्यक्ष प्रकाश यलगुलवार यांनी केले आहे, तर नाट्य परिषद करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेची अंतिम फेरी दिनांक १५ सप्टेंबर ते १८ सप्टेंबर रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यसंकूल, माटुंगा मुंबई येथे होणार आहे.* अशी माहिती नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी दिली.

**प्राथमिक फेरीत सादर होणाऱ्या एकांकिका**

वैभव दीप नाट्य संस्था सोलापूर-प्रेम की यातना
भास्करानंदी चित्र सोलापूर-विधीलिखित
थिएटरकर, सोलापूर-खिच्याक
अस्तित्व मेकर्स फाउंडेशन, सोलापूर-चफी
नक्षत्र थिएटर सोलापूर-रसिक
भारतीय क्रीडा शिक्षण व नाट्य मंडळ सोलापूर- बेगम
रंगकर्मी बहुउद्देशीय संस्था,सोलापूर-जाहला सोहळा अनुपम
प्रयोगशाळा, सोलापूर-अल्पविराम
आनंदरंग कला मंच, सोलापूर-सांत्वन
व्ही.नायक थियेटर, सोलापूर-बी सायलेंट
सोहम थिएटर, हैदराबाद-काय झालं,बाळ रडत होतं?
विजयश्री बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी-मसणातलं सोनं
दलितमित्र कदम गुरुजी सायन्स कॉलेज,मंगळवेढा-मोक्ष
विश्वपंढरी कला संघ,पंढरपूर-मन मंदिरा



# आपत्तीत प्रशिक्षित व्यक्तींची भूमिका महत्त्वाची : शक्तीसागर ढोले

### बारा दिवसीय प्रशिक्षणात स्वयंसेवकांचा उत्स्फूर्त सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

नैसर्गिक अथवा मानवनिर्मित आपत्तीच्या काळात अडकलेल्या व्यक्तींचे बचाव कार्य करताना प्रशिक्षित व्यक्तींची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. योग्य माहिती, योग्य व्यक्तीला, योग्य वेळी पोहोचवणे हेच आपत्ती व्यवस्थापनाचे मूलभूत सूत्र आहे, असे प्रतिपादन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांनी केले.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग, सोलापूर यांच्या वतीने बारा दिवसीय 'आपदा मित्र-सखी' प्रशिक्षण आयोजित करण्यात आले असून, हे प्रशिक्षण आयटस स्पोर्ट्स सेफ्टी प्रायव्हेट लिमिटेड यांच्यामार्फत महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी, सोलापूर येथे सुरू आहे.

या प्रशिक्षणात होडी चालक-मालक, सामाजिक संस्था प्रतिनिधी, आशा वर्कर्स, महाविद्यालयीन युवक-युवती अशा विविध स्तरातील स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला आहे. प्रशिक्षणामध्ये आपत्तीची ओळख, आपत्तीचे प्रकार, उझठ, जखमींना सुरक्षित ठिकाणी हलवणे, स्ट्रेचर तयार करणे, प्राथमिक उपचार, प्रशासनाशी संपर्क, गर्दी नियंत्रण, पुरात बचाव कार्य, बोट हाताळणी, डोंगराळ भागातील बचावासाठी दोरीचा वापर, गाठी बांधणी यासारख्या विषयांवर मार्गदर्शन व प्रात्यक्षिके दिली जात आहेत. प्रशिक्षणाचे समन्वयन इंडियन रेस्क्यू ॲकॅडमीचे फैय्याज मुलाणी, प्रशिक्षक प्रशांत शेंडे, प्रदीप ऐनापुरे आणि मोनिका शिंपी हे करत आहेत. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या आपदा मित्र-सखी यांना प्रमाणपत्र व सुरक्षा कीट देण्यात येणार आहे.

## महत्त्वाचे...



## चतुरबाई श्राविका विद्यालयात स्वातंत्र्यदिन साजरा

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

चतुरबाई श्राविक विद्यालय व महावीर हायस्कूलमध्ये ७८ वा स्वातंत्र्य दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. प्रशालेचे माजी विद्यार्थी डॉ. सचिन कोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी आशिष गायकवाड, अनन्या गडकरी, प्रीती बनसोडे, बरे ओंकार, अंश काटकर, आर्या शेंडगे, माहेरा खान यांनी मनोगत व्यक्त केले. प्रज्ञा शोध परीक्षेत पात्र झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रमुख अतिथींच्या हस्ते ट्रॉफी आणि प्रशस्तिपत्रक देऊन गुणगौरव करण्यात आले. यावेळी प्रशालेतील सेवाज्येष्ठ शिक्षिका सुरेखा मरगुर यांचा सत्कार करण्यात आला. प्रशालेतर्फे मुलांना खाऊवाटप करण्यात आले. सूत्रसंचालन बसवराज बिराजदार यांनी केले.



## भारतीय जैन संघटनेतर्फे शैक्षणिक साहित्य वाटप

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

स्वातंत्र्य दिन व भारतीय जैन संघटनेचे संस्थापक शांतीलाल मुथ्था यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जैन संघटनेतर्फे ज्ञानोदय हायस्कूल मधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि खाऊवाटप करण्यात आला.अध्यक्षस्थानी ज्ञानोदय हायस्कूलचे मुख्याध्यापक आर. डी. पाटील सर होते. प्रमुख अतिथी म्हणून जैन संघटनेचे विभागीय उपाध्यक्ष अभिनंदन विभूते, जिल्हाध्यक्ष देशभुषण व्हसाळे, उपाध्यक्ष विक्रांत बशेट्टी, कोमल पाचोरे, हद्दवाढ अध्यक्ष अशोक भालेराव, श्रेणिक उपाध्ये, श्रीकांत नेजकर, आशुतोष तोंडसे उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन देशभूषण व्हसाळे यांनी केले.



## जनमंगल फाउंडेशनच्या आरोग्य तपासणी शिबिराचा ३४२ जणांनी घेतला लाभ

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

जनमंगल फाउंडेशन सोलापूर , जी. के. फाउंडेशन पुणे, कमल मेडिकेअर कॅन्सर सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल, यशोधरा सुपर स्पेशलिस्ट हॉस्पिटल आणि एच.व्ही. देसाई हॉस्पिटल, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने जनमंगल महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी मोफत ब्लड शुगर लेवल तपासणी, ईसीजी तपासणी, नेत्र तपासणी शिबिरामध्ये ३४२ लोकांनी लाभ घेतला. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. या कार्यक्रमास जनमंगल फाउंडेशनचे अध्यक्ष कानिफनाथ थोरात व जी. के. फाउंडेशन पुण्याचे उपाध्यक्ष जगदीश खडके उपस्थित होते.




## महात्मा बसवेश्वर आयटीआयमध्ये विभाजन विभीषण स्मरण दिन साजरा

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

विजापूर रोडवरील महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत भारत विभाजन विभीषक स्मरण दिन साजरा करण्यात आला. संस्थेचे प्राचार्य भालचीम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते प्रदीप आकुडे, संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य दशरथ वडतिले हे उपस्थित होते. यावेळी प्राचार्य भालचीम, उपप्राचार्य झणझणे यांनी मनोगत व्यक्त केले. श्वेता स्वामी यांनी पाहुण्याचा परिचय करून दिला तर कार्यालय अधीक्षक बालाजी माळी यांनी आभार मानले. सूत्रसंचालन शिल्पनिदेशक कांचन कुंभार यांनी केले. कार्यक्रमास संस्थेच्या राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख निर्मला म्हेत्रे, गट निदेशक गोलेकर उपस्थित होते. कार्यक्रमात वक्ते प्रदीप आकुडे यांचे भाषण झाले.

## बेडर तालीम गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी संतोष मिनगुले

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**



बेडर तालीम गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी संतोष मिनगुले यांची निवड करण्यात आली. संस्थापक अध्यक्ष योगेश माने व माजी अध्यक्ष महेश झंपले यांच्या उपस्थितीत मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे : उपाध्यक्ष निलेश झंपले, सेक्रेटरी मनोज बाडीवाले, खजिनदार महेश झंपले, सहखजिनदार नागेश भिंगे, कार्याध्यक्ष संजय मिनगुले, मिरवणूक प्रमुख अजय चौधरी, केदार मस्के, लेझीम प्रमुख राजू कामाठी, कुमार माने, संतोष मस्के, रवि माने, अंबादास माने, राजू माने.

# महाराणा प्रताप गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी आंबेवाले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**



महाराणा प्रताप गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी मुकेश आंबेवाले यांची निवड करण्यात आली. माजी अध्यक्ष किशोर कैय्यावाले यांचे अध्यक्षतेखाली निवड करण्यात आली.

इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे - उपाध्यक्ष सागर गणेश कैय्यावाले, खजिनदार सागर राजा बंबईवाले, सेक्रेटरी रोहित चौधरी, सहसेक्रेटरी रोहित चौधरी डान्स प्रमुख मुकेश मनसावाले, अजय बंबईवाले, टिपरी प्रमुख - मनोज चौधरी, राज मैनावाले, मिरवणूक प्रमुख देविदास मैनावाले, संजय आंबेवाले, तुळशीदास कैय्यावाले, महाराज सत्तारेवाले, राजेश आंबेवाले, यशपान मैनावाले, गणेश आंबेवाले, डेकोरेशन प्रमुख संजय मैनावाले, विजय कैय्यावाले, सुनिल मनसावाले, शाम मनसावाले, सुरेश पुनेवाले, अर्जुन बंबईवाले, सल्लागार प्रमुख ईश्वर बंबईवाले, रणजित तारवाले, राजेश झंपले, रमेश कैय्यावाले, अशोक कैय्यावाले, किशोर कैय्यावाले, विजय मैनावाले, मंडळाचे आधार स्तंभ रामसिंग आंबेवाले, नामदेव मनसावाले, बन्सी लच्चूवाले, विजय कलबुर्गे.

# हेरिटेज मनिधारी संस्थेच्या अध्यक्षपदी अंजली माशाळकर




### सर्व १७ संचालक बिनविरोध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

अक्कलकोट रोडवरील हेरिटेज मनिधारी सहकारी गृहरचना संस्थेच्या सतरा संचालक यांच्यासह अध्यक्षपदी कुमारी अंजली सिद्राम माशाळकर यांची एकमताने निवड करण्यात आली.सोलापूर शहर उपनिबंधक कार्यालयाकडून नव्याने नोंदणीकृत झालेल्या संस्थेची पहिली सर्वसाधारण सभा पुलगम मंगल कार्यालयात पार पडली.

या सभेत सर्वानुमते निवडण्यात आलेले सतरा संचालक पुढीलप्रमाणे: अंजली माशाळकर,संगीता वडतिले, सुधा इटकर, सुनीता गोडाळे, लक्ष्मी कोटे, अविनाश कटारे, स्मिता काळे, प्रेमा ढंगे, राजकुमार कलशेट्टी, काशिनाथ रामलिंग बिराजदार, अमोगसिद्ध साळुंखे, शंकर गाडी, सुरेश श येळमेळी, सिद्धेश्वर श्रीगादी, नितीन पतंगे, बाहुबली वनकुद्रे व विलास येमूल. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वन करुन सभेचे उद्घाटन करण्यात आले व मनःशांतीसाठी प्रार्थना म्हणण्यात आली.सुधा साळुंके (इटकर) यांनी प्रास्ताविक केले. उप निबंधक कार्यालयाचे सहकारी अधिकारी श्रीकांत विठ्ठल कोरे यांच्या हस्ते संस्था नोंदणीचे प्रमाणपत्र माशाळकर यांना सुपूर्त करण्यात आले. या सभेस मेरिट हौसिंग सोल्युशन कंपनीचे संचालक वाशिमवाले व केतन तनपुरे उपस्थित होते. सभेचे सूत्रसंचालन वर्षा कबाडे यांनी केले. विकासक सर्वश्री मनोज शहा, कनु अग्रवाल व भूपत यांनी नूतन संचालकांचे अभिनंदन केले.

# ड्रीम फाउंडेशनतर्फे पर्यटन जागर अभियान; १४ ते २८ सप्टेंबर दरम्यान आयोजन

### शेगाव श्री गजानन महाराज दर्शन घेऊन होणार सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

ड्रीम फाउंडेशन तर्फे १४ ते २८ सप्टेंबर दरम्यान सोलापूर पर्यटन जागर अभियान राबविण्यात येणार आहे. शेगाव श्री गजानन महाराज दर्शन घेऊन याची सुरुवात करण्यात येणार आहे. यंदा १५ दिवसात महाराष्ट्र व देशातील हजारो लोकांना सोलापूर पर्यटन जागर उपक्रमात सहभागी करून घेण्यात येणार आहे.

२२ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर दरम्यान सोलापूर पर्यटन राज्य दौरा करण्यात येणार आहे. पुणे,मुंबई,नाशिक,अमरावती, नागपुर,छत्रपती संभाजीनगर आणि कोकण विभागात सोलापूर पर्यटन जागर मार्केटिंग व ब्रॅण्डिंग करण्यात येणार आहे. लाखो लोकांना सोलापूर दर्शनचे निमंत्रण देणार आहेत. सोलापुरात उत्पादित विविध वस्तू राज्यभर व देशात विक्रीसाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. पर्यटन जागरसाठी महाराष्ट्र राज्य कोचिंग क्लास संघटना सीसीए यांची साथ मिळणार आहे. यामध्ये अक्कलकोट श्री स्वामी समर्थ दर्शन,श्री गाणगापूर दत्त दर्शन, पंढरपूर पांडुरंग दर्शन,श्री संगमेश्वर मंदिर हत्तरसंग कुडल यासह ग्रामदैवत श्री सिध्देश्वर दर्शन मिळणार आहे

सोलापूर पर्यटन जागर मंच, बसव संगम शेतकरी गट, चाणक्य गुरुकुलतर्फे १४ ते २८ सप्टेंबर दरम्यान सोलापुरातील ११ तालुक्यात पर्यटन जागर रथ फिरणार असून या पंधरवड्यात सोलापूरचे भूमिपुत्र अधिकारी, सोलापुरी पुणेकर, राज्यातील उद्योजक, स्वामी भक्त, हौशी पर्यटन प्रेमी यांना निमंत्रण देण्यात आले आहे. पर्यटन जागर उपक्रमात माझं आवडत सोलापुरातील पर्यटन स्थळ यावर निबंध स्पर्धा, खुली वक्तृत्व स्पर्धा, पर्यटन सामान्य ज्ञान स्पर्धा घेण्यात येणार आहे. २७ आणि २८ सप्टेंबर पर्यटन जागर व रोजगार मेळावा घेण्यात येणार असल्याचे संयोजक काशीनाथ भतगुणकी यांनी सांगितले आहे.

# हरिभाई देवकरण महाविद्यालयात पद्मश्री चैतराम पवार यांचे मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**



पहिला महाराष्ट्र वनभूषण पुरस्कार प्राप्त तसेच पद्मश्री पुरस्कार प्राप्त चेतराम पवार यांनी हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वनांचे संवर्धन करत संशोधन व वन समृद्धीसाठी त्याचा उपयोग कसा होऊ शकेल याबाबत आपले मत व्यक्त केले. एसपीएम इंग्लिश स्कूल मध्ये वनवासी कल्याण आश्रमाच्या वतीने आयोजित वनभाजी महोत्सवाच्या कार्यक्रमासाठी ते आले असता त्यांनी हरीभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

त्यांनी आपल्या मनोगतामध्ये त्यांच्या बारीपाडा या गावातील लोकांना संघटित करून वनांचे महत्त्व समजावून तसेच वनभाजांचे महत्त्व समजावून सांगून एक प्रकारे आदर्श गाव पुरस्कार मिळवून दिला हे विद्यार्थ्यांना सांगितले.

वृक्षतोड थांबली पाहिजे तसेच शेतीमध्ये विविध सेंद्रिय पद्धतीने प्रयोग करून शेती सुधारली पाहिजे व शाश्वत विकासावर भर दिला पाहिजे असे मत त्यांनी मांडले वनधन विकासाच्या माध्यमातून मोहाच्या वृक्षातून कशा पद्धतीने एक उद्योग उभा राहू शकेल याचे देखील त्यांनी स्पष्टीकरण दिले. मोहाच्या वृक्षापासून चॉकलेट, साबण, वाईन तसेच तेल कशा पद्धतीने काढले जाते व शेतकऱ्यांना त्याचा आर्थिक फायदा कसा होतो हे देखील स्पष्ट केले.

कार्यक्रमासाठी प्राचार्य श्रीमती दीपा फाटक, पर्यवेक्षक शांतप्पा कुंभार, पर्यवेक्षक बी.डी. बनसोडे, पर्यवेक्षक आप्पासाहेब राऊत, प्रशालेचे माजी पर्यवेक्षक अरुण उपाध्ये, हनुमंत मोतीबने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्राध्यापक वीरसेन धनके यांनी केले तसेच आभार यु.डी. चव्हाण यांनी मानले.

# मुख्य लेखापरिक्षक कोळी, आरोग्य अधिकारी डॉ. माने यांच्यासह २९ जणांचा सन्मान

### उपअभियंता मठपती, सहायक अभियंता सावंत, क्रीडा अधिकारी घोलप यांचाही झाला गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

स्वातंत्र्य दिनानिमित्त महापालिकेच्या वतीने उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल महापालिकेतील मुख्य लेखापरिक्षक रुपाली कोळी, आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने, उपअभियंता निलकंठ मठपती, सहायक अभियंता प्रकाश सावंत , प्रभारी क्रीडा अधिकारी श्रीकांत घोलप यांच्यासह २९ जणांचा गुणवंत अधिकारी - कर्मचारी पुरस्काराने गौरव करण्यात आला.

आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात आज गुणवंत अधिकारी - कर्मचारी पुरस्काराचे वितरण झाले. सन्मानपत्र व पुष्प देऊन या अधिकारी व कर्मचाऱ्यांना गौरविण्यात आले.



महापालिका कर्मचाऱ्यांचे नाव आणि कंसात कार्यालयाचे नांव याप्रमाणे - मुख्य लेखापरिक्षक रुपाली कोळी (मुख्य लेखापरिक्षक), आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने (आरोग्य विभाग), उपअभियंता निलकंठ मठपती (नगररचना कार्यालय), सहायक अभियंता प्रकाश सावंत (विभागीय कार्यालय क्रं.१), प्रभारी क्रीडा अधिकारी श्रीकांत घोलप (मनपा क्रीडा कार्यालय), कनिष्ठ अभियंता अभिजित बिराजदार (परिवहन उपक्रम/ प्राणीसंग्रहालय विभाग), कनिष्ठ अभियंता भाऊसाहेब गेजगे (विभागीय कार्या.क्रं.२ विद्युत), स्थापत्य कनिष्ठ अभियंता मधुसुदन पवार (विभागीय कार्यालय क्रं. २), सहायक कनिष्ठ अभियंता शेफाली दिलपाक (सार्वजनिक आरोग्य अभियंता), मुख्य आरोग्य निरिक्षक विजयकुमार तमशेट्टी (घनकचरा व्यवस्थापन विभाग), आरोग्य निरिक्षक सोमनाथ ताकभाते (घनकचरा व्यवस्थापन विभाग), वरिष्ठ मुख्य लेखनिक जालिंदर पकाले (सामान्य प्रशासन विभाग), वरिष्ठ श्रेणी लिपिक पंडित वडतिले (विभागीय कार्यालय क्रं. २), कनिष्ठ लिपिक विरेश स्वामी (सामान्य प्रशासन विभाग), वसुली लिपिक एन.ए.शिरसट (मालमत्ता कर विभाग), वसुली लिपिक त्रिंबक कुलकर्णी (मालमत्ता कर विभाग), वसुली लिपिक

अर्शद शेख (मालमत्ता कर विभाग), समुदाय संघटक शिला वाघमारे (समाजविकास विभाग), कनिष्ठ लिपिक मल्हारी मस्के (विधान सल्लागार कार्यालय), शिपाई देविदास मोहिते (अतिरिक्त आयुक्त कार्यालय-२), शिपाई अ.रहेमान पटेल (कामगार कल्याण व जनसंपर्क विभाग), मजूर चावीवाला श्रीकांत भंडारे (सार्वजनिक आरोग्य अभियंता - जल वितरण), मजुर सविता शिंदे (महिला व बालकल्याण विभाग), कायम मजूर संगदीप आहेरकर (विभागीय कार्यालय ५), कायम झाडूवाली द्रोपती सातपुते (घनकचरा व्यवस्थापन विभाग), कायम झाडूवाली विमल साबळे (घनकचरा व्यवस्थापन विभाग), सफाई कामगार चन्नमा मंदोलु (घनकचरा व्यवस्थापन विभाग), वाहन चालक शिवाजीराव गायकवाड (मनपा आयुक्त कार्यालय), डॉ. राहुल नवले(आरोग्य विभाग) आदींना यावेळी पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# वगळलेली ६५ लाख नावे सार्वजनिक

## बिहार मतदारयादी पुनरीक्षण; निवडणूक आयोगाची कृती




### २२ लाखांवर नागरिक आढळले मृत

शेखपुरा हा असा जिल्हा आहे जिथे केवळ २६,२५६ गणन अर्जांचा प्रारूप यादीत समावेश नव्हता. त्यानंतर शिवहर (२८,१६६), अरवल (३०,१८०), मुंगेर (७४,९१६), आणि खगरिया (७९,५५१) यांचा क्रमांक लागतो. मतदार यादीत नोंदणीकृत २२,३४,५०१ लोक या प्रक्रियेदरम्यान मृत आढळले. आणखी ३६.२८ लाख लोक राज्याबाहेर कायमचे स्थलांतरित झाले आहेत किंवा त्यांच्या दिलेल्या पत्त्यांवर आढळले नाहीत आणि आणखी ७.०१ लाख एकापेक्षा जास्त ठिकाणी नोंदणीकृत आढळले आहेत.

**पाटणा, १८ ऑगस्ट**

पुनरिक्षणाचा भाग म्हणून प्रकाशित झालेल्या मतदार यादीच्या मसुद्यातून वगळण्यात आलेल्या ६५ लाख लोकांची नावे निवडणूक आयोगाने सोमवारी सार्वजनिक केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला १९ ऑगस्टपर्यंत वगळलेली नावे प्रकाशित करण्याचे आणि २२ ऑगस्टपर्यंत अनुपालन अहवाल सादर करण्याचा निर्देश दिल्यानंतर ही कृती करण्यात आली.

निवडणूक आयोग सर्व मतदान केंद्रांवर 'एएसडी' (अनुपस्थित, स्थलांतरित आणि मृत मतदारांची नावे प्रकाशित करीत आहे. बिहारचे मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या मते रोहतास, बेगुसराय, अरवल, सिवान, भोजपूर आणि इतर ठिकाणी मतदान केंद्रांवर एएसडी याद्या प्रदर्शित करण्यात आल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने १४ ऑगस्ट रोजी दिलेल्या आदेशात, निवडणूक आयोगाला १ ऑगस्ट रोजी प्रकाशित झालेल्या मसुदा मतदार यादीत समाविष्ट नसलेल्या सुमारे ६५ लाख मतदारांची गणना केलेली, बुथनिहाय यादी प्रकाशित करण्याचा निर्देश दिला. बिहारमध्ये या वर्षीच्या अखेरीस विधानसभा निवडणुका होत आहेत.

बिहारमध्ये निवडणूक आयोगाने पुनरिक्षणाच्या पहिल्या टप्प्यात तयार केलेल्या मतदार यादीच्या मसुद्यात ६५ लाखापेक्षा जास्त गणनेचे फॉर्म समाविष्ट केले नव्हते, त्यामुळे सुमारे ७.९ कोटी नोंदणीकृत मतदारांची एकूण संख्या ७.२४ कोटी झाली.

पाटण्यात सर्वाधिक ३.९५ लाख गैर-समावेशित गणना फॉर्म होते. त्यानंतर मधुबनी (३.५२ लाख), पूर्व चंपारण (३.१६ लाख), गोपालगंड (३.१० लाख), समस्तीपूर (२.८३ लाख), मुझफ्फरपूर (२.८२ लाख) पूर्णिया (२.७३९ लाख), सारण (२.७३२ लाख), सीतामढी (२.४४ लाख) कटिहार (१.८४ लाख), किशनगंज (१.४५ लाख) चा समावेश असल्याचे आयोगाने म्हटले. (वृत्तसंस्था)

### नावांची यादी संकेतस्थळावर टाकणार

कुणाच्याही मनात शंका राहू नये म्हणून ज्या ६५ लाख नागरिकांची नावे वगळण्यात आली आहेत ती सर्व संकेतस्थळावर अपलोड केली जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यासंदर्भात २२ ऑगस्टपर्यंत अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

# डोनाल्ड ट्रम्प करणार युक्रेनचे तुकडे

**वॉशिंग्टन, १८ ऑगस्ट**

तीन वर्षांपेक्षा जास्त कालावधीपासून सुरू असलेल्या युद्धात उद्ध्वस्त झालेली अर्थव्यवस्था हे युक्रेनला मिळालेले फळ आहे. नाटोचा भाग होण्याचे आश्वासन युक्रेनला मिळाले होते.

आज तोच अमेरिका युक्रेनचे तुकडे करण्यास निघाला असून, या देशाने क्रिमियाला विसरावे, अशा डोनाल्ड ट्रम्प यांची इच्छा आहे. केवळ इतकेच नव्हे, तर डोनेट्स्क आणि लुहान्स्कसारखी मोठी शहरेही रशियाला सोपवण्याची तयारी अमेरिकेने केली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी उघडपणे यावर चर्चा सुरू केली आहे. आता युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांना यासाठी राजी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. झेलेन्स्की यांच्यासोबत ट्रम्प या मुद्यावर चर्चा करू शकतात. त्याचप्रमाणे युक्रेनही आता आतबट्ट्याच्या व्यवहाराच्या दिशेने जात असल्याचे सांगितले जात आहे.

महत्त्वाचे म्हणजे, अमेरिका आणि नाटो देशांच्या इशाऱ्यावर युक्रेनने रशियाशी टक्कर घेतली होती. अलास्का येथे पुतिन यांच्यासोबत झालेल्या बैठकीत धोरणात्मकदृष्ट्या ट्रम्प यांचा पराभव झाल्याचे वृत्त सीएनएन आणि न्यू यॉर्क टाईम्ससारख्या माध्यमांनी दिले आहे.



या बैठकीमुळे पुतिन आणि त्यांच्या देशाला मुख्यधारेत येण्याची संधी मिळाली आहे. या व्यतिरिक्त डोनाल्ड ट्रम्प यांनी पुतिन यांच्या अटींनुसार बैठक केल्याचे अमेरिकी माध्यमांनी म्हटले होते. यापूर्वी ट्रम्प आणि झेलेन्स्की यांच्यात झालेल्या बैठकीचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. यात ट्रम्प आणि झेलेन्स्की यांच्यात वाद झडल्याचे दिसत आहे. त्यानंतर झेलेन्स्की यांनी भोजन न करताच व्हाईट हाऊस सोडले होते. साधारणपणे राजकीय शिष्टाचारांचे पालन केले जाते. मात्र, त्या बैठकीत द्विपक्षीय संबंध आणि कूटनीतीला एक नवीन आयाम मिळाला होता.

### ट्रम्प-पुतिन बैठक रशियाच्या विजयाचे संकेत: झेलेन्स्की

व्लादिमिर पुतिन यांनी ठेवलेल्या अटी युक्रेनने मान्य कराव्यात, अशी ट्रम्प यांची इच्छा आहे. ट्रम्प यांच्यासोबत पुतिन यांनी केलेली बैठक म्हणजे युद्ध रशियाने जिंकल्याचा संदेश जात आहे, अशी कबुली झेलेन्स्की यांनी दिली. ट्रम्प यांच्यासोबतच्या बैठकीत युरोपच्या नेत्यांनाही सोबत घ्यावे, असा निर्णय झेलेन्स्की यांनी घेतला आहे.

## सुरत येथून २५ कोटींचे हिरे चोरी

**सुरत, १८ ऑगस्ट**

गॅस कटरच्या मदतीने लोखंडी दरवाजा तोडून हिरे कंपनीच्या आत घुसलेल्या चोरट्यांनी तब्बल २५ कोटींचे हिरे लंपास केल्याची घटना सोमवारी उघडकीस आली आहे. ही घटना १५ ते १७ ऑगस्ट दरम्यान घडल्याचे पोलिसांनी सांगितले. सुरतमधील कापोद्रा भागात ही घटना घडली. कंपनीत घुसण्यापूर्वी चोरट्यांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तोडफोड केली. या घटनेमुळे हिरे व्यापाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. तसेच पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. स्वातंत्र्य दिन, जन्माष्टमी आणि रविवार पाहता कंपनीने तीन दिवसांची सुटी जाहीर केली होती. चोरी झाली तेव्हा कंपनीत एकही कर्मचारी अथवा सुरक्षा रक्षक तैनात नव्हता. याच काळात चोरट्यांनी डाव साधला. पोलिसांनी गुन्हा दाखल करीत तपास सुरू केला आहे. (वृत्तसंस्था)

## दिल्लीत ३२ शाळांना बॉम्बची धमकी

**नवी दिल्ली** : राजधानीतील ३२ शाळांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आल्याने पोलिस आणि प्रशासनाची तारांबळ उडाली. यामुळे पालकांमध्ये दहशत निर्माण झाली. दिल्ली अग्निशमन विभागाच्या कार्यालयात धमकीचे ईमेल प्राप्त होताच पोलिस आणि बॉम्बशोध पथक घटनास्थळी रवाना करण्यात आले. शाळांची तपासणी केली असता फेक कॉल्स असल्याचे उघड झाले. पोलिसांनी अज्ञाताविरोधात गुन्हे दाखल करीत तपास सुरू केला आहे.

# 'ऑपरेशन सिंदूर'वेळी पाकिस्तानने लपवल्या होत्या युद्धनौका

## • भारतीय क्षेपणास्त्रांचा घेतला धसका • उपग्रह छायाचित्रांवरून पितळ उघडे

**नवी दिल्ली, १८ ऑगस्ट**

'ऑपरेशन सिंदूर'वेळी ६ आणि ७ मे च्या रात्री भारताने हल्ला करीत दहशतवाद्यांच्या नऊ ठिकाणे उद्ध्वस्त केली. या हल्ल्याला पाकिस्तानने उत्तर देण्याचा प्रयत्न केला. मात्र, भारताने दिलेल्या दणक्याने पाकिस्तानी सैन्याची अवस्था पालापाचोळ्यासारखी झाली. भारतीय क्षेपणास्त्रांचा प्रचंड धसका पाकिस्तानने घेतला. युद्धनौकांची हानी नको म्हणून त्या इराणच्या जवळ लपवून ठेवल्या. ओपन-सोर्स इंटेलिजन्सने उपलब्ध केलेल्या उपग्रह छायाचित्रांवरून पाकिस्तानचे पितळ उघडे पडले आहे.

भारत आणि पाकिस्तानमधील संघर्षाने टोक गाठले असताना पाकिस्तानी नौदलाच्या युद्धनौका कराची येथील नौदलाच्या बंदरावरून हटवून त्या व्यावसायिक टर्मिनल्सवर ठेवण्यात आल्याचे उपग्रह छायाचित्रांवरून दिसत आहे. या युद्धनौकांनी पश्चिमेच्या बंदरांवर नांगर टाकल्याचे दिसून आले. हे ठिकाण इराणच्या सीमेपासून केवळ १०० किमी दूर आहे. युद्धनौका भारताजवळ आणण्याच्या ऐवजी त्या दूर नेऊन ठेवण्यात आल्या होत्या.

पाकिस्तानी सैन्य आणि युद्धनौका संघर्षादरम्यान बचावात्मक स्थितीत होत्या, हे या छायाचित्रांवरून स्पष्ट झाले. पाकिस्तान युद्ध लढण्याच्या स्थितीतच नव्हता, ही बाब उपग्रहाच्या छायाचित्रांवरून स्पष्ट झाली. काही युद्धनौकांनी इराणी सीमेजवळ नांगर टाकल्याचे दिसत आहे.

**कराची बंदरात दडविल्या युद्धनौका**

कराची बंदरात व्यावसायिक टर्मिनल्समध्ये युद्धनौका लपवण्यात आल्या. ही बाब सामान्य नसल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. साधारणपणे युद्धावेळी युद्धनौका सैन्याला गरज असते त्या ठिकाणांवर तैनात केल्या जातात. मात्र, पाकिस्तानने आपल्या युद्धनौका सुरक्षित ठेवण्यासाठी व्यावसायिक क्षेत्राचा वापर केला. (वृत्तसंस्था)

### उपग्रह छायाचित्रांचे महत्त्व

**वस्तुस्थिती आली समोर** : 'ऑपरेशन सिंदूर'चे यश दाखवून देणारी छायाचित्रे प्रथमच समोर आली आहेत. या माध्यमातून पाकिस्तान किती दुर्बल आहे, हे स्पष्ट होते.

**धोरणात्मक धडा** : बळकट संरक्षण यंत्रणा, अचूक रणनीतीमुळे शत्रूला पराभूत केले जाऊ शकते हा धडा भारताला मिळाला.

### कसा झाला पाकिस्तानचा पराभव?

**भारतीय रणनीती** : 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान भारतीय सैन्याने वायुदल, नौदल आणि जमिनीवरील हल्ल्यांसाठी संयुक्त रणनीतीचा वापर केला. यामुळे पाकिस्तानवरील दबाव वाढला.

**आधुनिक तंत्रज्ञान** : भारताच्या आधुनिक रडार आणि क्षेपणास्त्र यंत्रणेने पाकिस्तानी विमानांना हल्ले करणे अशक्य केले होते.

# आयईडी स्फोटात पोलिस कर्मचारी हुतात्मा

**बिजापूर, १८ ऑगस्ट**

छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी पेरलेल्या आयईडीचा सोमवारी स्फोट होऊन जिल्हा राखीव रक्षक दलाचा जवान हुतात्मा झाला, तर इतर तीन जण जखमी झाले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

राज्य पोलिस दलाचे पथक नक्षलविरोधी मोहिमेवर असताना आज सकाळी इंद्रावती राष्ट्रीय अभयारण्यात हा स्फोट झाला, असे वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. या स्फोटात दिनेश नाग नावाचा जिल्हा राखीव रक्षक दलाचा जवान हुतात्मा झाला आणि इतर तीन जवान जखमी झाले, असे त्यांनी सांगितले.

जखमी जवानांना प्राथमिक उपचारानंतर जंगलाच्या बाहेर हलवण्यात आले. (वृत्तसंस्था)



एरवी हिंदू देवदेवतांविषयी आकस बाळगून टीका करणारे काँग्रेस नेते राहुल गांधी बिहारच्या दौऱ्यावर असून त्यांनी औरंगाबाद जिल्ह्यातील देवकुंड सूर्यमंदिराला सोमवारी भेट दिली. सोबत राजद नेते तेजस्वी यादव होते

# राधाकृष्णन यांनी घेतली पंतप्रधान मोदी यांची भेट

**नवी दिल्ली, १८ ऑगस्ट**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उपराष्ट्रपतिपदाचे उमेदवार आणि महाराष्ट्राचे विद्यमान राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज राजधानी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली.



भाजपा सांसदीय मंडळाच्या रविवारी रात्री झालेल्या बैठकीत राधाकृष्णन यांची रालोआचे उपराष्ट्रपतिपदाचे उमेदवार म्हणून निवड झाली होती. आज दुपारी त्यांचे राजधानी दिल्लीत आगमन झाले. मोदी यांच्या निवासस्थानी जाऊन राधाकृष्णन यांनी त्यांची भेट घेतली. मोदी यांनी उपराष्ट्रपतिपदाचे उमेदवार म्हणून निवड झाल्याबद्दल राधाकृष्णन यांचे अभिनंदन करत त्यांच्या प्रदीर्घ प्रशासकीय अनुभवाचा देशाला फायदा होईल, असा विश्वास व्यक्त केला. मोदी यांनी एक्सवर राधाकृष्णन यांच्यासोबत झालेल्या भेटीचे छायाचित्रही टाकले.

विमानतळावर सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव, प्रल्हाद जोशी, तेलगू देसमचे राममोहन नायडू, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, भाजपा महासचिव विनोद तावडे यांनी राधाकृष्णन यांचे स्वागत केले. (तभा वृत्तसेवा)



## फडणवीस यांनी घेतली राधाकृष्णन् यांची भेट शिवाजी महाराजांच्या पत्राचे पुस्तक दिले भेट

**मुंबई, १८ ऑगस्ट**

उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी रालोआच्या वतीने उमेदवारी मिळालेले महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोवारी येथील राजभवन येथे सदिच्छा भेट घेतली. त्यानंतर राधाकृष्णन् दिल्लीला रवाना झाले. येथील विमानतळावर राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्यासोबत फडणवीस यांनी सी. पी. राधाकृष्णन् यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या अप्रकाशित पत्रांचा समावेश असलेले पुस्तक भेट दिले, असे राजभवनाने निवेदनात म्हटले आहे. सत्ताधारी रालोआने रविवारी उपराष्ट्रपती पदाचे उमेदवार म्हणून तामिळनाडूतील एक प्रमुख ओबीसी आणि भाजपाचे अनुभवी नेते राधाकृष्णन् यांचे नाव जाहीर केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि सहकारी पक्षांसोबत सल्लामसलत केल्यानंतर येथे झालेल्या संसदीय मंडळाच्या बैठकीत त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याचे भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी सांगितले.

# भारत-पाकिस्तान संघर्षविराम कधीही तुटू शकतो

### अमेरिकेचा इशारा

**वॉशिंग्टन, १८ ऑगस्ट**

भारत आणि पाकिस्तानमधील संघर्षविराम कधीही संपुष्टात येऊ शकतो. त्यामुळे अमेरिका दररोज दोन्ही देशांतील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे, असे खळबळजनक वक्तव्य अमेरिकेचे ज्येष्ठ खासदार मार्को रुबिओ यांनी केले आहे. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी ही भीती व्यक्त केली. त्यांच्या या विधानामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात पुन्हा एकदा भारत-पाकिस्तान संबंधांवर चर्चा सुरू झाली आहे.

एका मुलाखतीदरम्यान बोलताना रुबिओ म्हणाले, जेव्हा दोन्ही बाजू थांबायला तयार होतात, तेव्हाच शस्त्रसंधी शक्य होते. मात्र, ती टिकवून ठेवणे अत्यंत कठीण असते. युक्रेन युद्धाप्रमाणेच शस्त्रसंधी कधीही मोडली जाऊ शकते. आम्ही केवळ भारत-पाकिस्तानच नव्हे, तर कंबोडिया-थायलंडसारख्या देशांतील परिस्थितीवरही दररोज लक्ष ठेवून असतो. (वृत्तसंस्था)

## इंदूरमध्ये दोन हृदय असलेल्या मुलीचा जन्म

**इंदूर, १८ ऑगस्ट**

मध्यप्रदेशातील इंदूरमध्ये जन्मलेली एक मुलगी चर्चेत आली आहे. १३ ऑगस्ट रोजी मोथापुरा गावातील महिलेने एका विशेष मुलीला जन्म दिला. या मुलीला दोन डोके, चार हात आणि दोन हृदये आहेत, तर तिची छाती आणि पोट जोडलेले आहे. तर, मुलीला दोन सामान्य पायदेखील आहेत. सध्या मुलीची प्रकृती स्थिर आहे आणि डॉक्टर तिच्यावर सतत लक्ष ठेवून आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मुलीची प्रसूती एमटीएच रुग्णालयात झाली. मात्र, गंभीर स्थिती पाहून तिला एमवाय हॉस्पिटलमध्ये रेफर करण्यात आले. मुलीला एमवाय हॉस्पिटलच्या आपत्कालीन वॉर्डमध्ये ऑक्सिजन सपोर्टवर ठेवण्यात आले आहे. डॉक्टरांचे विशेष पथक तिच्या प्रकृतीवर सतत लक्ष ठेवून आहेत. डॉक्टरांनी सांगितले की, सध्या मुलीची प्रकृती स्थिर आहे आणि तिची दोन्ही हृदये सामान्यपणे काम करत आहेत. मात्र, पुढील स्थिती तपासण्यासाठी सोनोग्राफी आणि इतर आवश्यक वैद्यकीय चाचण्या केल्या जात आहेत.

**वैद्यकीय भाषेत याला काय म्हणतात?**

वैद्यकीय भाषेत अशा जोडलेल्या जुळ्या मुलांना कंजॉइंड ट्विन्स म्हणतात. अशी परिस्थिती खूप गुंतागुंतीची मानली जाते. त्यामुळेच अशा मुलांची शस्त्रक्रिया करणे खूप कठीण आणि धोकादायक असते. (वृत्तसंस्था)

# सरकार निवडणूक आयोगाचा प्रवक्ता नाही

## मतदार यादी पुनरीक्षणावर संसदेत चर्चा नाहीच ● किरेन रिजिजूंनी केले स्पष्ट






**नवी दिल्ली, १८ ऑगस्ट**

निवडणूक आयोगाच्या मुद्यावर संसदेत चर्चा करता येणार नाही, सरकार काही निवडणूक आयोगाचा प्रवक्ता नाही, असे संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी आज लोकसभेत स्पष्ट केले.

बिहारमधील मतदार यादी पुनरीक्षणाच्या मुद्यावरुन काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्ष सभागृहात गदारोळ करत आहे, यामुळे रोजच सभागृहाचे कामकाज ठप्प करावे लागत आहे. याचा उल्लेख करत निवेदनातून सरकारची भूमिका स्पष्ट करत रिजिजू म्हणाले की, निवडणूक आयोग आणि काँग्रेसमध्ये जो वाद सुरु आहे, त्याचे उत्तर निवडणूक आयोगच देऊ शकते. विरोधी पक्ष आयोगाला जे प्रश्न विचारत आहे, त्याचे उत्तर आयोगच देऊ शकते, त्यामुळे सभागृहात गोंधळ घालून काही होणार नाही. आम्ही निवडणूक आयोगाचे प्रवक्ते नाही, तसेच निवडणूक आयोग ही घटनात्मक संस्था आहे, त्यामुळे त्यांच्यावरील आक्षेपाचे उत्तर आम्ही देऊ शकत नाही, ते त्यांनाच द्यावे लागेल, असे ते म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

### विरोधी सदस्यांच्या गदारोळामुळे लोकसभेचे कामकाज स्थगित

मतचोरीच्या मुद्यावरुन आज चौथ्या आठवड्यातही लोकसभेत गदारोळ झाला, आधी दोनदा स्थगित झाल्यानंतर लोकसभेचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करावे लागले.

दोन स्थगित झाल्यानंतर दुपारी २ वाजता लोकसभेचे कामकाज सुरु होताच अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सभागृहात आता भारताच्या अंतरीक्ष कार्यक्रमावर चर्चा होईल, असे जाहीर केले. बिर्ला बोलत असतांनाच काँग्रेस, तृणमूल काँग्रेस आणि समाजवादी पक्षाच्या सदस्यांनी हातात घोषणांचे पोस्टर्स घेत अध्यक्षांच्या समोरील मोकळ्या जागेत धाव घेता जोरदार घोषणाबाजी सुरु केली. विरोधी सदस्यांचा गोंधळ सुरु असतांना ओम बिर्ला यांनी आपली जागा सोडली आणि तालिका अध्यक्ष दिलीप सैकिया त्यांच्या आसनावर विराजमान झाले. तरीसुध्दा विरोधी सदस्यांची घोषणबाजी सुरुच होती. सदस्यांनी सभागृहाचे कामकाज सुरळीत चालू द्यावे, असे आवाहन सैकिया वारंवार करत होते, मात्र त्याला प्रतिसाद मिळत नसल्यामुळे त्यांनी कामकाज दिवसभरासाठी स्थगित केले. आज सकाळी ११ वाजता सभागृहाचे कामकाज सुरु होताच अध्यक्ष ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला. तोच काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या सदस्यांनी अध्यक्षांच्या आसनासमोरील मोकळ्या जागेत धाव घेत घोषणाबाजी सुरु केली. मतचोरीच्या घोषणा सदस्य देत होते. गोंधळ थांबत नसल्याने

त्यांनी १२ वाजेपर्यंत कामकाज स्थगित केले. दुपारी १२ वाजता कामकाज सुरु होताच पुन्हा गोंधळ सुरु झाला, त्यामुळे तालिका अध्यक्ष यांनी कामकाज दुपारी दोनपर्यंत स्थगित केले.

## उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक सर्वसहमतीने करण्याचा सरकारचा प्रयत्न

**नवी दिल्ली, १८ ऑगस्ट -**

रालोआचे उपराष्ट्रपतिपदाचे उमेदवार सी.पी. राधाकृष्णन यांची उपराष्ट्रपतिपदी अविरोध आणि सर्वसहमतीने निवड व्हावी म्हणून संरक्षणमंत्री राजनाथसिंह कामाला लागले आहेत. राजनाथसिंह यांनी दिवसभर विविध राजकीय पक्षाच्या नेत्यांना दूरध्वनी करत राधाकृष्णन यांच्या उमेदवारीला त्यांचा पाठिंबा मागितला. राजनाथसिंह यांनी रविवारी रात्रीच काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांना दूरध्वनी करत राधाकृष्णन यांच्या उमेदवारीला त्यांचा पाठिंबा मागितला. राजनाथसिंह यांनी आज रालोआ आणि इंडिया आघाडीत नसलेल्या अनेक पक्षांच्या नेत्यांना दूरध्वनी करुन राधाकृष्णन यांच्या उमेदवारीला त्यांचा पाठिंबा मागितला. भाजपाने उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीची जबाबदारी राजनाथसिंह यांच्याकडे सोपवली आहे. सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांना राधाकृष्णन यांचे प्रतिनिधी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. रालोआतील जदयु, तेलगू देसम आणि अन्य पक्षांनी राधाकृष्णन यांच्या उमेदवारीचे स्वागत केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अग्रलेख...

# कोण कमावणार, कोण गमावणार?

एखाद्या भांड्यात उकळणारा कोणताही द्रव पदार्थ आगीच्या कमाल धगीमुळे कमाल तापमानाच्या पातळीवर पोहोचल्यावर एक तर तो आटून जाण्यास सुरुवात होते किंवा उकळून ऊतू जाऊन पुन्हा आपल्या पातळीवर स्थिरावतो. उत्साहाचेही तसेच असते. तो एकदा ओसंडून ऊतू गेला की पुन्हा त्याखाली कितीही धग निर्माण केली, तरी तो पुन्हा ऊतू जात नाहीच, उलट आटूनच जातो. कदाचित त्यामुळेच, काही महिन्यांपूर्वी काही मोजक्या वृत्तवाहिन्या आणि माध्यमांच्या नसानसांत ओसंडणारा उत्साह त्या वेळी ऊतू गेल्यानंतर पुन्हा त्याला उकळ्या फुटल्याच नाहीत. आता तो आटतच चालला आहे. त्या दिवशी ज्या क्षणाकडे ही माध्यमे आणि वाहिन्या डोळ्यात प्राण आणून पाहात होत्या, त्या क्षणाचे साक्षीदार झाल्यानंतर त्यांचा उत्साह कमालीचा ओसंडून ऊतू गेला आणि पुढे त्या उत्साहास उकळ्यादेखील फुटेनाशा झाल्या. महाराष्ट्रात मराठीच्या मुद्यावरून उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेस आणि राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेस भाषाभिमानाच्या संधीचे आयते सोने हातात गवसल्याचा आनंद झाला आणि मराठी अस्मितेच्या कुबड्या घेऊन तरी दोघे भाऊ एकत्र येतील या एमकेव आशेपायी गेल्या सुमारे दोन दशकांपासून त्यांच्या ऐक्याची आस लागलेल्या माध्यमांचा आनंद ओसंडून वाहू लागला. महाराष्ट्रात हिंदी सक्तीच्या विरोधात या दोघांनी रान उठविल्यास महायुती सरकारची कोंडी होईल आणि उद्धव व राज ठाकरे यांना राजकीय संधीचे आकाश ठेंगणे होईल अशी अटकळ बांधलेल्यांची उमेद जागी झाली आणि त्यांनी उभय भावंडांच्या ऐक्याच्या तुताऱ्या फुंकण्यास सुरुवात केली. आपल्या ऐक्याकडे डोळे लावून बसलेल्या माध्यमांचा वापर करून घेण्याच्या संधीची खात्री पटल्यावर राज व उद्धव ठाकरे यांनी विरोधकांच्या सर्वपक्षीय आंदोलनाचा मुखवटा चढवून आपल्या ऐक्याच्या संधीचे तात्पुरते सोने केले, तेव्हा काही वृत्तवाहिन्यांच्या कार्यालयांत ऊतू जाणारा उत्साह महाराष्ट्राने अनुभवला होता. माध्यमांनी तटस्थपणे राजकीय घडामोडींकडे पाहावे असा संकेत असतो. पण काही माध्यमांनीही त्या ऐक्याच्या मुहूर्तावर टाळ्यांचा गजर केला आणि संकेतांची ऐसीतैसी करून टाकली. त्या वेळी ओसंडणाऱ्या अभूतपूर्व उत्साहास एवढ्या प्रचंड उकळ्या फुटल्या की तो सारा उत्साह एकाच वेळी अनावरपणे अक्षरश: ओसंडून ऊतू गेला. तो क्षण सरला आणि आता सारे काही पूर्वपदावर आले आहे. त्या दिवशी, जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्याअखेरीस हिंदी सक्तीच्या निर्णयाविरुद्ध एकत्र येऊन मोर्चा काढण्याच्या निर्णयाची हवा राज्य सरकारने काढून टाकल्यावर मोर्चाऐवजी विजयी मेळावा आयोजित करून उबाठा-मनसेचे कार्यकर्ते आणि महाविकास आघाडीतील काही पक्षांच्या नेत्यांच्या हजेरीत राज आणि उद्धव ठाकरे यांनी एकमेकांच्या मध्ये वीस वर्षांपासून स्वहस्ते धरलेला दुहीचा अंतरपाट दूर केला, एकमेकांची गळाभेट घेतली, तेव्हा अनेक लेखण्यांनी आणि जिभांनी महाराष्ट्राच्या राजकारणातील भूकंपाची भाकिते वर्तविली होती. आता सुमारे दीड महिन्यांचा काळ लोटल्यानंतर या लेखण्या आणि जिभादेखील शांत झाल्या आहेत आणि त्या दिवशीच्या गळाभेटीनंतर पुन्हा एकदा वातावरण जैसे थे होऊन उबाठा-मनसे ऐक्याच्या वावड्यांना नवी उकळी आणण्यासाठी संजय राऊत यांनी नव्याने कंबर कसली आहे. त्या दिवशी ओसंडून ऊतू गेलेला तो उत्साह पुन्हा एकदा अवतरेल आणि राजकारणातील भूकंपाची भाकिते चालविण्यासाठी त्या लेखण्या पुन्हा एकदा सरसावतील ही त्यांची अपेक्षा मात्र आता फारशी फळाला येताना दिसत नाही. म्हणूनच, महापालिका निवडणुकांच्या अगोदर राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना व उद्धव ठाकरे गट यांच्या युतीच्या बातमीतून, या नेत्यांचे भविष्यातील कमावणे किंवा गमावणे यांचा हिशेब मांडावा लागणार आहे.

राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंचे नेतृत्व नाकारून महाराष्ट्र नवनिर्माण सेना नावाचा स्वतंत्र पक्ष स्थापन केल्यावर या पक्षाच्या माथ्यावर महाराष्ट्रातील जनतेच्या अपेक्षांचे प्रचंड मोठे ओझे होते, ही बाब नाकारता येणार नाही. कदाचित त्यामुळेच, २००९ च्या लोकसभा निवडणुकीत एकाही जागेवर विजय मिळाला नसला तरी शिवसेना-भाजपचा विजय खडतर करून या पक्षाने सुमारे चार टक्के मतांचा जनाधार मिळविला होता, तर त्या विधानसभा निवडणुकीत साडेपाच टक्क्यांहून अधिक मते मिळवून १३ मतदारसंघांतून विधानसभेत प्रवेशही मिळविला होता. ही कामगिरी राज ठाकरे यांना पुढे टिकविता आली नाहीच, उलट पक्षाच्या कामगिरीची झपाट्याने घसरणच सुरू झाली. २०१४ आणि २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत फटका बसल्यानंतर हा पक्ष चाचपडू लागला आणि भाजपसोबत उद्धव ठाकरे यांचे बिनसल्याचे निमित्त करून भाजपशी हातमिळविणी करण्याचे प्रयत्न सुरू झाले. दुरावलेल्या उद्धव ठाकरेंची जागा राज ठाकरेंना देण्याचे गाजर भाजपने हातात धरताच मनसेच्या उतरत्या कळेला उजाळा मिळणार अशा अटकळीही बांधल्या जाऊ लागल्या आणि मनसेच्या पाठीवर बसून काठीला बांधलेले गाजर समोर धरलेल्या भाजपने राज ठाकरेंच्या राजकारणाचे पितळ उघडे पाडण्यास सुरुवात केली. राज ठाकरे यांच्याकडे कमावण्यासारखे काही उरलेले नाही, हे भाजपला माहीत होते आणि आपल्याकडे गमावण्यासाठीदेखील काही राहिलेले नाही हे राज ठाकरे यांनाही ठावूक होते. त्यामुळे गाजरामागे धावण्याच्या या खेळात दमछाक झाल्यावर आता स्थैर्यासाठी कोणाच्या तरी आधाराची राज ठाकरेंच्या पक्षाला गरज होतीच आणि तेव्हाच हिंदी सक्तीच्या मुद्याची संधी चालून आली. राज आणि उद्धव ठाकरे यांच्या ऐक्याचा नवा खेळ महाराष्ट्राला पाहावयास मिळावा यासाठी सत्तेतील चाणक्यांनी हा डाव मुद्दामच घडवून आणला असे तेव्हा बोलले जात होते, पण तो स्वतंत्र चर्चेचा मुद्दा होऊ शकतो. या संधीमुळे उद्धव आणि राज यांना एकत्र आणण्याच्या संजय राऊत यांच्या अपेक्षेला नवे धुमारे फुटू लागले. महाविकास आघाडीच्या आधाराने उद्धव ठाकरे यांना शरद पवारांच्या तंबूत नेण्याच्या मोहिमेत संजय राऊत यांची भूमिका महत्त्वाची होती. अन्यथा, भाजपची सोबत सोडल्यानंतर उद्धव ठाकरेंना सत्तेचे दरवाजे कायमचे बंद झाले असते याची जाणीव झालेल्या संजय राऊत यांनी प्रसंगी स्वत:वर अपमानाचे आणि टीकेचे वार झेलत उद्धव ठाकरे यांच्या इमानी निष्ठावंताचे कर्तव्य बजावत, उद्धव ठाकरे यांच्याकडे कमावण्यासारखे काही राहिले नाही हे स्पष्ट होताच नव्या समीकरणाची आखणी घेण्यासाठी पुढाकार घेतला. युती किंवा ऐक्याबाबत राज किंवा उद्धव ठाकरे यांनी मौन बाळगलेले असतानाही, संजय राऊत यांचा उत्साह मात्र आता एकतर्फी ऊतू चाललेला दिसत असल्याने, भविष्यात कमावण्यासारखे काही न राहिलेल्या व गमावण्यासाठी काहीच हाती नसलेल्या दोघा पक्षांच्या युतीची नवी समीकरणे महाराष्ट्रात तयार झाली, तर त्यात कोणास फारसे आश्चर्य वाटणार नाही.

भाजपसोबतच्या युतीचा कटोरा जाहीरपणे फेकून दिल्यानंतर शरद पवार यांच्या आशीर्वादाने महाविकास आघाडी सरकारच्या नेतृत्वाची संधी मिळालेल्या उद्धव ठाकरे यांनी गेल्या पाच वर्षांत भाजपेतर विरोधी पक्ष किंवा अन्य संबंधित संघटनांसोबत युती करण्याच्या साऱ्या शक्यतांचे सोने करून पाहिले. हिंदुत्वाचा मुद्दा सत्तेच्या राजकारणाआड येऊ नये यासाठी आपला मुखवटाही बाजूला काढून ठेवला आणि भेटेल त्याला युतीची गळही घातली. पण गटाला लागलेली गळती आता आवरण्यापलीकडे गेल्याची जाणीव ठाकरे यांना झाली आहे. अशा परिस्थितीत, महापालिकेच्या सत्तेची हंडी फोडण्यासाठी पायाखाली नवा थर रचावा लागेल, हे ओळखून सुरू झालेल्या प्रयत्नांना महाविकास आघाडीतून फारसा प्रतिसाद मिळत नाही, वज्रमूठ तर केव्हाच सैल पडली आहे आणि काँग्रेसने स्वबळाचा नारा कधीपासूनच लावला आहे. शरद पवार यांच्या राजकारणावर विसंबून राहणे विश्वासार्ह नाही, अशा परिस्थितीत, गमावण्यासारखे काहीच हाती राहिले नसलेला एकमेव पक्ष तरी सोबत घ्यावा ही त्यांच्या पक्षाची नवी नीती आता प्रत्यक्षात येऊ शकते. तसेही, राज ठाकरे यांच्या पक्षाला निवडणुकीच्या राजकारणात फारशा अपेक्षा राहिलेल्या नसाव्यात. निवडणुका ही मनसेकरिता गाजराची पुंगी ठरणार असून उबाठाच्या सोबतीने ती वाजलीच, तर ठीक, अन्यथा तीच पुंगी मोडून वाजवण्याची मनसेची तयारी असेलच! कदाचित, यामुळेच उबाठा-मनसे ऐक्याकडे डोळे लावून बसलेल्यांच्या उत्साहाचा आता ओहोटीचा काळ सुरू झाला असावा.

---

## आंतरराष्ट्रीय

# थायलंडमधील अस्थिर सरकारची परंपरा

**प्रा. जयसिंग यादव**

थायलंड आणि कंबोडियामधील वादाचे मूळ प्रत्यक्षात दोन्ही देशांमधील मैत्रीतील दरी हे आहे. शिनावात्रा कुटुंब बराच काळ थायलंडच्या राजकारणाचा भाग आहे. थाक्सिन शिनावात्रा हे शिनावात्रा कुटुंबाचे प्रमुख मानले जातात. त्यांनी २००० च्या दशकात पहिल्यांदा देशाच्या राजकारणात प्रवेश केला. त्यांनी थाईक थाई पक्षाची स्थापना केली आणि २००१ च्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रचंड विजय मिळवला. राजकारणात त्यांचा दीर्घकाळ प्रभाव असण्याची अनेक कारणे आहेत. पहिली गोष्ट म्हणजे त्यांनी अनेक प्रगतिशील धोरणे स्वीकारली. थायलंडच्या राजकारणाला नवीन वळण दिले. त्यांच्या आगमनापूर्वी देशात कोणतेही कल्याणकारी धोरण नव्हते. ते देशातील गरिबांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न करणारे पहिले नेते होते. त्यांच्या विरोधकांच्या युतीला 'यलो शर्ट्स' म्हणतात. त्यात बहुतेक शहरी मध्यमवर्गीय लोक आणि राजेशाही समर्थकांचा समावेश होता. २००६ मध्ये थाक्सिन शिनावात्रा यांच्या सरकारवर भ्रष्टाचार आणि देशाच्या राजाशी निष्ठा नसल्याचे आरोप लावण्यात आले. जनतेने त्यांच्याविरुद्ध रस्त्यावर उतरून जोरदार निदर्शने केली. त्यानंतर लष्कराने त्यांना पदच्युत केले. २००८ मध्ये थाक्सिन शिनावात्रा देश सोडून गेले आणि २०२३ मध्ये परतले. त्यांच्या पक्षावर बंदी घालण्यात आली. त्यानंतर त्यांनी प्रोथाई नावाने एक पक्ष स्थापन केला. देशाचे चार पंतप्रधान शिनावात्रा कुटुंबातून आले; परंतु प्रत्यक्षात थाक्सिन पडद्यामागे राहून सरकारचे महत्त्वाचे निर्णय घेत होते. २०२३ च्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये तरुणांच्या नेतृत्वाखालील 'मूव्ह फॉरवर्ड पार्टी'ला बहुमत मिळाले; परंतु सरकार स्थापन करण्याची संधी मिळाली नाही.

थायलंडच्या संवैधानिक न्यायालयाने निवडणुकीदरम्यान दिलेल्या आश्वासनाचा हवाला देत तरुणांच्या पक्षाला बरखास्त केले. राजेशाहीचा अपमान करणे हा देशात गुन्हा आहे. यानंतर, प्रोथाई पक्षाने प्रतिस्पर्धी पक्षांशी युती करून सरकार स्थापन केले. ऑगस्ट २०२४ मध्ये संसदेने प्रोथाई पक्षातील एका पंतप्रधानाला काढून टाकले आणि त्यांच्या जागी थाक्सिन शिनावात्रा यांची मुलगी पतोंगटार्न शिनावात्रा यांना पंतप्रधान म्हणून निवडले. त्यांच्याकडे कमकुवत पंतप्रधान म्हणून पाहिले जात होते. पंतप्रधान झाल्यानंतर, थाक्सिन यांनी सरकारी धोरणांवर उघडपणे बोलण्यास सुरुवात केली. या टीकेमुळे त्यांच्या पंतप्रधान मुलीची विश्वासार्हता नष्ट झाली. त्यातच थायलंडचे पंतप्रधान आणि कंबोडियाच्या संसदेचे अध्यक्ष आणि माजी पंतप्रधान हुन सेन यांच्यातील दूरध्वनी संभाषण लीक झाले. पतोंगटार्न सीमेवरील संघर्ष थांबवून शांतता प्रस्थापित करू इच्छित होत्या. या संभाषणादरम्यान, पतोंगटार्न शिनावात्रा यांनी हुन सेन यांना काका म्हणून संबोधले. ते खूप धाडसीपणे बोलत असल्याचे दिसले.




हुन सेन आणि पतोंगटार्न यांचे वडील जवळचे मित्र आहेत आणि कदाचित म्हणूनच पतोंगटार्न या हुन सेन यांच्यांशी अतिशय विनम्रपणे बोलल्या आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. यानंतर एका प्रमुख रूढीवादी पक्षाला सरकारमधून बाहेर काढण्यात आले आणि देशभरात पतोंगटार्न यांच्याविरुद्ध व्यापक निदर्शने झाली. त्यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली. त्यांनी संवैधानिक न्यायालयात युक्तिवाद केला, की शांतता कराराच्या रणनीतीचा भाग म्हणून आपण कंबोडियन नेत्यांशी अशा प्रकारे चर्चा केली; परंतु संवैधानिक न्यायालयाने त्यांच्याविरुद्ध चौकशी सुरू करत निलंबित केले. थायलंडची लोकशाही कमकुवत आहे. थायलंडमध्ये निवडणुका होतात आणि तेथे संसददेखील आहे; परंतु २० वेळा संविधान बदलण्यात आले असून १३ वेळा सरकारे उलथवण्यात आली आहेत. १९३२ पासून न्यायव्यवस्थेने अनेक वेळा प्रशासनात हस्तक्षेप केला आहे. इतर देशांमध्ये कार्यकारी मंडळ सरकारी प्रशासन चालवते; परंतु येथे सैन्य आणि राजेशाहीदेखील आहे. १९९२ पासून थायलंडमध्ये संवैधानिक राजेशाही आहे, म्हणजेच राजा हा देशाचा प्रमुख असतो; परंतु संविधानावर आधारित नियमांनुसार सत्ता सरकारच्या हातात असते. लष्कराला सत्तापालट करायचा अधिकार असला तरी ते थायलंडच्या राजाच्या संमतीशिवाय होऊ शकत नाही. लष्कराने २०१४ मध्ये सत्तापालट केला होता. पूर्वी लष्करी सत्तापालटाचे सूत्र थायलंडच्या राजकारणाचा एक भाग होते. त्याची सुरुवात संविधान बदलण्यापासून व्हायची. त्यानंतर निवडणुका व्हायच्या आणि सरकारवर भ्रष्टाचाराचे आरोप व्हायचे. ते राज्य करण्याचा नैतिक अधिकार गमावायचे, त्यानंतर लष्कराकडून सत्तापालट व्हायचा. यानंतर, सत्ता हस्तगत करणारे लष्करी जनरल नवीन संविधान तयार करायचे. तिथे अनेक वेळा सत्तापालट झाला आहे. लष्कराने देशात अनेक वेळा सत्तापालट केले आहेत, आता प्रश्न असा उद्भवतो की हे पुन्हा घडू शकते का? थायलंडच्या कमकुवत लोकशाही व्यवस्थेमुळे सैन्य सत्ता हस्तगत करण्याची शक्यता नेहमीच असते. सध्याचे संविधान हे देशाचे विसावे संविधान आहे. २०१७ मध्ये लष्करी राजवटीत ते स्वीकारण्यात आले. हे संविधान लष्कराच्या देखरेखीखाली असलेल्या सैन्यसमर्थक समितीने तयार केले आहे. त्यात असे अनेक कायदे आहेत, ज्यात राजकीय पक्ष आणि राजकारण्यांना कमकुवत ठेवता येते. या अंतर्गत राजकीय पक्ष आणि राजकारण्यांना बंदी घालता येते. न्यायव्यवस्थेच्या सहकार्याने या संविधानाखाली सरकारांना अस्थिर आणि कमकुवत ठेवता येते. संवैधानिक न्यायालयाने गेल्या २० वर्षांमध्ये सहा पंतप्रधानांना निलंबित केले आहे. देशाच्या कमकुवत लोकशाही व्यवस्थेमुळे हे शक्य झाले आहे.

कंबोडिया आणि थायलंडमधील संबंध नेहमीच तणावपूर्ण राहिले आहेत. दोन्ही देशांमध्ये जमिनीवरून बराच काळ वाद आहे. दोन्ही बाजूंनी या मुद्यावर राष्ट्रवादी भावना वर्चस्व गाजवतात आणि एकमेकांकडे संशयाने पाहतात. त्याच वेळी दोन्ही देशांच्या राजकीय कुटुंबांमधील, म्हणजेच शिनावात्रा आणि हुन कुटुंबांमधील वैयक्तिक राजनैतिक संबंधांमुळे, परिस्थिती कधीही स्फोटक बनू शकते. असे घडते, तेव्हा दोन्ही देशांमधील सीमा बंद होतात. या वेळीही थायलंडने काही तेल पाईपलाईन बंद केल्या. कंबोडियाने थायलंडमधून फळे आणि अन्नपदार्थांच्या आयातीवर बंदी घालून प्रत्युत्तर दिले. परिस्थिती तणावपूर्ण होते, तेव्हा दोन्ही देश सीमेवर आपले सैन्य तैनात करतात. हे अनेकदा घडते; परंतु दोन्ही देशांच्या नेत्यांमधील टेलिफोन संभाषण लीक झाल्यामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली. दोन्ही देशांच्या प्रमुख राजकीय कुटुंबांचे अनेक दशकांपासून जवळचे संबंध आहेत. थाक्सिन यांना थायलंडच्या पंतप्रधानपदावरून काढून टाकण्यात आले, तेव्हा हुन सेन कंबोडियाचे पंतप्रधान होते. त्यांनी थाक्सिन यांना वरिष्ठ सल्लागार म्हणून कंबोडियाला आमंत्रित केले होते. हुन सेन हे ३०-३५ वर्षांपासून कंबोडियाच्या राजकारणात आहेत आणि तत्कालीन पंतप्रधान हुन मानेट यांचे वडील आहेत. हुन सेन यांचे पुत्र उपपंतप्रधान आहेत.

आग्नेय देशांमध्ये, एखाद्या राजकारण्याने दुसऱ्या देशातील वरिष्ठ राजकारण्याला काका, भाऊ किंवा बहीण असे संबोधणे सामान्य आहे. कंबोडियाचे माजी पंतप्रधान हुन सेन यांनी फोन कॉल लीक होण्याचे समर्थन केले आणि म्हटले की त्यांनी पारदर्शकतेसाठी असे केले; जेणेकरून संभाषणाचा वेगळा अर्थ काढला जाऊ नये. असे असले, तरी एखाद्या देशाच्या पंतप्रधानांचे कॉल लीक करणे हे योग्य पाऊल मानले जाऊ शकत नाही. हुन सेन कंबोडियाच्या परराष्ट्र धोरणावर आपली पकड असल्याचे दाखवू इच्छित असतील. ते याद्वारे देशाच्या आर्थिक समस्यांवरून लोकांचे लक्ष वळवू इच्छित असतील. थायलंड हा आग्नेय आशियातील एक प्रमुख निर्यातदार असून परकीय भांडवल गुंतवणूक आकर्षित करत आहे; परंतु गेल्या वीस वर्षांमध्ये राजकीय अस्थिरतेमुळे हा देश या बाबतीत शेजारील देशांपेक्षा मागे पडला आहे. सध्याच्या अस्थिरतेमुळे थायलंडसाठी फायदेशीर करार करणे सोपे होणार नाही. देशातील अस्थिर आघाडी सरकारला जगासोबतच्या व्यापार धोरणांवर लक्ष केंद्रित करणे कठीण होत चालले आहे. थायलंडमध्ये जून २०२७ पूर्वी सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत; परंतु अशी भीती आहे की मध्यावधी निवडणुका झाल्या तरी परिस्थितीत बदल होणे अवघड आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

---

## वेध

# व्यापारयुद्धात भारताची क्षमता

**पुंडलिक आंबटकर**

रशियाकडून कच्चे तेल खरेदी करून भारत इतर देशांना विकत असल्याच्या सबबीवर अमेरिकेने व्यापारयुद्ध छेडले आहे. वास्तविक अमेरिकेला भारतीय बाजारपेठ काबीज करायची आहे आणि त्यांना प्रामुख्याने आपली कृषी उत्पादने भारतात विकायची आहे. असे झाल्यास भारतीय शेतकरी नेस्तनाबूत झाल्याशिवाय राहणार नाही. अमेरिकेने भारतीय उत्पादनांवर आयात शुल्क लादून दबाव आणण्याचा प्रयत्न चालविला आहे. परंतु, भारतीय शेतकऱ्यांच्या हिताशी कोणतीही तडजोड स्वीकारली जाणार नाही, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ठणकावून सांगितले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प स्वत: एक व्यापारी आहेत. त्यामुळे ते होईल त्या मार्गाने आपल्या देशाला आर्थिक लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न करीत आहेत. अमेरिका ३० ट्रिलियन डॉलर्सची महासत्ता आहे. परंतु, या देशावर वेगवेगळ्या प्रकारचे तब्बल ३७ ट्रिलियन डॉलर्स इतके कर्ज आहे! भारत झपाट्याने वेगवेगळी शिखरे पादाक्रांत करीत आहे. काही दिवसांपूर्वी अमेरिकन बनावटीचे इंग्लंडचे एक अत्याधुनिक लढाऊ विमान भारतीय हद्दीत घुसले होते. परंतु, भारतीय तंत्रज्ञानाने हे विमान काही क्षणातच तांत्रिकदृष्ट्या निकामी केले. तेव्हापासून अमेरिकेसह नाटो देशांची झोप उडाली आहे. आता ट्रम्प यांनी कुठलाही दूरगामी विचार न करता भारत आणि ब्राझीलवर व्यापारयुद्ध लादले आहे. त्यामुळे जागतिक पटलावर नवी समीकरणे तयार होऊ लागली आहेत. अमेरिका भारताचा सर्वांत मोठा व्यापारी भागीदार आहे. २०२४-२५ या वर्षात भारत-अमेरिकेत तब्बल १२४ अब्ज डॉलर्सचा व्यापार झाला. २०३० पर्यंत हा व्यापार ५०० अब्ज डॉलर्सवर नेण्याचे उद्दिष्ट दोन्ही देशांचे होते. परंतु, राष्ट्रवादी विचारसरणीचे ट्रम्प निवडून आले आणि एकाएकी सर्व चित्रच पालटले. डोनाल्ड ट्रम्प यांच्या विजयात भारतीय वंशाच्या नागरिकांचा मोठा वाटा आहे. प्रचार काळात ट्रम्प यांनी या नागरिकांना अनेक आश्वासने दिलीत. परंतु, निवडून आल्यानंतर त्यांची वागणूक पाहता 'हे तेच ट्रम्प आहेत का?' असा प्रश्न पडतो.

भारत सर्वांत मोठा तांदूळ निर्यातदार आहे. भारतात पिकणाऱ्या तांदळाला जगात विशेष मागणी आहे. यामुळे भारतीय शेतकऱ्यांच्या पदरी चार पैसे अधिकचे पडतात. ट्रम्प यांच्या व्यापारयुद्धाचा फटका तांदूळ उत्पादकांनाही बसणार आहे. अमेरिकेत सोयाबीन, मका, इथेनॉल, दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. अमेरिकेची कृषी उत्पादने उच्चत्तम हायब्रीड श्रेणीतील असतात. तिथे प्रचंड उत्पादन होत असल्याने ही उत्पादने खूपच स्वस्त असतात. अशा परिस्थितीत भारताने अमेरिकेची कृषी उत्पादने आयात केलीच तर भारतीय कृषी क्षेत्राचा पाया ढासळल्याशिवाय राहणार नाही. आधीच सोयाबीन उत्पादक नापिकीमुळे मोठ्या प्रमाणात आत्महत्या करीत आहे. अशा परिस्थितीत अमेरिकेची कृषी उत्पादने आयात केल्यास भारतातील गोरगरीब शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याशिवाय पर्याय उरणार नाही. मात्र, आता देशात कणखर आणि सक्षम सरकार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी काळजी करू नये. पर्यायी मार्ग शोधण्याचा प्रयत्न सुरू आहे आणि यात सरकार नक्कीच यशस्वी होईल. जगात भारतीय तंत्रज्ञानाचा डंका वाजत आहे. परंतु, आजही अनेक बाबतीत आपण पिछाडीवर आहोत. लढाऊ विमानांचे इंजिन आपल्याला किमान आज तरी इतरांकडून प्राप्त करावे लागते. भारताने अमेरिकेचा दबाव झुगारल्याने ट्रम्प नव्याने काही निर्णय घेऊ शकतात. असे झालेच तर गूगल, फेसबुक, युट्यूब, इन्स्टाग्राम आदींचे नवे पर्याय आपल्याला शोधावे लागतील. या कंपन्या अमेरिकेच्या आहेत आणि आज त्यांना सर्वाधिक कमाई भारतातूनच प्राप्त होते. प्रत्युत्तर म्हणून भारताला या कंपन्यांवर विशिष्ट शुल्क आकारता येईल. परंतु, तसे करणे धोक्याचे ठरू शकते. त्यापूर्वी पर्यायी व्यवस्था निर्माण करावी लागेल आणि या दिशेने प्रयत्न सुरू झाल्याचे समजते. परंतु, कुठल्याही तंत्रज्ञानाची कॉपी करून आपण यशस्वी होऊ शकत नाही. त्यामुळे नागरिकांना ठोस असे पर्यायी स्वदेशी तंत्रज्ञान उपलब्ध करून द्यावे लागतील. तेव्हाच त्यांचा विश्वास बसेल आणि आत्मनिर्भर भारत या संकल्पनेचे उद्दिष्ट वेगाने मार्गी लागेल. १ जुलै २०१५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डिजिटल इंडिया हा दूरगामी कार्यक्रम सुरू केला आणि पाहता पाहता संपूर्ण देश डिजिटल करून दाखविला. भारतीय नागरिकांनी यूपीआय आणि फोन पे या पर्यायांचाच वापर करावा. कारण, या सुविधा भारतीय आहेत. गूगल पे व अन्य कमी दर्जाच्या विदेशी सुविधा तसेच वस्तूंचा वापर टाळला पाहिजे. सरकारकडून तसे आवाहन करण्यात येत आहे आणि संकट काळात सरकारच्या पाठीशी राहणे हे प्रत्येकाचे राष्ट्रीय कर्तव्य आहे.

९८८१७१६०२७

---

## प्रासंगिक

# विदर्भाची नीलक्रांती : मत्स्य व्यवसायाची पहाट

**शुभम सोनी**

महाराष्ट्र राज्याचा अविभाज्य भाग असलेला विदर्भ प्रदेश कृषी आव्हानांसाठी ओळखला जातो. तथापि, आता त्याच्या विशाल गोड्या पाण्याच्या साठ्यांमध्ये शांत क्रांती घडत आहे. किनाऱ्यापासून दूर असूनही विदर्भात हजारो प्राचीन, मानवनिर्मित तलाव आहेत; ज्यात मत्स्य व्यवसायासाठी प्रचंड क्षमता आहे. या नैसर्गिक संसाधनांचा अनेक दशकांपासून कमी वापर झाला होता, परंतु सध्या या प्रदेशाच्या आर्थिक परिदृश्यात बदल घडवून आणण्यासाठी दोन मोठे बदल घडत आहेत. पहिले, ऐतिहासिक मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन आणि दुसरे, मत्स्य व्यवसायाला कृषी दर्जा देण्याचा महाराष्ट्र सरकारने घेतलेला ऐतिहासिक निर्णय.

**मालगुजारी तलाव : प्राचीन जलस्रोतांचे पुनरुज्जीवन**

पूर्व विदर्भात सुमारे ७,००० मालगुजारी तलाव आहेत, जे दोन शतकांपूर्वी बांधलेल्या पारंपरिक पाणी साठवण संरचना आहेत. ऐतिहासिकदृष्ट्या हे तलाव ग्रामीण अर्थव्यवस्थेची जीवनरेखा होते, भातशेतींना सिंचन करत होते तसेच स्थानिक माशांच्या उत्पादनालाही आधार देत होते. कालांतराने दुर्लक्ष आणि गाळ साचल्यामुळे अनेक तलावांनी त्यांची उपयुक्तता गमावली. तथापि, २००८ मध्ये सुरू झालेल्या यशस्वी पुनरुज्जीवन चळवळीने भविष्यासाठी एक मजबूत ब्लू प्रिंट सादर केली आहे. भंडाराजवळील जानभोरा तलावाचे पुनर्संचयित करणे हे एक उत्तम उदाहरण आहे. सामुदायिक सहभागाद्वारे गाळ काढण्याच्या प्रयत्नांमुळे तलावाची पाणी साठवण क्षमता लक्षणीयरीत्या वाढली. यामुळे केवळ भूजल पातळी सुधारली नाही आणि आसपासच्या शेती क्षेत्रात उत्पादन वाढले नाही तर माशांच्या उत्पादनातही लक्षणीय वाढ झाली आहे, ज्यामुळे स्थानिक कुटुंबांसाठी उत्पन्नाचा एक महत्त्वाचा अतिरिक्त स्रोत निर्माण झाला आहे. या यशामुळे व्यापक सरकारी उपक्रमांना प्रेरणा मिळाली आहे, जे या प्राचीन संपत्तीला केवळ सिंचनाचे स्रोत म्हणून नव्हे तर भरभराटीच्या मत्स्य व्यवसायासाठी तयार पायाभूत सुविधा म्हणून ओळखतात.

**धोरण बदल : मत्स्य व्यवसायासाठी कृषी स्थिती**

मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन भौतिक पायाभूत सुविधा प्रदान करीत असताना, महाराष्ट्र सरकारच्या अलिकडच्या धोरणात्मक निर्णयामुळे महत्त्वपूर्ण आर्थिक आणि कार्यात्मक चालना मिळते. राज्य सरकारने मत्स्य व्यवसाय क्षेत्राला अधिकृतपणे 'कृषी' दर्जा दिला आहे, जो उद्योगासाठी एक क्रांतिकारी पाऊल मानले जात आहे. या धोरणातील बदलामुळे मत्स्यपालनाचे धोके मूलभूतपणे कमी होतात आणि मत्स्यपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना पारंपरिक शेतकऱ्यांच्या बरोबरीचे स्थान मिळते, ज्यामुळे त्यांना पूर्वी नाकारलेले अनेक फायदे मिळतात. विदर्भातील मासेमार आता कृषी दरांवर अनुदानित वीजपुरवठा, किसान क्रेडिट कार्ड (केकेसी) द्वारे वेळेवर आणि परवडणारे कर्ज आणि नैसर्गिक आपत्तीच्या बाबतीत शेतकऱ्यांच्या बरोबरीने भरपाईसाठी पात्र आहेत. याव्यतिरिक्त त्यांना नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेंतर्गत ६,००० वार्षिक उत्पन्न मदतदेखील मिळेल.

**केंद्रीय योजनांचे योगदान**

राज्य सरकारच्या या प्रयत्नांना केंद्र सरकारच्या दोन पूरक योजनांमधून लक्षणीय चालना मिळते, ज्या भांडवली गुंतवणूक आणि दीर्घकालीन व्यवहार्यता या दोन्ही गोष्टींना संबोधित करतात.

प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना ही मत्स्यपालन क्षेत्रात नीलक्रांती घडवून आणण्याच्या उद्देशाने सुरू केलेली एक प्रमुख योजना आहे, ज्याचे प्राथमिक उद्दिष्ट आधुनिक मत्स्यपालनाचा उच्च प्रारंभिक खर्च कमी करणे आहे. पीएमएमएसवायद्वारे विदर्भातील शेतकरी नवीन तलावांचे बांधकाम, हॅचरीज उभारणे आणि बायोफ्लॉक किंवा रीसर्कुलेटिंग एक्वाकल्चर सिस्टिम (आरएएस) सारख्या उच्च-उत्पादन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे यासह विविध उपक्रमांसाठी महत्त्वपूर्ण क्रेडिट-लिंक्ड भांडवली अनुदान (सर्वसाधारण श्रेणीसाठी ४० टक्के आणि एससी/एसटी/महिलांसाठी ६० टक्के) मिळवू शकतात. याव्यतिरिक्त पीएमएमएसवायची उप-योजना, प्रधानमंत्री मत्स्य किसान समृद्धी सह-योजना (पीएम-एमकेएसएसवाय) मत्स्यपालन क्षेत्राचे औपचारिकीकरण आणि त्याच्या सूक्ष्म आणि लघु उद्योगांना समर्थन प्रदान करण्यावर लक्ष केंद्रित करते. योजनेचे प्रमुख घटक खालील उद्दिष्टे लक्षित करतात-

शेतकऱ्यांसाठी डिजिटल ओळख निर्माण करणे, पीक नुकसानीपासून होणारे धोके कमी करण्यासाठी मत्स्यपालन विम्याच्या खरेदीला प्रोत्साहन देणे आणि गुणवत्ता आणि कार्यक्षमता सुधारण्यासाठी सूक्ष्म आणि लघु उद्योगांना कामगिरी-आधारित अनुदान प्रदान करणे.

**संधींचा संगम**

या बहुआयामी उपक्रमांचा संगम विदर्भातील मत्स्यपालनासाठी एक अद्वितीय अनुकूल परिसंस्था तयार करतो. मालगुजारी तलाव पुनरुज्जीवन विस्तारासाठी भौतिक आणि समुदाय-केंद्रित पायाभूत सुविधा प्रदान करते. राज्याचे 'कृषी स्थिती' धोरण शेतकऱ्यांना कामकाज स्थिरता आणि एक महत्त्वपूर्ण आर्थिक सुरक्षितता प्रदान करते. भांडवली गुंतवणूक सुलभ करणाऱ्या पीएमएमएसवाय आणि औपचारिकीकरण, जोखीम कमी करणे आणि दीर्घकालीन शाश्वततेला प्रोत्साहन देणाऱ्या पीएम-एमकेएसएसवायद्वारे हा पाया मजबूत होतो. एकत्रितपणे हे उपक्रम खऱ्या नीलक्रांतीचा मार्ग मोकळा करत आहेत, स्थानिक समुदायांना सक्षम बनवत आहेत आणि विकासाच्या अभावी असलेल्या प्रदेशात आर्थिक समृद्धीचा एक नवीन अध्याय सुरू करत आहेत.

(पीएचडी विद्यार्थी, आयसीएआर;
केंद्रीय मत्स्य व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई)

---

## वाचक पत्रे

### राज्यातील शेतकऱ्यांना हवा मदतीचा हात

राज्यात यंदा पावसामुळे शेतीचे आणि शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. यामुळे राज्यातील अल्पभूधारक शेतकरीच नव्हे संपूर्ण शेतकरीवर्ग मोठ्या संकटात सापडलेला आहे. यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती बिकटच होत चालली आहे. राज्यातील फक्त विदर्भातीलच नव्हे तर इतरही भागात शेतकरी आत्महत्येचे सत्र सुरूच आहे. शेतकरी आत्महत्या हा मुद्दा केवळ राज्यातील राजकारणासाठी महत्त्वाचा विषय ठरला आहे. तर शेतकऱ्यांचा केवळ राजकारणात भांडवल म्हणून उपयोग होतो आहे. आजही अनेक शेतकरी कर्जमाफी, पिकविमापासून वंचितच आहे. शेती जेवढी फायद्याची तेवढीच ती तोट्याची सुद्धा आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतीचेही मोठे नुकसान होताना दिसते आहे. शेतकऱ्यांना शासनाकडून मदतीचा हात मिळावा म्हणून राज्यात अनेक शेतकरी संघटना, शेतकरी नेते आपापल्या परीने संघर्ष करताना दिसतात. मात्र तरीही ग्रामीण भागातील अनेक शेतकऱ्यांच्या समस्या आजही कायम आहे. शेतमोजणीसाठी अनेकदा शेतकऱ्यांना सरकारदरबारी वारंवार चकरा माराव्या लागतात. आजही अनेक सरकारी कार्यालयात चिरीमिरी दिल्याशिवाय समस्या सुटत नाही. कागदपत्रे मिळत नाहीत. राज्यातील अनेक मतदारसंघात ढगफुटीसदृश पाऊस पडलेला आहे. यामुळे प्रचंड नुकसान झाले आहे. रस्ते, नाले, पुलांची अवस्था बिकट झाली आहे. अनेक ठिकाणची विकासात्मक कामे ढगफुटीमुळे उघड झाली आहे. असो, सांगायचे एवढेच की शासनाने नुकसानग्रस्त भागाचे तातडीने पंचनामे करून ओला दुष्काळ जाहीर करावा व शेतकऱ्यांना योग्य पद्धतीने मदतीचा हात द्यावा हीच अपेक्षा.

**सचिन जगन नागरे**/९६०४३२१४३२

### अमेरिकेला धास्ती बसली

अमेरिकेची मुजोरी आणि दंडेलशाही थांबवायची असेल तर स्वदेशीचा आग्रह अत्यंत महत्त्वाचा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पण या अत्यंत ज्वलंत मुद्याला अग्रस्थानी ठेवले असून स्वदेशी वस्तूंविषयी भावनिक आवाहन केले आहे. भाजप शासित राज्याच्या सर्व मुख्यमंत्र्यांनी जनतेला आवाहन केले असून लवकरच याचे दूरगामी सकारात्मक परिणाम दिसू लागतील. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात ही मोहीम सुरू झाली होती. अनेक शहरांमध्ये 'स्वदेशी मेळा' या नावाने भव्य प्रदर्शन भरत असे. स्वदेशी जागरण मंचने या मोहिमेला व्यापक पाठिंबा दिला होता. केंद्रीय शासन स्तरावर जनजागृती होणे अत्यावश्यक होते. नंतरच्या सरकारने या चळवळीचे वाटोळे केले. आता अनुकूल परिस्थिती निर्माण झाली असल्याने ही मोहीम यशस्वीपणे राबविण्यात आली तर आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेत अजून बदल होईल. शस्त्रनिर्मितीमध्ये भारताने जी उल्लेखनीय प्रगती केली आहे, त्याचीच धास्ती अमेरिकेने घेतली असल्यास नवल ते काय!

**संजय पाठक**/नागपूर

### आपली बोली भाषा

आपल्या देशात अनेक भाषा आहेत. महाराष्ट्रातील मुख्य भाषांचा विचार केला तर मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती व मारवाडी या ऐकायला मिळतात. भाषा हा राजकारणाचा विषय झालेला आपण पाहतो. वास्तविक पाहता देशाचा विचार केला तर आपल्या देशात अनेक भाषा आणि प्रांत अस्तित्वात आहेत. स्वाभाविकपणे तिथल्या चालीरीती व भाषा वेगवेगळ्या आहेत. आज नाही याला कित्येक वर्षांचा इतिहास आहे. आजचा विषय मराठी, हिंदीचा वाद एवढाच आहे. तो राजकारणाचा भाग आहे. एकच छोटासा प्रश्न आहे की ज्यांनी हा वाद सुरू केला तो राजकीय लाभासाठी. ते असो. आपण दिवसभराच्या व्यवहारात किती भाषा वापरतो व त्यातील कोणती भाषा किती जण अन्य भाषांची कुबडी न घेता बोलतात. त्यात मुख्यत: विदेशी भाषेच्या कुबडीचा विषय आहे. विदेशी भाषांत इंग्रजी, उर्दू, फारसीची कुबडी न घेता आपली मातृभाषा तरी आपण बोलतो का? तर आपण बोलताना निश्चितपणे ठरवून अन्य भाषेचा आधार न घेता बोलण्याचा प्रयत्न करावा.

**प्रमोद देशपांडे**/९४२२१०५७२७

### अकरावी ऑनलाईन प्रवेशामुळे शिक्षण कोसो दूर

सध्या अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. एसएससी परीक्षेचा प्रत्येक बोर्डाचा निकाल हा ९० टक्क्यांच्या जवळपास आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची उत्तीर्ण होण्याची संख्या खूप आहे. अकरावी प्रवेशासाठी शासनाने ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवली आहे. ग्रामीण भागात बहुतांश ठिकाणी जिथे दहावा वर्ग आहे तिथे अकरा वर्ग आहे. विद्यार्थ्यांच्या दहाव्या वर्गाच्या गुणांचा विचार करता गुणानुक्रमे सर्वच विद्यार्थ्यांचा नंबर जिल्ह्याच्या किंवा तालुक्याच्या शाळेत लागला नाही त्यामुळे ग्रामीण भागातील शाळेमध्ये त्यांचे नंबर लागले परंतु ग्रामीण भागातील शाळेमध्ये विद्यार्थ्यांना जाण्यासाठी व्यवस्थित रस्ते नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांसमोर शिक्षणाच्या दृष्टिकोनातून गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रक्रियेमुळे काही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहून शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर जाऊ शकतात. प्रशासनाने याकडे वेळीच लक्ष घालून विद्यार्थ्यांची शैक्षणिक समस्या सोडवावी.

**धनंजय पांडे**/अकोला

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### पालिकेच्यावतीने माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

महानगरपालिकेच्या वतीने हरित क्रांतीचे प्रणेते व महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या पुण्यतिथीनिमित्त नेहरू नगर येथील त्यांचे पुतळ्यास मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सुभाष चव्हाण, हिराचंद राठोड, कमांडर अशोकुमार मनचंदा, कुलदिप जगदाळे उपस्थित होते.

### गोशाळांच्या समस्या सोडविण्याची मागणी

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

श्री कट्टेव्वादेवी गोशाळा वडकबाळच्या अध्यक्षा उमा बिराजदार यांनी गोशाळेच्या मागण्या सोडविण्यासाठी आमदार सुभाष देशमुख यांच्याकडे मागणी केल्यानंतर त्यांनी पत्रव्यवहार करून पशूसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे यांच्याकडे मागणी केली आहे. कुरेशी समाजाच्या बंदच्या पार्श्वभुमीवर शेतकरी व पशुपालक आपली जनावरे विकू शकत नाहीत. या परिस्थीतीत पशुपालक व जनावरांना मोठ्या संकटांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे तारणास्तव पशुधन पांजरापोल येथे ठेवावे लागत आहे. त्यामुळे शासनाने गोशाळेसाठी तातडीने ५०/- रुपये प्रति दिन अनुदान मंजुर करावे . देशी गाईसाठी मर्यादीत न ठेवता संपुर्ण गोवंश बैल, म्हैस, बकरी इत्यादी सर्व प्राण्यांवर अनुदान लागू करावे. गोशाळा धारकांनी आपल्या परिसरातील शेतक-यांना मोफत गोबर देण्यासाठी प्रोत्साहन दयावे जेणेकरुन नैसर्गिक शेतीला चालना मिळेल व रासायनिक खतावरील अवलंबित्व कमी होईल. यासाठी पशूसंवर्धन विभागाकडून मंजूरी देण्यात यावे, अशी मागणी आमदार देशमुख यांनी केली आहे.



### हनुमान सार्वजनिक वाचनालय येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**सांगोला, दि. १८ ऑगस्ट -**

श्री हनुमान सार्वजनिक वाचनालय, वासूद, ता.सांगोला येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त कॅनरा बँक, शाखा सांगोला यांचे मॅनेजर रजत जाधव यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीत, राज्यगीत, झेंडागीत, घोषणा विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या आवाजांनी उत्साहवर्धक वातावरण निर्माण झाले. यावेळी सरपंच चव्हाण, उपसरपंच अनिल केदार, सौदागर केदार, मेजर अरूण केदार, सुखदेव सपताळ, दत्तात्रय केदार, भिमराव सावंत, रविकांत मराळ, मोहन पाटील, अंबादास पवार, विलास सावंत, रघुनाथ केदार, आदलिंगे, नारायण भोरे, मोहन साळुंखे, नानासाहेब केदार, बापूराव केदार, रमेश गोडसे, रमेश सावंत, मधुकर पवार, महादेव केदार, कोंडिबा शास्त्रे, पांडुरंग गोडसे, सेनापती केदार, चंद्रकांत केदार, अंकुश केदार, हभप.सदानंद शिंदे, धनंजय शिंदे, मारुती ऐवळे, दादासाहेब ऐवळे, सुजित केदार, सुभाष केदार उपस्थित होते.

# अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्याचे सतर्कतेचे निर्देश

## मुंबईसाठी पुढील १२ तास महत्वाचे

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. १८ ऑगस्ट-**

सर्वत्र सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी मंत्रालयातील राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षात संपूर्ण राज्यातील पावसाच्या स्थितीचा आढावा घेतला. राज्यातील प्रशासकीय यंत्रणेने सतर्क राहून नागरिकांना आवश्यक ते सहकार्य करावे, तसेच घरांच्या पडझडीसाठीची मदत, पंचनामे योग्य पद्धतीने करण्याचे निर्देश दिले.

यावेळी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, माहिती तंत्रज्ञान मंत्री ड. आशिष शेलार, मुख्य सचिव राजेशकुमार, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, आपत्ती व्यवस्थापन अपर मुख्य सचिव सोनिया सेठी, कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव संजय दशपुते तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले.




रत्नागिरी, रायगड आणि हिंगोली जिल्ह्यांत अधिक पाऊस झाला असून, हवामान खात्याने १७ ते २१ ऑगस्टदरम्यान अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. त्यामुळे पुढील काही दिवस सतर्क राहण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले.गेल्या दोन दिवसांत राज्यात विविध घटनांमध्ये सात जणांचा मृत्यू झाला आहे. कोकणातील काही नद्यांनी धोकापातळी ओलांडली असून जळगावमध्ये मोठे नुकसान झाले आहे. अलमट्टीबाबत कर्नाटक सरकारशी सातत्याने संपर्क ठेवला जात असून, सध्या धोका नसला तरी यंत्रणा सतर्क ठेवण्याचे आदेश मुख्यमंत्री यांनी दिले.नांदेड जिल्ह्यातील मुखेडमधील परिस्थिती नियंत्रणात आली असून, विष्णुपुरीकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

छत्रपती संभाजीनगर विभागातील ८०० गावे बाधित झाली आहेत. दक्षिण गडचिरोलीत प्रशासन सतर्क आहे. अकोला, चांदूररेल्वे, मेहकर, वाशिम येथे परिस्थिती पूर्वपदावर येत आहे. विदर्भात प्राथमिक अंदाजानुसार २ लाख हेक्टर क्षेत्रावर पिकांचे नुकसान झाले आहे. मुंबईत आज सकाळपासून अवघ्या आठ तासांत १७० मिमी पाऊस झाला आहे. शहरात पाणी तुंबल्यामुळे दोन ठिकाणी वाहतूक प्रभावित झाली. रेल्वे, मेट्रो व इतर वाहतूक सुरळीत सुरू आहे. पुढील १० ते १२ तास मुंबईसाठी अत्यंत महत्वाचे असून, प्रशासनाने काळजी घेण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. उद्याच्या हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन शाळांना सुटी जाहीर करण्याचा अधिकार स्थानिक प्रशासन व महापालिकांना देण्यात आला आहे.

मुख्यमंत्र्यांनी नागरिकांना दिलेल्या सूचनांमध्ये, एसएमएस अलर्ट पाठवताना वेळेचा अचूक उल्लेख करावा, येणारे अलर्ट गांभीर्याने घ्यावेत, स्वतःची काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. तातडीच्या मदतीसाठी मंत्रालय गाठण्याची गरज नाही, स्थानिक पातळीवरच निधी व अधिकार देण्यात आले आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले. घरांच्या पडझडीसाठीची मदत, पंचनामे योग्य पद्धतीने करण्याचे निर्देशही देण्यात आले. धोक्याची पातळी वाढण्यापूर्वी अन्य राज्यांशी संपर्क साधण्यास सांगण्यात आले. पर्यटकांच्या ठिकाणी पोलिसांनी सतर्क रहावे, दरडी कोसळणाऱ्या भागात आधीच यंत्रणा कार्यरत करावी, तसेच निवारा केंद्रात भोजन, शुद्ध पाणी व पांघरूण यांची पुरेशी सोय करावी, असे आदेश त्यांनी दिले आहेत.

# तिसरी मुंबई आर्थिक विकासाचा नवा अध्याय उघडेल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि . १८ ऑगस्ट -**

मुंबई महानगरक्षेत्राच्या विकासासाठी रायगड जिल्ह्यात तिसरी मुंबई विकसित करण्यात येत आहे. ही आर्थिक विकासाचा नवा अध्याय असेल,असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी केले.

गोल्डमन सॅक्स या आंतरराष्ट्रीय गुंतवणूक बँकेच्या वरळी येथे नव्या, विस्तारित मुंबई कार्यालयाचे उद्घाटन झाले. त्यावेळी गुंतवणूकदारांशी चर्चा करताना ते बोलत होते. मुंबई आणि महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीसाठी हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगून फडणवीस म्हणाले की, गोल्डमन सॅक्ससारख्या जागतिक वित्तसंस्थेचे नवे कार्यालय महाराष्ट्रात उघडले जाणे ही राज्यासाठी अभिमानास्पद असून त्यामुळे कुशल मनुष्यबळ, भक्कम बाजारपेठा आणि गुंतवणूक-अनुकूल वातावरणाची पुष्टी होते. ही घटना महाराष्ट्राच्या आर्थिक क्षेत्रातील नेतृत्वाला अधोरेखित करणारी आहे. खासगी क्षेत्रासोबत भागीदारीतून 'तिसरी मुंबई' घडवण्यासाठी आम्ही काम करत आहोत. तिसऱ्या मुंबईमध्ये आंतरराष्ट्रीय विद्यापीठाची केंद्र उभारण्यात येत आहेत. तसेच वैद्यकीय महाविद्यालयाची उभारली जाणार असून या ठिकाणी इनोवेशन हब उभारले जाणार आहे. त्यामध्ये संशोधनासाठीच्या सर्व सुविधा असतील. तसेच क्वांटम कम्प्युटिंग क्षेत्रातील संशोधनाचीही सोय असेल. ख आधारीत व्यवस्था आणि संशोधन ही असेल. तिसरी मुंबईची सध्याच्या मुंबईसोबत कनेक्टिव्हिटी उत्तम असेल. कोस्टल रोड, अटल सेतू सोबतच सध्या काम सुरू असलेला वरळी - शिवडी लिंक रोडी असेल. मुंबईच्या विकासाला आणखी चालना देण्याचे काम ही तिसरी मुंबई करेल. या क्षेत्राच्या विकासामध्ये खासगी गुंतवणूकदारांनी गुंतवणुकीसाठी पुढाकार घ्यावा. असे सांगून ते म्हणाले की, महाराष्ट्र ही गुंतवणूक स्नेही राज्य आहे.



### गोल्डमन सॅक्सची भारतातली कामगिरी

२०२१ पासून भारतात गुंतवणूक बँक म्हणून मान्यता. २०२४ पासून खझज आणि ब्लॉक ट्रेड्सद्वारे १० अब्जांहून अधिक निधी उभारणारे प्रकल्प पूर्ण. यामध्ये भारतातील सर्वात मोठ्या खझज आणि ब्लॉक ट्रेडचा समावेश. २००६ पासून भारतात ८.५ अब्जांहून अधिक भांडवली गुंतवणूक. सध्या कंपनी भारतात गुंतवणूक बँकिंग, इक्विटी विक्री आणि ट्रेडिंग, फिक्स्ड इनकम सिक्युरिटीज, ॲसेट मॅनेजमेंट आणि संशोधन अशा विविध सेवा पुरवते.

## राजस्व नगर गृहनिर्माण संस्थेसंदर्भातील लेखापरीक्षकांच्या अहवालाची चौकशी करा

### संस्थेचे पदाधिकारी करणार बुधवारपासून प्राणांतिक उपोषण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षकांनी कागदपत्रांची तपासणी न करता येथील राजस्व नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेसंदर्भात अहवाल दिला असल्याचा आरोप करत या प्रकरणी चौकशी करावी या मागणीसाठी बुधवार दि. २० ऑगस्ट २०२५ पासून प्राणांतिक उपोषण करणार असल्याची माहिती चेअरमन शिवाजी बचूटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

विजापूर रोड परिसरात असलेली शासकीय निमशासकीय कर्मचाऱ्यांची राजस्व नगर सहकारी गृहनिर्माण संस्था आहे. यात ६८९ सभासद आहेत. या संस्थेचे नित्य नियमित लेखापरीक्षण होत असते. आजवर यात कुठलाच दोष आढळलेला नाही. संस्थेतील काही असंतुष्ट सभासदांनी २०२२ मध्ये तक्रार केली होती. वास्तविक या तक्रारीत काहीच तथ्य नाही. लेखापरीक्षक संतोष दीक्षित यांना या संस्थेची तपासणी अधिकारी म्हणून नेमणूक करण्याची मागणीही या सभासदांना केली. त्यानंतर दीक्षित यांनी केलेल्या चौकशीत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर खोटेनाठे ताशेरे मारण्यात आले आहेत. विभागीय अधिकाऱ्यांकडे या संबंधात अपील केला आहे. तिथून अद्याप स्थगिती मिळालेली नाही. यासाठी प्रयत्न सुरू आहेत पण या आधीच घाई करून अधिकाऱ्यांवर दबाव टाकून आणि अधिकाऱ्यांच्या सहमतीने संस्थेची चौकशी करून विद्यमान संचालक मंडळावर एक कोटी ३३ लाख इतके रक्कम नियमबाह्य खर्च केल्याचे सांगत या चौकशी आधारावर फौजदारी गुन्हा दाखल करावा अशी शिफारस करण्यात आली आहे. तपासणी न करता चुकीचा अहवाल पाठविला आहे असा आरोप करत हा अहवाल आणि तपासणी करणारे संबंधित लेखापरीक्षक तसेच मागणी करणाऱ्या सभासदा विरोधात संचालक मंडळ पुनम गेट समोर उपोषण करणार असल्याचेही शिवाजी बचुटे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस संचालक परमेश्वर जावळकोटी, चनबसवेश्वर सोलापूरे, हनुमंत बिराजदार, दत्तात्रय सुतार, अंबादास हचाटे, पंढरीनाथ पवार, भारत चटके आदी उपस्थित होते.



### मुख्यमंत्री देवा भाऊंना रंजीता चाकोते यांनी बांधली राखी

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोलापूर दौऱ्यावर आले असता त्यांचे आरतीने औक्षण करून भाजपच्या नेत्या रंजीता चाकोते यांनी राखी बांधली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी रंजिता चाकोते यांनी करत असलेल्या कार्याचे कौतुक करून बहिणीला शुभेच्छा दिल्या. हा क्षण माझ्यासाठी आयुष्यातील अभिमानास्पद आणि भावनिक ठरला अशी प्रतिक्रिया चाकोते यांनी व्यक्त केली.


## ग्रामपंचायत उंदरगाव, ता. माढा, जि. सोलापूर

### टेंडर नोटीस

ग्रामपंचायत सुंदर गांय ता माढा यांचेकडून खालील काम करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून बंद लखोत्यात निविदा मागविण्यात येत आहे

**लेखाशिष : १५ वा वित्त आयोग**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | गावठाण अंतर्गत पाणीपुरवठा हौद | ३,२०,००० | - | १०० | ६ महिने | सु.बे.अ. |
| २. | गावठाण अंतर्गत भूमिगत गटार करणे | २,३०,००० | | | | |

टीप :
१) कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी दि: १९/०८/२०२५ सकाळी १०.०० पासून
२) भरलेल्या निविदा स्वीकारण्याच्या दिनांक २१/०८/२५ पर्यंत सकाळी १० ते ६ वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय उंदरगाव
३) निविदा उघडणेचा दिनांक २२/०८/२५ रोजी सकाळी ११.०० वाजता
४) निविदे संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ व २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील
५) निविदा मंजूर/ नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा निविदा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच यांना राखून ठेवला आहे.

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रा.पं. कार्यालय, उंदरगाव
ता. माढा, जि. सोलापूर

शिक्का

सही/-
रतन मा. लवटे
सरपंच
ग्रामपंचायत उंदरगाव
ता. माढा, जि. सोलापूर

## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

इंद्रभुवन, रेल्वे लाईन्स, पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, सोलापूर -४१३००१

### सार्वजनिक आरोग्य अभियंता विभाग

जा.क्र./सा.आ.अ./जं.नि./१००९ दि.१८/०८/२०२५

**जाहीर निविदा नोटीस**

सार्वजनिक आरोग्य अभियंता मुख्य कार्यालय ड्रेनेज विभाग व विभागीय कार्यालय क्र. 1 ते 8 साठी ड्रेनेज लाईन क्लिनिंग फ़्लेक्झीवल रॉड पुरविणेकामी सोलापूर महानगरपालिकेमार्फत निविदा https://mahatenders.gov.in/ या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

Tender ID: 2025_SMC_1211364_1

सदर कामाची सविस्तर माहिती https://mahatenders.gov.in/ या संकेतस्थळावर दि.19/08/2025 रोजी पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

सही/- (संदीप कारंजे)
अतिरिक्त आयुक्त - २ तथा
नियंत्रण अधिकारी
सार्वजनिक आरोग्य अभियंता विभाग
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

REG.NO.SUR/NSR/RSR(R)480/2001/DT.:27/6/2001

## उमासा चव्हाण नागरी सहकारी पतसंस्था मर्या. सोलापूर.

परिपूर्ण 'अर्थ' सेवा

२६७/४६, रविवार पेठ, कुचन हायस्कुल रोड, सोलापूर ४१३००५. फोनः २७४१५३१, ३७

**२४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस**

**(फक्त सभासदांकरिता)**

उमासा चव्हाण नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर या संस्थेची २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. ३१/०८/२०२५ रोजी सकाळी ८.३० वा. चव्हाण मोटर्स., अक्कलकोट रोड, सोलापूर. या ठिकाणी बोलविणेत येत आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवरं उपस्थित राहुन सहकार्य करावे,

हि विनंती.

सोलापूर
दिनांक १४/०८/२०२५

शिक्का

सही/-
पी. एन. दुडम
व्यवस्थापक

टीप :
१) सभेपुढील येणारे विषय संस्थेच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आले आहेत. कृपया याची नोंद घ्यावी.
२) कोरमच्या अभावी सभा तहकुब झाल्यास ती सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी एका तासानंतर घेण्यात येईल. अशा सभेस कोरमची आवश्यकता राहणार नाही.

## सावधानतेची जाहिर नोटीस

तमाम लोकांना विशेषत मौजे नारीवाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर व आसपासचे लोकांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की,

१) डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी मौजे नारीवाडी येथील जमीन गट नं. १५५ पैकी याचे क्षेत्र हे. ००-२४ आर याचा आकार ००-६० पैसे, यांसी चतुसिमा संपूर्ण क्षेत्र येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत आतील सर्व तदंगभुत वस्तुसह.

२) सदर जमिनीच्या ७/१२ हक्कपत्रकी जयश्री महादेव शिंदे यांचे नावाची नोंद आहे. परंतु सदर जमिन मुळ मनोहर श्रीपती शिंदे यांची होती. त्यांचा नातू ओम याच्या नावाने सदर जमिन मनोहर यांनी ओम अज्ञान असताना केली होती. त्याप्रमाणे सदर जमिनीच्या ७/१२ हक्कपत्रकी ओम महादेव शिंदे, अ.पा.क. जयश्री महादेव शिंदे अशी नोंद होती. परंतु आता ओम सज्ञान झाला आहे. त्यामुळे अ.पा.क. म्हणून जयश्री यांचे नावे कमी करणे ऐवजी ओमचे नाव कमी होवून जयश्री महादेव शिंदे असे झाले आहे. याचा गैरफायदा घेवून जयश्री महादेव शिंदे या सदर जमिन विक्री करु लागले आहेत. वास्तविक पाहता सदर जमिन विक्री करण्याची कायदेशीर गरज आमचे पक्षकाराचे कुटुंबाला नाही. सावित्राबाई मनोहर शिंदे ही ओम याच्या वडिलांची आई आहेत व ती सध्या वयोवृध्द आहे. तिला उपजिवेका व उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नाही. सावित्राबाई मनोहर शिंदे यांची उपासमार होवू लागलेली आहे. त्याबाबत त्या सदर जमिनीबाबत न्यायालयात दाद मागणार आहेत. तो पर्यंत कोणीही जयश्री महादेव शिंदे व ओम महादेव शिंदे यांचेशी सदर जमिनीबाबत कोणीही कसलाही खरेदीचा, बक्षिसपत्राचा, हस्तांतरणाचा, कसलाही व्यवहार करु नये. याउपरही कोणी तसा प्रयत्न केल्यास तो व्यवहार अथवा तो दस्त आमचे पक्षकाराच्या हक्कावर बंधनकारक राहणार नाही. सदर जमिनीत आमचे पक्षकाराची प्रत्यक्ष वहिवाट कब्जा आहे, कोणाची फसवणुक होवू नये म्हणून ही सावधानतेची जाहिर नोटीस दिली ता. १८/०८/२०२५

सही/-
सावित्राबाई मनोहर शिंदे
रा. नारीवाडी, ता. बार्शी,
(नोटीस देणार)

सही/-
नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट
ॲड. संजयकुमार श्रीराम गुंड लाडोळेकर
Roll No.MH/4413/2011
दिवाणी व फौजदारी न्यायालय, बार्शी.

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि. कि. अर्ज ८९/२०२५
नि. ५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन सो. यांचे कोर्टात**
**(श्रीमती रेवती प्र.बगाडे यांचे न्यायालय)**

१) **हाज्जु फतरु सय्यद,** वय- ५७ वर्षे, धंदा - मजुरी, रा. भोई नगर, शहापूर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर, ह.मु. जहानपूर, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **महेबुब फतरु सय्यद,** वय- ५३ वर्षे, धंदा - मजुरी, रा. सदर
३) **सम्मद फतरु सय्यद,** वय ५२ वर्षे, धंदा शेती, रा. जहानपूर, ता. बार्शी, जि. सोलापूर
— अर्जदार

**विरूध्द**

**कोणी नाही** - सा.वाला

**अर्ज - Bombay Regulation ct section VII प्रमाणे**

ज्या अर्थी, यातील अर्जदाराचे वडिल फतरू शामीर सय्यद हे ता. ११/०५/२०१८ रोजी मौजे जहानपूर, ता. बार्शी येथे मयत झालेले असून त्यांची पत्नी म्हणजे अर्जदारांची आई जैतुनबी फतरु सय्यद ही ता. ०९/०१/२०१४ रोजी मौजे जहानपूर, ता. बार्शी येथे मयत झालेली आहे. मयत फतरू शामीर सय्यद व जैतुनबी फतरु सय्यद यांचे पश्चात यातील अर्जदार नं. १ ते ३ हेच जवळचे व कायदेशीर वारस असल्याने, अर्जदार नं. १ ते ३ यांनी मयत फतरू शामीर सय्यद व जैतुनबी फतरु सय्यद यांचे जवळचे व कायदेशीर वारस ठरवून वारस दाखला मिळणेसाठी या मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी सदर अर्जदार नं. १ ते ३ यांचे व्यतिरीक्त मयत फतरू शामीर सय्यद व जैतुनबी फतरु सय्यद यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. २९/८/२५ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल. कळावे हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सहीशिक्क्यानिशी दिले असे. ता. २५/७/२०२५

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
मा. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर
बार्शी ता. बार्शी

## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढील नेमली तारीखः १७/०९/२०२५
दि.कि.अ.नं. ७४/२०२५
नि.५

**बार्शी येथील मे. अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश सो.यांचे कोर्टात**

**विश्वजीत विनोद देशमुख,** वय १६ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. पिंपळगांव (पा), ता. बार्शी, जि.सोलापूर-अज्ञान याचे अ.पा.क. वडिल
**विनोद भास्कर देशमुख,** वय ४७ वर्षे, धंदा-शेती, पिंपळगांव (पा), ता. बार्शी, जि. सोलापूर
— अर्जदार

**विरुध्द**

**महाराष्ट्र शासन** - सा.वाला

ज्याअर्थी अज्ञान अर्जदाराचे नावावरील डि. सोलापूर, सब डि. वैराग व ता. बार्शी पैकी मौजे पिंपळगांव येथील जमीन ग.नं. १३०/३ क्षेत्र ५ हे.५० आर आकार १० रु. ०४ पैसे यापैकी अज्ञान अर्जदार विश्वजित विनोद देशमुख याचे नांवे असलेली व परवानगीचा विषय असलेले क्षेत्र १ हे.६२ आर आकार ३ रु.०२ पैसे यासी चतुःसिमा पूर्वेस - सदर ग.नं. पैकी वर्षा विनोद देशमुख यांचे क्षेत्र, दक्षिणेस - सदर ग.नं. पैकी आण्णासाहेब भारत पवार यांची जमीन, पश्चिमेस - नदी व उत्तरेस सदर ग.नं. पैकी लक्ष्मण धर्मराज थिटेची जमीन येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक जमीन आतील तदंगभूत वस्तुसह.

वर नमूद मिळकत अज्ञान अर्जदाराचे भविष्यातील शिक्षण व दुसरीकडे सुपीक जमीन खरेदी करणेचा विचार करुन व तसा व्यवहार ठरवून त्याचे अ.पा.क. वडिलानी सदर मिळकत विक्री करणेचा व्यवहार ठरवलेला असून इसाराची रक्कमही स्विकारलेली आहे. तथापी, मिळकतीचे मालक हे अज्ञान असलेने सदर व्यवहारास मा. जिल्हा न्यायालयाची परवानगी आवश्यक आहे. सदरची कृती योग्य व गरजेची असून अज्ञानाचे हिताची आहे, असे कथन करुन अर्जदाराचे वतीने त्याचे अज्ञान पालनकर्ते वडील यांनी मे. न्यायालयात अज्ञानाची मिळकत/हिस्सा विक्री करणेस परवानगी मिळावी असे कथन करून या मे. कोर्टात सदर अज्ञानाची मिळकत विक्री करणेस परवानगीची मागणी केलेली आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांच्या वरील मागणी, कथनां संबंधाने कोणाचे कांही हरकती, तक्रारी, आक्षेप असल्यास वा सदर मिळकतीत अन्य कोणाचे कांही हक्क अधिकार असलेस संबंधीतानी ही जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर पुढील नेमली तारीख १७/०९/२०२५ रोजी या मे. कोर्टात स्वतः अगर माहितगार वकीलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे, हरकती, तक्रारी सादर कराव्यात. मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास मा. कोर्टाचे प्रकरणी पुढील यथायोग्य आदेश होतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दी केले असे. तारीख : १४/०८/२०२५

कोर्टाचा शिक्का

सही/-
अधिक्षक
जिल्हा न्यायालय, बार्शी

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### शुभमन गिलला संघात स्थान मिळणे अशक्य



**मुंबई** : भारताचा कसोटी कर्णधार शुभमन गिलला आशिया चषक टी-२० संघात स्थान मिळणे कठीण जाऊ शकते. गिलला १५ जणांच्या संघात स्थान मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. गिल सध्या आपल्या टी-२० योजनेत बसत नाही, असे भारतीय संघ व्यवस्थापन आणि निवडकर्त्यांचे मत आहे. याचा अर्थ असा आहे की गिल दुबईला जाणाऱ्या विमानात प्रवास करणार नाही कारण भारतीय संघ व्यवस्थापन २०२४ च्या टी-२० विश्वचषकानंतर ज्या खेळाडूंना पाठिंबा दिला आहे त्यांनाच चिकटून राहायचे आहे. निवडकर्त्यांना १९ ऑगस्ट रोजी निवड समितीची बैठक होण्यापूर्वी भारतीय बोर्डाच्या प्रमुखांना परिस्थितीची जाणीव करून देण्यासाठी हे कळवले जाईल. भारतीय संघाचे नेतृत्व सूर्यकुमार यादव यांच्याकडेच राहील. सूर्यकुमारने आपली तंदुरुस्ती चाचणी उत्तीर्ण केली आहे.

### अहमदाबाद मॅराथॉन ३० नोव्हेंबर रोजी

**अहमदाबाद** : अहमदाबाद मॅराथॉनची नववी आवृत्ती ३० नोव्हेंबर रोजी होणार असून ती साबरमती रिव्हरफ्रंटपासून सुरू होईल, अशी घोषणा आयोजकांनी सोमवारी केली. या स्पर्धेत चार शर्यती श्रेणी असतील- पूर्ण मॅराथॉन, अर्ध-मॅराथॉन, १० कि.मी. धावणे आणि ५ कि.मी. धावणे - जे वयोगटातील आणि तंदुरुस्ती पातळीतील सहभागींना आकर्षित करतील. अदानी स्पोर्ट्सलाइनद्वारे आयोजित मॅराथॉन पुन्हा एकदा साबरमती रिव्हरफ्रंटवरून सुरू होईल व ती अटल ब्रिज, गांधी आश्रम आणि एलिस ब्रिजसह शहरातील काही प्रतिष्ठित स्थळांमधून जाईल. ही मॅराथॉन देशाच्या संरक्षण दलांनी देशाच्या सुरक्षिततेत महत्त्वाची भूमिका बजावताना केलेल्या असाधारण प्रयत्नांना सन्मानित करेल. ही मॅराथॉन एक जपलेली परंपरा झाली आहे, हजारो लोक धावण्याच्या या उत्सवात सहभागी होत आहेत, असे अदानी एंटरप्रायझेस लिमिटेडचे संचालक प्रणव अदानी म्हणाले.

### बारावी लडाख मॅराथॉन सप्टेंबरमध्ये

**नवी दिल्ली** : बारावी लडाख मॅराथॉन आगामी ११ ते १४ सप्टेंबर दरम्यान होणार आहे. या लडाख मॅराथॉनमध्ये ३० देशांतील ६ हजारहून अधिक धावपटू सहभागी होतील आणि ५ किमी सामुदायिक धावण्यापासून ते दोन अल्ट्रा-मॅराथॉनपर्यंतच्या सहा शर्यती असतील. जगातील सर्वात उंच एआयएमएस-प्रमाणित (असोसिएशन ऑफ इंटरनॅशनल मॅराथॉन अ‍ॅण्ड डिस्टन्स रेसेस) या कार्यक्रमाच्या कठीण अल्ट्रा-मॅराथॉनमध्ये ७२ कि.मी. खारदुंग ला चॅलेंज आणि ‘सहनशक्ती शर्यतीचे शिखर‘ १२२ कि.मी. सिल्क रूट अल्ट्रा यांचा समावेश असेल. या मॅराथॉन लेह आणि त्यापलीकडे पसरलेले, सहभागी सिंधू नदीच्या काठावर, खारदुंगला, नुब्राच्या उंच खिंडीतून आणि काही सर्वात आकर्षक हिमालयीन परिसरातून धावणार आहे. संपूर्ण वेळापत्रकात पूर्ण मॅराथॉन (४२.१९५ किमी), अर्ध मॅराथॉन (२१ किमी), ११.२ कि.मी. धावणे आणि ‘रन लडाख फॉर फन‘ ५ कि.मी. यांचा समावेश आहे. सिल्क रूट अल्ट्रा ११ सप्टेंबर रोजी सुरू होईल व यात धावपटू १०,००० फूट उंचीवरील क्यागर गावापासून १७,६१८ फूट उंचीवरील खारदुंग ला वरून लेह मार्केटमध्ये १२२ किमीच्या कोर्सवर जातील.

### पंढरपूरच्या रविंद्र निंबाळकर अकादमीचा शानदार विजय



रुद्र चौगुले वेदांत गोंजारी आनंद शेंडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

दिवगंत शिवाजीराव शेंडे चषक क्रिकेट स्पर्धेत पंढरपूरच्या रविंद्र निंबाळकर क्रिकेट अकादमीने शानदार विजय मिळविला.

**दिवगंत शिवाजीराव शेंडे चषक क्रिकेट स्पर्धा**

मेडशिंगी (सांगोला) येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत रविवारी त्यांनी येथील नीलेश गायकवाड क्रिकेट अकादमीस ५ गडी राखून हरविले.

**संक्षिप्त धावफलक**

**एन.जी.सी.ए. अकादमी, सोलापूर** : ३१.३ षटकात सर्व बाद ८६ (आनंद शेंडे २३, आर्यन हांगे १३, रुद्र चौगुले २१/३, वीर कोळेकर २२/४) पराभूत विरुद्ध

**आरएनसीए. अकादमी, पंढरपूर** : ३४ षटकात ५ बाद ८८ (वेदांत गोंजारी नाबाद २८, विहान मुसळे १५, रुद्र चौगुले नाबाद १०, अनुज वाल्मिकी २७/१, आनंद शेंडे १४/२).

# आकाश, ईशान दुलीप करंडकाला मुकणार

## अभिमन्यू ईश्वरन् पूर्व विभागाचे नेतृत्व करणार



अभिमन्यू ईश्वरन्  आकाश दीप  ईशान किशन

**♦ कोलकाता, १८ ऑगस्ट**

भारताचा वेगवान गोलंदाज आकाश दीप आणि यष्टिरक्षक-फलंदाज व पूर्व विभागाचा कर्णधार ईशान किशन उत्तर विभागाविरुद्ध दुलीप करंडकाच्या उपांत्यपूर्व सामन्याला मुकणार आहेत, कारण दोन्ही खेळाडू त्यांच्या दुखापतींमधून बरे होत आहेत.

हंगामातील सुरुवातीचे दुलीप करंडक सामने २८ ऑगस्टपासून बंगळुरूमधील बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स मैदानावर होणार आहेत, परंतु आकाश अद्याप पाठीच्या दुखापतीतून पूर्णपणे बरा झालेला नाही, त्यामुळे त्याला अलिकडच्या इंग्लंड दौऱ्यात दोन कसोटी सामन्यांना मुकावे लागले. २८ वर्षीय या खेळाडूच्या जागी बिहारच्या मुख्तार हुसेनने पूर्व विभागाच्या संघात स्थान मिळवले आहे. बंगालचा वेगवान गोलंदाज आकाशने इंग्लंडविरुद्ध १३ बळी टिपण्याची प्रभावी कामगिरी केली होती, यात बर्मिंगहॅम येथे १० बळींचा सामना व ओव्हल येथे झालेल्या पाचव्या कसोटीत पहिल्या कसोटी अर्धशतकाचा समावेश आहे. आकाशने वैद्यकीय सल्ल्यानुसार विभागीय निवड समितीला आपल्या अनुपस्थितीची माहिती दिली आहे. तो सध्या सीओईमध्ये पुनर्वसन प्रक्रियेतून जात आहे आणि २ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या वेस्ट इंडीजविरुद्धच्या घरच्या कसोटी मालिकेदरम्यान तो पुन्हा मैदानात उतरण्याची शक्यता आहे.

**ईशान हाताच्या दुखापतीतून सावरतोय्**

ई-बाईकवरून पडल्यानंतर ईशान किशनच्या हाताला काही टाके पडले आहेत आणि तो सध्या बंगळुरूमधील सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये बरा होत आहे, असे किशनच्या जवळच्या सूत्रांनी सांगितले.

दुखापत गंभीर नाही, परंतु खबरदारी म्हणून त्याला विश्रांती घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. पुढील महिन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्ध घरच्या मैदानावर होणाऱ्या दोन चार दिवसांच्या सामन्यांसाठी तो भारत अ संघासाठी तंदुरुस्त असण्याची अपेक्षा आहे.

किशनच्या अनुपस्थितीत बंगालचा अव्वल क्रमांकाचा फलंदाज अभिमन्यू ईश्वरन् याला पूर्व विभागाचा कर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे, तर आसामचा अष्टपैलू रियान पराग त्याचा उपकर्णधार असेल.

इंग्लंडविरुद्धच्या ओव्हल येथे होणाऱ्या पाचव्या आणि शेवटच्या कसोटी सामन्यापूर्वी जखमी ऋषभ पंतच्या जागी ईशान किशनला संधी देण्यात आली होती.

**सुधारित पूर्व विभागीय संघ** : अभिमन्यू ईश्वरन् (कर्णधार), रियान पराग (उपाध्यक्ष), संदीप पटनायक, विराट सिंग, दिनिश दास, श्रीदाम पॉल, शरणदीप सिंग, कुमार कुशाग्र (यष्टिरक्षक), आशीर्वाद स्वेन (यष्टिरक्षक), उत्कर्ष सिंग, मनीषी, सूरज सिंधू जयस्वाल, मुकेश कुमार, मुख्तार हुसेन आणि मोहम्मद शमी. ◀(वृत्तसंस्था)

### मोहन बागानचा शिबिरासाठी खेळाडूंना सोडण्यास नकार

**कोलकाता** : मोहन बागान सुपर जायण्टने भारताच्या चालू राष्ट्रीय शिबिरासाठी आपल्या खेळाडूंना सोडम्यास नकार दिला आहे. नवीन मुख्य प्रशिक्षक खालिद जमील यांच्या नेतृत्वाखाली आयोजित होणारा हा पहिलाच शिबिर आहे आणि आशियाई फुटबॉल असोसिएशनद्वारे २९ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर दरम्यान ताजिकिस्तान आणि उझबेकिस्तानमध्ये आयोजित नेशन्स कपच्या दुसऱ्या आवृत्तीच्या तयारीसाठी हे शिबिर आहे. इंडियन सुपर लीग विजेता असलेल्या मोहन बागानने म्हटले आहे की ते आंतरराष्ट्रीय कर्तव्यासाठी नियुक्त केलेल्या विंडोच्या बाहेर खेळाडूंना सोडण्यास नियमांनी बांधील नाहीत.

# पहिल्या तिरंदाज प्रीमियर लीगमध्ये अव्वल भारतीय खेळाडू भाग घेणार

**♦ नवी दिल्ली, १८ ऑगस्ट**

देशात प्रथमच होणाऱ्या तिरंदाज प्रीमियर लीगमध्ये (एपीएल) दीपिका कुमारी, धीरज बोम्मदेवरा, ज्योती सुरेखा वेन्नम आणि अभिषेक वर्मा यांच्यासह भारतातील अव्वल तिरंदाज पहिल्या तिरंदाज प्रीमियर लीग (एपीएल) मध्ये भाग घेणार आहेत.

सहा फ्रॅन्चायझी आधारित एपीएल स्पर्धा ही तिरंदाजीमधील पहिला जागतिक उपक्रम आहे. ऑक्टोबरमध्ये यमुना क्रीडा संकुलात ११ दिवसांच्या या स्पर्धेसाठी जगभरातील आघाडीच्या रिकर्व्ह आणि कम्पाऊंड तिरंदाजांना एकत्र आणणार आहे.

भारतीय तिरंदाजांशिवाय जागतिक तिरंदाजी आणि आशियाई महासंघाकडून पाठिंबा मिळालेल्या पहिल्या एपीएलमध्ये अव्वल क्रमांकाच्या आंतरराष्ट्रीय तिरंदाजांचाही सहभाग असेल व त्यांना सहा फ्रॅन्चायझींमध्ये विभागले जाणार आहे, परंतु त्यांची नावे अद्याप जाहीर झालेली नाहीत.

पहिल्या हंगामात लिलावाऐवजी ड्राफ्ट सिस्टमचा अवलंब होण्याची शक्यता आहे, यात प्रत्येक संघात आठ सदस्य असतील- चार पुरुष आणि चार महिला. संघांमध्ये जास्तीत जास्त दोन परदेशी तिरंदाजांचा समावेश असू शकतो, त्यापैकी किमान एक खेळाडू प्लेइंग फोरचा भाग असणे आवश्यक आहे.

रिकर्व्ह आणि कम्पाऊंड तिरंदाज फ्लडलाइट्स अंतर्गत एका अनोख्या सांघिक स्वरूपात अनुक्रमे ७० मीटर आणि ५० मीटर तिरंदाजी करतील.



दीपिका कुमारी



ओजस देवतळे

**अव्वल भारतीय तिरंदाजांना पाहून आनंद : अर्जुन मुंडा**

तिरंदाजी प्रीमियर लीगच्या पहिल्या हंगामात भारताच्या सर्वोत्तम तिरंदाजांची उपस्थिती पाहून आम्हाला आनंद होत आहे. यामुळे देशभरातील चाहत्यांसाठी लीग एक रोमांचक उपक्रम बनेल, असे एएआयचे अध्यक्ष अर्जुन मुंडा म्हणाले.

भारतीय तिरंदाजांची निवड जागतिक क्रमवारी तसेच भारतीय तिरंदाज संघटनेच्या अलीकडील निवड चाचण्यांवरून करण्यात आली.

रिकर्व्हमध्ये, जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर असलेली दीपिका आणि जागतिक क्रमवारीत १४ व्या क्रमांकावर असलेला धीरज अनुभवी तरुणदीप राय आणि अतनु दास यांच्यासह मैदानात आघाडीवर आहेत.

इतर महिला रिकर्व्ह तिरंदाजांमध्ये अंकिता भकट व भजन कौर यांचा समावेश आहे, तर पुरुषांच्या श्रेणीत नीरज चौहान, राहुल, रोहित कुमार, मृणाल चौहान, सचिन गुप्ता आणि क्रिश कुमार यांचा समावेश आहे.

कम्पाऊंडमध्ये जागतिक विक्रमवीर ज्योती सुरेखा वेन्नम (क्रमांक ३) आणि जागतिक क्रमवारीत ९ व्या क्रमांकावर असलेला ऋषभ यादव नेतृत्व करत आहेत. त्यांच्यासोबत अनुभवी अभिषेक (क्रमांक १०), प्रथमेश भालचंद्र फुगे (क्रमांक ११), प्रियांश (क्रमांक १६) आणि प्रणीत कौर (क्रमांक १७) आहेत. इतर खेळाडूंमध्ये, अमन सैनी, ओजस देवतळे, साहिल राजेश जाधव आणि चिट्टीबोम्मा जिग्नास पुरुष संघाचे प्रतिनिधित्व करतील, तर प्रीतिका प्रदीप, अवनीत कौर आणि मधुरा धामणगावकर महिला संघाचे प्रतिनिधित्व करतील. ◀(वृत्तसंस्था)




# नेवरेच्या जय शिवशंकर संघास विजेतेपद

### प्रताप क्रीडा मंडळाच्या आट्यापाट्या स्पर्धेतील कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १८ ऑगस्ट-**

प्रताप क्रीडा मंडळ शंकरनगर यांनी आयोजित केलेल्या आट्यापाट्या स्पर्धेत नेवरे (ता. माळशिरस) येथील जय शिवशंकर संघाने विजेतेपद पटकाविले. त्यांनी कचरेवाडीच्या जयबिरोबा संघास हरविले.

शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेचा बक्षीस समारंभ मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते पाटील यांच्या हस्ते पार पडला. विजेत्या व उपविजेत्या रोख रुपये ४४ व ३३ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. तृतीय क्रमांक जय हनुमान संघ, म्हैसगाव (ता. माढा) यांना २२ हजार व चौथा क्रमांक श्रीकृष्ण संघ शिरढोण यांना रोख रुपये ११ हजार देऊन गौरविण्यात आले. उपांत्य फेरीतील श्रीराम संघ संगम, जय हनुमान तालीम संघ नेवरे, जय शंकर संघ नेवरे व शंकरआबा भुसनर संघ १५ सेक्शन यांना प्रत्येकी पाच हजार रुपयांचे बक्षीस देण्यात आले.

या स्पर्धेत सोलापूर, पुणे व सातारा जिल्ह्यातील ४९ संघ सहभागी झाले होते. स्पर्धेला मंडळाचे संस्थापक जयसिंह मोहिते पाटील, मदनसिंह मोहिते पाटील, युवा नेते सयाजीराजे मोहिते पाटील यांनी भेट दिली. तत्पूर्वी स्पर्धेचे उद्घाटन राज्याचे क्रीडा व युवक सेवा संचालनाचे सहाय्यक संचालक मिलिंद दीक्षित यांच्या हस्ते झाले. यावेळी दीपक, प्रदीप खराडे पाटील, महादेव अंधारे, आरती दीक्षित, दिपाली दीक्षित, अथर्व दीक्षित, उपाध्यक्ष पोपट भोसले पाटील, सचिव बिभीषण जाधव, स्पर्धा प्रमुख भीमाशंकर पाटील, बाळासाहेब सावंत, सुभाष चव्हाण आदी उपस्थित होते. स्पर्धा प्रमुख यशवंत माने देशमुख यांनी सूत्रसंचालन केले.

# नडीमेटला, शिंदे, बिराजदार व संगा प्रथम

### महिला पतंजली योग समितीच्या जिल्हा योगासन स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

जिल्हा योगासन स्पर्धेत धनश्री नडिमेटला, रेखा शिंदे, गायत्री बिराजदार व शांता संगा यांनी आपापल्या गटातून प्रथम क्रमांक पटकाविला.

महिला पतंजली योग समितीच्या वतीने रविवारी इंद्रप्रस्थ सभागृहात वरिष्ठ राज्य प्रभारी सुधाताई अल्लीमोरे यांच्या मार्गदर्शनाने योगासन व सूर्यनमस्कार स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत शहर व जिल्ह्यातील २०० स्पर्धक सहभागी झाले होते. या स्पर्धेचे उद्घाटन भाजपच्या शहर अध्यक्षा रोहिणीताई तडवळकर, सामाजिक कार्यकर्त्या चंद्रिका चौव्हान, सुधाताई आळ्लीमोरे, योग तज्ञ माया गांधी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी संपदा जोशी, सांगलीहून आलेल्या राज्य कार्यकारणी सदस्य मंगलताई वैद्य, महिला जिल्हा समितीच्या जिल्हा प्रभारी सुजाताताई शास्त्री, भारत स्वाभिमान महामंत्री संगीता जाधव, माजी जिल्हा प्रभारी रत्नाताई माळी, जिल्हा समितीच्या सदस्य स्वाती राऊत, शोभा तोरंगी, ज्योती दुलंगे, रजनी औसेकर, अलका गवळी, शेळकेताई, सुमित्रा स्वामी, मंदाकिनी स्वामी, रूपल शहा, अविनाश अळीमोरे, श्याम वैद्य, श्री. कांबळे, विजय पवार, योगशिक्षक मल्लिनाथ अतनुरे आदींनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले. स्पर्धेसाठी स्पर्धा समन्वयक म्हणून योगशिक्षक व राज्य पंच संतोष दुधाळ आणि पंच म्हणून नॅशनल योगासन स्पोर्ट फेडरेशनच्या उत्कर्षा कुचन, शकुंतला तुळसे, श्वेता दुस्तकर, वैशाली पाटील, रेणुका राव, विठ्ठल वाघचौरे, विजय कांबळे, गौरीशंकर बिराजदार यांनी काम पाहिले. विजेत्या स्पर्धकांना ट्रॉफी, मेडल, सर्टिफिकेट देऊन सन्मानित करण्यात आले.



**अंतिम निकाल (प्रथम तीन व उत्तेजनार्थ)**

| | |
|---|---|
| वयोगट १२ ते २५ : | धनश्री नडीमेटला, सानवी मोडगी, अनुष्का झाकणे, ऋतिका माळी,कनक शंकू. |
| वयोगट २५ ते ४० : | रेखा शिंदे, स्वाती हुच्चे, ज्योती कुंभार, रोहिणी बिराजदार. |
| वयोगट ४० ते ५० : | गायत्री बिराजदार, वंदना माळी, विजयालक्ष्मी त्रिपाठी, भाग्यरेखा डावरे, ज्योती कंदी. |
| वयोगट ५०च्या पुढे : | शांता संगा, सुजाता दिवटे, मंदाकिनी एलपटे, नीता रघुजी, प्रभा कोडले. |

# आरोग्य व शरीर सुडौल ठेवण्यासाठी आहार महत्वाचा



### योग तज्ज्ञ मनमोहन भुतडा यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

आपले आरोग्य व शरीर सुडौल ठेवण्यासाठी आहार महत्वाचा आहे, असे प्रतिपादन योग तज्ज्ञ मनमोहन भुतडा यांनी केले. योगसेवा मंडळातर्फे आयोजित व्याख्यानमालेचे तिसरे व अंतिम सत्र शिवस्मारक येथे झाले. या वेळी ते मार्गदर्शन करत होते. श्री भुतडा म्हणाले, कोणताही डायट बनवताना तो चविष्ट असेल, अनेक प्रकारचा, सप्तरंगी, वेगवेगळ्या पण आपल्या आहारातील नेहमीच्या पदार्थांनी बनवलेला असावा. तरच त्याचे पालन नेहमी करता येईल. अन्यथा कोणीही त्याचे अनुकरण जास्त दिवस करू शकणार नाही. कंटाळून तो सोडून देईल.

आपले शरीर सुडौल आहे कि नाही, हे ठरवण्यासाठी body mass इंडेक्स पहिला जातो. BMI = Weight in Kgs / height in meters x height in meteres हा १८ ते २५ दरम्यान असावा. ३० पेक्षा अधिक असल्यास व्यक्ती लठ्ठ म्हणजेच स्थूल आहे असे समजले जाते. शरीरामध्ये चरबी वाढल्यास, स्थूलता वाढल्यास ते आरोग्याला घातक तर आहेच पण व्यक्तिमत्व देखील वाईट दिसते. अनेक रोगांना त्यामुळे शरीरात प्रवेश मिळतो. तसेच आहार ठरवताना त्याचे उष्मांक किती किलो केलरीज पाहावे लागतात. याशिवाय त्या खाद्य पदार्थाचा Glycemic Index म्हणजेच त्यामुळे साखरेचे प्रमाण शरीरात किती आणि किती वेगाने वाढेल हेही पाहावे लागते. कोणाचा आहार कसा असावा हे त्याची शरीरयष्टी, वय, आरोग्याची स्थिती, कामाचे स्वरूप इ. गोष्टी लक्षात घेऊन ठरवावे लागते.

यानंतर श्री भुतडा यांनी, वेगवेगळ्या व्याधी/ दुखणी असलेल्या व्यक्तींचा आहार कसा असावा हे विषद केले. स्नायू/अस्थींचे दुखणे, मधुमेह, कावीळ, श्वासमार्गाशी संबंधित रोग, मज्जासंस्थेशी संबंधित व्याधी, पाचन्संस्थेशी निगडित रोग,ज्येष्ठ नागरिक, खेळाडू, मासिक पाळीच्या किंवा गर्भ संस्थेशी संबंधित त्रास यासाठी वेगवेगळे आहार कसे असावेत हे सांगितले. प्रत्येकाला आपले आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी, शरीर सुडौल ठेवण्यासाठी आपला आहार व दिनचर्या कशी असावी हे सविस्तर सांगितले.

यावेळी मीना भुतडा यांनी सर्वाना यौगिक/आदर्श असा अल्पोपहार व ग्रीन टी देला व तो कसा बनवला याचीही माहिती दिली. श्री भुतडा यांनी अनेकांच्या प्रश्नाची उत्तरे समाधानकारक दिली. डॉ. राजेंद्र अग्रवाल यांनी या उपक्रमाबद्दल योगसेवा मंडळ व भुतडा दाम्पत्यांचे आभार मानले. सर्वश्री दीपक मुनोत, रघुनाथ क्षीरसागर, अवताडे, सुभाष गवळी, सुभाष जोशी, व सौ मुनोत, इंदापुरे, दुलंगे, होनमोडे, निंबाळकर इ. मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वश्री सासवडे, रवींद्र सुलाखे, कोंडा, व सौ बिडकर, श्रीमती भागानगरे, जगदाळे यांनी परिश्रम घेतले.



# वरद लिमकरने स्वप्नील हादगल यास हरविले

### कांताबाई प्रभाकर बटगेरी स्मृती चषक बुद्धिबळ स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

कांताबाई प्रभाकर बटगेरी स्मृती चषक जिल्हा बुद्धिबळ स्पर्धेत खुल्या गटात १७ वर्षीय वरद लिमकर याने गत दोन स्पर्धेतील विजेता स्वप्निल हदगलला हरविले. सुंदर मल्टिपल मल्टीपर्पज हॉल येथे आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत १४० खेळाडूंनी भाग घेतला आहे.

पांढऱ्या सोंगट्या घेऊन इटालियन ओपनिंग प्रकाराने डावाची सुरुवात झालेल्या डावात मध्यपर्वापर्यंत डावाची स्थिती समान असतानाच स्वप्निलने केलेल्या एका चुकीने हत्ती गमावला. त्यामुळे व नंतर स्वप्निलचा सहज पराभव झाला. प्रज्वल कोरे, अमित मूदगुंडी, श्रेयस कुदळे, सागर गांधी, श्रेया संदूपटला व देवनपल्ली श्रावणी आणि १४ वर्षे वयोगटात विहान कोंगारी, श्लोक चौधरी, समर्जीत देशमुख, विराज धोंगडे, वाघे मल्हार, सार्थक उंबरे हे खेळाडू ४ पैकी ४गुण घेऊन आघाडीवर आहेत.

या स्पर्धेत ८,९, १०, ११, १२, १३, १४, १७, १९ व खुल्या गटात मिळून ९० चषक देण्यात येणार असून त्याशिवाय रोख २१ हजार रुपयांची बक्षिसे देण्यात येणार आहेत. या स्पर्धेचे उद्घाटन माजी मुख्याध्यापक प्रभाकर बटगेरी यांचे हस्ते झाले. याप्रसंगी प्रयोगशाळा कार्यालय न्याय सहाय्यक डॉ. आनंदा कुदळे, वैशाली गोसावी, सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे सचिव शरद नाईक, प्रमुख पंच प्रशांत पिसे, सुशील कुमारजी शिंदे भावी प्रशाला अध्यक्ष संतोष पैकेकरी, अमर शिंदे आदी उपस्थित होते. या स्पर्धेचे आयोजन वैभव बटगेरी यांनी त्यांच्या आईच्या स्मरणार्थ श्री रमा जगदीश बहुउद्देशीय महिला उत्कर्ष संस्थेच्या वतीने व सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या सहकार्याने करण्यात आले आहे.

## महत्वाचे...




### माणेकरी शिक्षण संकुलात स्वातंत्र्य दिन उत्साहात

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**
माणेकरी शिक्षण संकुलात स्वातंत्र्यदिन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सिद्राम कोनापुरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी न्यायाधिश उमाकांत काळपगार यांच्याहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी बहारदार कवायत प्रकार सादर केले चिमुकल्यांनी सुंदर भाषणे केली. प्रस्ताविक प्राथमिकचे मुख्याध्यापक संतोष फरड यांनी केले. सूत्रसंचालन संजय कुलकर्णी यांनी तर आभार नितीन वाकडे यांनी मानले. याप्रसंगी नारायणराव काळपगार चंद्रकांत कोनापूरे, अमृत गोगी, कृष्णाहारी सुलेगाव, श्रीधर येमेकर, संजीव खराटे, प्रितम मुसपेठ, आनंद कळसकर, सुनिल मुनकमपल्ली, लक्ष्मण गोगी, विजयालक्ष्मी काळपगार, लक्ष्मी दोमा, रजनी काळपगार, सुकन्या रायचूरकर, स्वाती गोगी, सुजाता मुनकमपल्ली उपस्थित होते.



### स्वातंत्र्य दिनानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेनेच्या शाखेचे उद्घाटन

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**
स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेनेच्या शाखेचे उद्घाटन मीनाक्षी चौक नवीन विडी घरकुल येथे करण्यात आले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, राज्य उपाध्यक्ष अमर कुलकर्णी, वाहतूक सेनेचे सोलापूर शहर संघटक जितेंद्र टेंभुर्णीकर, मनविसे जिल्हाध्यक्ष अभिषेक रुंपरे, वाहतूक सेना जिल्हा संघटक प्रसाद कुमठेकर, रोजगार स्वंयरोजगार जिल्हा संघटक गोविंद बंदपट्टे यांच्या हस्ते शाखेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी नागेश बंडा, मारुती संगा, अजिंक्य टेंभुर्णीकर, सैफन जामखंडी, समर्थ माळगे उपसंघटक ,जाफर अली, अफ्जल शेख, अभिषेक इरकल, बाळू मच्छिंद्र माचल, नितीन काजळे, संभाजीनगर अनिल अगनुर, गणेश गडगी, सतीश सब्बन, नागेश मच्छा उपस्थित होते.



### तडकल स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**
जुळे सोलापुरातील तडकल इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. सचिन खोकले, नितेश हजारे,शाळेचे संस्थापक प्रदीप तडकल, प्राचार्या पल्लवी तडकल यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. प्रांरभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीत व प्रार्थनेनंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी कवायती सादर केल्या. त्यानंतर मानवंदना देण्यात आली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. शिक्षिका बानूबाई शेख यांनी प्रास्ताविक केले तर प्राचार्या पल्लवी तडकल यांनीआभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रिया तडकल, नम्रता बनसोडे, भरती माडे, बाबुराव अलुरे, शौकत मिस्त्री, कृष्णा कोकाटे, पवन बिराजदार, गणेश बिराजदार, अथर्व माने, अंकिता माने, संस्कार शेंडगे, प्रणाली चव्हाण, आदित्य माने यांनी परिश्रम घेतले.

### स्वातंत्र्यदिनानिमित्त भटक्या श्वानांना दिले अन्न

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**
स्ट्रीट पॉसच्या वतीने स्थापन केलेल्या ऑटो डॉग फिडर येथे स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला व भटक्या श्वानांसाठी अन्न देण्यात आले. नुकत्याच आलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार दिल्ली आणि NCR भागातील भटक्या श्वानांना पुनर्वसन केंद्रात सोडण्याच्या निर्णयाने इतर



प्राण्यांप्रमाणे श्वानांना मुक्तपणे जगण्याचा अधिकार हिरावून घेण्याचा जो निराशाजनक निर्णय कोर्टाने दिला. त्यामुळे देशभरातील हजारो प्राणी प्रेमी लोकांच्या भावना दुखावल्या गेल्या असून, आम्ही सोलापूर स्ट्रीट पॉस च्या वतीने या निर्णयाचा निषेध करत पुनर्वसन केंद्राशिवाय इतर पर्याय वापरून श्वान आणि नागरिक दोघांनाही त्रास होणार नाही. अशा निर्णयाची अपेक्षा सर्वोच्च न्यायालयाकडे करण्यात आली. या श्वानांना मुक्तपणे जगण्याचा अधिकार मिळवून देण्यासाठी सर्व नागरिकांनी एकत्रित येण्याचे आवाहन यशवंत राऊत यांनी केले.

# सततच्या पावसाने पिके पिवळी पडू लागली

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि १८ ऑगस्ट-**



गेली आठ दिवसा पेक्षा अधिक काळापासुन अक्कलकोट तालुक्यात पावसाच्या वारंवार सरी कोसळत आहेत . सलग आठ दिवसा पेक्षा अधिक काळा पासुन पावसाला खंड नाही पिकांच्या वाडीसाठी सुर्यप्रकाश पडणे गरजेचे आहे . मात्र तालुक्यातील बहुतांश भागात म का बाजरी ज्वारी उडीद मुग तुर ही पिके सततच्या पावसाने पिवळी पडत आहेत . काही ठिकाणे पिकात पाणी थांबले आहे तरी काही ठिकाणी काढणीला आलेल्या मुग पिकास मोठा फटका बसला आहे . कापणी केलेल्या पिकालाही पावसाने फटका बसला आहे . शेतकऱ्यांचे यंदा अधिक पावसाने खरीप पिकाना मोठा फटका बसलेला आहे खरीप बाधीत पिकाचे त्वरीत पंचनामे करावेत अशी मागणी लहुजी शक्ती सेना जिल्हा संपर्क प्रमुख वसंत देडे शिवसेना उद्धव बाळासाहेबां ठाकरे गटाचे तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे यांनी केली आहे

अक्कलकोट तालुक्यात यंदा मे म हिन्यातच पावसाने हजेरी लावल्याने खरीप पेरणी जुन च्या पहिल्याच आठवड्यात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी उरकुन घेतली . अक्कलकोट शहर परिसरात राम पुर इटगे बोरी उमरगे मिरजगी निमगाव चिक्केली सलगर कडबगाव काझीकणबस पालापुर हसापुर बॅगेळी नागनाळी मातनाळी बासलेगाव उडगी डिग्गेवाडी सांगवी कोळेगाव चुंगी हन्नुर कुरनुर सिंदखेड किणी वागदरी भुटीकवठा हैद्रा तोळणुर नागणसुर जकापुर मराठवाडी गुरववाडी उडगी दहिटणे चप्पळगाव मोटाळ दहिटणेवाडी हंजगी कर्जाळ कोन्हाळी आदि बहुतांश भागात यंदा खरीप पेरणी मका बाजरी तुर उडीद मुग सुर्यफुल आदि पिकांची पेरणी खरीप पेरणी उदिष्टापेक्षा अधिक पेरणी झाली . काही काळ पावसाने ओढ दिली होती मात्र मोक्याच्या क्षणी पाऊस परत आला पिके बहरली होती.

काहीचे उडीद मुग काढणी ला आले काहींनी कापणी केली मळणी करण्याचे आहे मात्र गेली आठ दिवस रुलग पावसाची उघडीप नाही . वारंवार कमी कधीक स्वरुपात पाऊस चालू आहे अनेकांची पिके पाण्यात उभी आहेत . अनेकांची पिके वारंवारच्या पावसाने पिवळी पडण्यास सुरवात झाली आहे.

हातातोंडाशी आलेले उडीद मुग सततच्या पावसाने कुजण्याची पाणी लागून जळण्याची भिती आहे . मळणी साठी कापलेले पिक उघडीप नसल्याने बुरशी लागण्या ची कोंब फुटण्याची पिकांची मोठी नासाडी होण्याच्या स्थिती मध्ये आहे तुर पिक तरी पावसाने पिवळी पडून जळण्याची भिती आहे . तालुक्यातील खरीप पिकाच्य उत्पादनावर यंदा मोठा परिणाम होण्याची शक्याता आहे बाधीत पिकाचे पंचनामे त्वरीत करण्यात यावेत अशी मागणी लहुजी शक्ती सेना सोलापुर जिल्हा संपर्क प्रमुख वसंत देडे शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गट शिवसेना तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे यांनी केली आहे.

### उत्कर्ष विद्यालयात स्वातंत्र्य दिन साजरा

**सांगोला,दि. १८ ऑगस्ट -**



उत्कर्ष विद्यालयात स्वातंत्र्य दिन सोहळा साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यालयाच्या परंपरेनुसार इ.५ वी शिष्यवृत्तीमध्ये राज्य गुणवत्ता यादीत १६ वे स्थान पटकावलेली विद्यार्थिनी मनस्वी मंगेश कुलकर्णी हिच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत, झेंडागीत, राज्यगीत यांचे सादरीकरण तवला व पेटीच्या तालावर केले. इ.९ वीच्या विद्यार्थ्यांनी संचलन केले. प्र यावेळी सूर्योदय फाउंडेशनतर्फे इ.१० वी व १२ वी मध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी फाउंडेशनचे अविराज बडकस, संस्थाध्यक्षा नीलिमा कुलकर्णी, कोषाध्यक्षा शालिनी कुलकर्णी उपस्थित होते.सूत्रसंचालन रेश्मा सर्वगोड यांनी केले. यावेळी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रशांत भोसले, प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका विश्रांती बनसोडे, उपमुख्याध्यापिका स्वराली कुलकर्णी, पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका संध्या शास्त्री उपस्थित होते.

## पंढरपुरात एच.आय.व्ही. संसर्गितांसाठी वधू-वर परिचय मेळावा

### ५०० नागरिकांची उपस्थिती; पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयात मेळाव्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १८ ऑगस्ट-**
स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण केंद्र, एआरटी सेंटर, पंढरपूर, सोलापूर, बार्शी व एन.एस.ओ.पी.समग्र प्रकल्प, पंढरपूर -सोलापूर, सर्व आय.सी.टी.सी. केंद्र सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने १५ ऑगस्ट २०२५ रोजी एच.आय.व्ही. संसर्गित मुला-मुलीकरिता रेशीम गाठी वधु-वर परिचय मेळावा उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूर येथे संपन्न झाला. या परिचय मेळाव्याकरिता महाराष्ट्रातील प्रत्यक्ष कार्यक्रमस्थळी इच्छुक वधु-वरांची १७७ जणांची नोंदणी झाली. या मेळाव्यास इच्छुक वधु वरांबरोबर त्यांचे नातेवाईकांसह ४५० ते ५०० नागरिक उपस्थित होते.

या प्रसंगी उपजिल्हा रुग्णालय पंढरपूरचे वैद्यकिय अधिक्षक डॉ. दिपक धोत्रे, यांचे हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी वरिष्ठ वैद्यकिय अधिकारी डॉ.सयाजीराव गायकवाड, वैद्यकिय अधिकारी डॉ. प्रदीप केचे, डॉ.प्रसन्न भातलवंडे, डॉ.बालाजी बिराजदार, डॉ.संभाजी




> या वधू-वर मेळाव्याकरिता अंदाजित ४५० ते ५०० सहभागी सर्व उमेदवार व नातेवाईकांसह नाष्टा व भोजनांची व्यवस्था पंढरपूर येथील सामाजिक संस्था पालवी प्रभा-हिरा प्रतिष्ठानच्या अध्यक्षा श्रीमती मंगलताई शहा यांच्या मार्फत मोफत करण्यात आली

भोसले, डॉ.अविनाश बुर्इके, डॉ. विनिता कार्यकर्ते, डॉ.खुपसंगिकर, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण केंद, सोलापूर कृष्णा सकट, एन.एस.ओ. पी.समग्र प्रकल्प, पंढपूर सोलापूरचे अध्यक्ष समाधान माळी यांचे हस्ते दिप प्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात केली.

प्रस्ताविक एआरटी सेंटर पंढरपूरचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सयाजीराव गायकवाड यांनी केले. या प्रसंगी येथील उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक डॉ.दिपक धोत्रे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.

सूत्रसंचालन पुरुषोत्तम कदम यांनी केले. या बरोबरच समुपदेशक व आभार वैद्यकिय अधिकारी डॉ. अविनाश बुईक यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करणेसाठी संतोष शेंडगे, बाजीराव नामदे, नागेश देवकर, दिपक गोरे, किशोर जाधव, युवराज वांगी, संदीप देशमुख, एजाज बागवान, भगवंत भोसले, मिनाक्षी कदम, स्वाती कसबे, रुपाली देवकर, सुजाता गायकवाड, राजश्री टकले, मेघा चंदनशिवे, बाळासाहेब पांढरे, धनंजय कुंभार, सुनिल चांदणे, तुकाराम साठे, भारत सोनवले, विशाल शिंदे यांनी परिश्रम घेतले.

## मृद चाचणी प्रयोगशाळा उभारणीसाठी वाढीव मुदत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**
राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या कॅफेटेरिया अंतर्गत सन २०२५-२६ साठी मृद आरोग्य व सुपिकता कार्यक्रमांतर्गत ग्रामस्तरीय मृद नमुने तपासणी प्रयोगशाळा उभारणीसाठी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत २२ ऑगस्टपर्यंत वाढविण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी दिली.

जिल्ह्यासाठी १५ प्रयोगशाळा स्थापन करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. उत्तर सोलापूर, मोहोळ, माढा, बार्शी, पंढरपूर, माळशिरस व सांगोला तालुक्यांना प्रत्येकी एक, तर दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, मंगळवेढा व करमाळा तालुक्यांना प्रत्येकी दोन प्रयोगशाळा देण्यात येणार आहेत.

**. लाभार्थी पात्रता निकष -**
प्रयोगशाळा उभारणीसाठी किमान १० वी उत्तीर्ण व विज्ञान व

> **अर्थसहाय्य रक्कम**
> प्रत्येक प्रयोगशाळेसाठी लाभार्थ्यांना १,५०,००० इतकी अर्थसहाय्य रक्कम देण्यात येणार आहे. प्राप्त अर्जांची छाननी जिल्हास्तरीय निवड समितीमार्फत करण्यात येईल. लक्षांकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास सोडत पद्धतीने निवड केली जाईल.

संगणक ज्ञान आवश्यक, वयोगट १८ ते २७ वर्षे (युवक/युवती), स्वयंसहायता गट, शेतकरी उत्पादक संस्था, सहकारी संस्था, कृषी व्यवसायिक केंद्रे, शाळा/कॉलेज यांना अर्ज करण्याची संधी, स्वतःची इमारत किंवा किमान ४ वर्षांचा भाडेकरार आवश्यक, अर्जासोबत आधार कार्ड, पॅन कार्ड, शैक्षणिक प्रमाणपत्र, भाडेकरार व इतर आवश्यक कागदपत्रे जोडणे बंधनकारक.

### 'टँगो मल्हार' या चित्रपटातून उलगडणार रिक्षा चालकाचा प्रेरणादायी प्रवास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**
संगणक शास्त्रज्ञ तसेच उद्योजिका असलेल्या साया दाते यांनी आगामी 'टँगो मल्हार' या चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन केले आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर लॉन्च करण्यात आले असून येत्या १९ सप्टेंबरला हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.टँगो मल्हार या चित्रपटाची निर्मिती गलेट्स अँड आयलेट्स प्रॉडक्शन या निर्मिती संस्थे अंतर्गत करण्यात आली असून साया दाते या निर्मात्या आहेत.टँगो मल्हार या चित्रपटात एका रिक्षा चालकाची गोष्ट उलगडण्यात आली आहे.चित्रपटाचे लेखन साया दाते, मनीष धर्मानी यांनी केले आहे.सुमेध तरडे, ओंकार आठवले यांनी छायांकन, क्षमा पाडळकर यांनी संकलन, तुषार कांगारकर यांनी ध्वनी आरेखन,शार्दुल बापट, उदयन कानडे यांनी संगीत आणि पार्श्वसंगीत केलं आहे. चित्रपटात नितेश कांबळे, कीर्ति विश्वनाथन, सीमा वर्तक, अक्षय गायकवाड, मनीष धर्मानी, मनीषा महालदार, संदेश सूर्यवंशी, पंकज सोनावणे या नवोदित कलाकारांचा अभिनय आपल्याला पहायला मिळणार आहे. साया यांच्यात चित्रपट प्रेमाचं बीजं बालपणीच पेरलं गेलं होतं. वयाच्या १२व्या वर्षी त्यांनी 'ऑन द अदर लाइन' ही शॉर्टफिल्म दिग्दर्शित केली होती. अनेक आंतरराष्ट्रीय महोत्सवात सुद्धा ही शॉर्टफिल्म गौरवली गेली.

## डॉ. आंबेडकर मेमोरियल हायस्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**
डॉ. आंबेडकर मेमोरियल फंड समिती सोलापूर संचलित डॉ. आंबेडकर मेमोरियल हायस्कूल, डॉ. आंबेडकर मेमोरियल नाईट हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव प्रवीण निकाळजे, संस्थेचे अध्यक्ष भागवत धोंडीबा सरवदे , डॉ. आंबेडकर मेमोरियल हायस्कूलच्या मुख्याध्यापिका संतोष साबळे , रात्र प्रशालेचे मुख्याध्यापक सतीश शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. संस्थेचे सचिव प्रवीण निकाळजे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक संतोषी साबळे यांनी केले. विद्यार्थ्यांनी समयोचित भाषणे केली. शिक्षक प्रतिनिधी चित्रा धाराशिवकर यांनी मनोगत व्यक्त केले. स्वातंत्र्य दिनानिमित्त हर घर तिरंगा अंतर्गत प्रशालेमध्ये प्रभात फेरी, वृक्षारोपण, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, स्वच्छता मोहीम असे विविध



उपक्रम उत्साहात आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना खाऊ वितरण करण्यात आले. सूत्रसंचालन विश्वनाथ कुलकर्णी यांनी केले तर आभार अनिल कट्टीमनी यांनी मानले.

## झेंडूची फुले हा कवितासंग्रह गावगड्याच्या गंधाने नटलेला दस्तऐवज

### समीक्षक श्रीनिवास वारुंजीकर; 'केशव कुमार यांचे काव्यदर्शन' या विषयावर व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**
महाराष्ट्र साहित्य परिषद शाखेच्या वतीने प्र. के. अत्रे यांच्या १२७ व्या जयंती निमित्त, सोलापूरचे अत्रे भक्त वा. ग. काटकर यांच्या स्मृती निमित्त आयोजित साहित्यिक कार्यक्रमांतर्गत 'केशव कुमार यांचे काव्यदर्शन' या विषयावर ज्येष्ठ पत्रकार आणि समीक्षक श्रीनिवास वारुंजीकर यांनी प्रभावी व्याख्यान दिले. हा कार्यक्रम महाराष्ट्र साहित्य परिषद सोलापूर शाखेच्या वतीने हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. श्रुती वडगबाळकर होत्या.

प्रास्ताविक ॲड.जे. जे. कुलकर्णी यांनी केले. तर वा. ग. काटकर यांच्या कन्या मीना गोळे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. वारुंजीकर यांनी आपल्या भाषणात केशवकुमार यांच्या कवितांतील लोकाभिमुख भावविश्व, साधी-सोपी भाषा, आणि वास्तवातील गंध




यांनी परिपूर्ण असलेली काव्यशैली यावर सखोल भाष्य केले. झेंडूची फुले हा फक्त कवितांचा संग्रह नसून, जीवनातील साधेपणा, माणुसकी आणि गावगड्याच्या गंधाने नटलेले एक सांस्कृतिक दस्तऐवज आहे असे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषण डॉ. वडगबाळकर यांनी केले. यावेळी वारुंजीकर यांचा परिचय डॉ. शिवाजी शिंदे यांनी करून दिला. सूत्रसंचालन शोभा बोल्ली यांनी केले तर आभार प्रा. भीम गोडा पाटील यांनी मानले. यावेळी कार्याध्यक्ष किशोर चांडक, डॉ. अर्जुन व्हटकर, फेय्याज शेख, गोविंद काळे, डॉ. सुवर्णा गुंड, बदीउजमा बिराजदार, मसाप जिल्हा प्रमुख पद्माकर कुलकर्णी, सुनेत्रा पंडित, श्रीधर खेडगीकर, गिरीश दुनाखे यांची उपस्थिती लाभली.

## शेतीपंपासाठी सिंगल फेज वीजपुरवठा वापरू नका; महावितरणचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**
शेतात, वाडी-वस्तीवर राहणाऱ्या घरगुती ग्राहकांना वीजपुरवठा उपलब्ध व्हावा, या हेतूने शेतीच्या फिडरवरून २४ तास सिंगल फेज वीजपुरवठा दिला जातो. या शेती फिडरवरील कृषी ग्राहक शेतीपंपासाठी सिंगल फेज वीजपुरवठा वापरत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदरचा वापर हा अनधिकृत आहे. तरी शेतीपंपासाठी सिंगल फेज वीजपुरवठा वापरू नये, असे महावितरणचे आवाहन आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या निर्देशानुसार शेतीपंपासाठी त्या त्या भागासाठीच्या निर्धारित वेळापत्रकानुसार दिवसा व रात्री चक्राकार पध्दतीने ८ तास थ्री फेज वीजपुरवठा केला जातो. कृषी ग्राहकांनी निर्धारित वेळापत्रकानुसार उपलब्ध वीजपुरवठा शेतीपंपासाठी वापरणे अपेक्षित आहे. मात्र काही कृषी ग्राहक शेती फिडरवरील २४ तास उपलब्ध सिंगल फेज वीजपुरवठ्याचा वापर शेतीपंपासाठी करीत असल्याचे महावितरणच्या निदर्शनास आले आहे.

सिंगल फेज वीजपुरवठा शेतीपंपासाठी वापरला जात असल्याने सदरील रोहित्रे अतिभारीत होत आहेत. परिणामी शेतात, वाडी- वस्त्यांवर राहणाऱ्या शेती फिडरवरील घरगुती ग्राहकांचा वीजपुरवठा बाधित होत आहे.

शेतीपंपासाठी सिंगल फेज वीजपुरवठा वापरणे अनाधिकृत आहे. तेंव्हा कृषी ग्राहकांनी तातडीने शेतीपंपासाठी सिंगल फेज वीजपुरवठा वापरणे बंद करावे.

## महत्वाचे...



### लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त तारापूर येथे मिरवणूक

**सुस्ते, दि. १८ ऑगस्ट-**
पंढरपूर तालुक्यातील तारापूर येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक संपन्न झाली आहे. यावेळी महापुरुषांच्या प्रतिमापूजन मिरवणुकीचे उद्घाटन सरपंच भारती जगताप, पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक टी. वाय. मुजावर यांच्या हस्ते करण्यात आले आहे. यावेळी शिंदे सेना व ग्राहक मंचाच्या जिल्हाध्यक्ष प्रियंका परांडे, पंढरपूर तालुक्याचे पोलीस उपनिरीक्षक भोसले, सप्तशृंगी पतसंस्थेचे चेअरमन अतुल चव्हाण, जगदंब फायनान्स चेअरमन हनुमंत चव्हाण, अंबिका उद्योग समूहाचे मालक विजय सुरवसे, ड बादल यादव, अॅड. धनराज रणदिवे, दत्तात्रय वायदंडे, आरपीआयचे तालुका उपाध्यक्ष भैया फडतरे, अमित अवघडे, संतोष सर्वगोड, बाळासो सपाटे, विश्वनाथ कोळी, लियाकत मुलांनी, जालिंदर शेळके, प्राचार्य सावंत, हनुमंत वाघमारे, धनंजय वाघमारे, मुकुंद घाडगे, सज्जन लोंढे, अनिल पाटोळे, नागनाथ देडगे, तानाजी कांबळे, बळीराम वाघमारे, ग्रामपंचायत सदस्य सुजाता वाघमारे, सुनिता चौधरी, ओंकार जगताप, सागर वाघमारे, तसेच मंडळाचे संस्थापक पुरोगामीचे जिल्हाध्यक्ष उमेश वाघमारे, मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग वाघमारे, मंडळाचे उपाध्यक्ष तानाजी कसबे, खजिनदार अजिंक्य वाघमारे, नवनाथ वाघमारे, प्रवीण वाघमारे, शुभम वाघमारे, बंटी साबळे आदी उपस्थित

### अल्पवयीन तरुणीवर अत्याचार आरोपीवर पोस्को, अॅट्रॉसिटी दाखल

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**
एका अल्पवयीन तरुणीवर राहत्या घरात येऊन जबरदस्तीने शारीरिक संबंध केल्याप्रकरणी तरुणावर पोस्को व अॅट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकीकत अशी की १४जून २०२५ रोजी दुपारी २ ते अडीचच्या सुमारास आरोपी शुभम मुळे यांनी आपल्या ओळखीच्या अल्पवयीन तरुणीला आपल्या राहत्या घरी जबरदस्तीने घेऊन गेला. आणि त्याच्या इच्छेविरुद्ध शारीरिक संबंध प्रस्थापित केले. सदर बझार पोलीस ठाण्यात एफ आर दाखल झाला. एक महिन्यानंतर पीडित तरुणीने आरोपीच्या विरोधात फिर्यादी दिली. ही घटना जेल रोड पोलीस ठाण्यात हद्दीत असल्याने सदरचा गुन्हा हा जेल रोड पोलीस ठाण्यात वर्ग झाला आहे.

### पाय घसरून पडल्याने एकजण जखमी

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**
राहत्या घरापासून जाताना पाय घसरल्याने पडून एकजण जखमी झाला. हा प्रकार देगाव नाका परिसरातील साठे पाटील वस्ती येथे सकाळी दहाच्या सुमारास घडला.विलास भुंजगराव कांबळे (वय ४५, रा. साठे पाटील वस्ती, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. विलास हे त्यांच्या घराजवळ पायी जाताना अचाकन पाय घसरला. यात डोक्याला जखम झाल्याने देगाव येथील महापालिका रुग्णालयात उपचार घेऊन दुपारी ३.१५ च्या सुमारास स्वता: दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### पायी जाताना तोल जाऊन पडल्याने एकजण जखमी

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**
एमआयडीसी परिसरातील निलमनगर येथील गण्पती नगरात पायी जाताना अचानक तोल जाऊन पडल्याने एकजण जखमी झाला. हा प्रकार रविवारी रात्री ९.३० वाजता घडला. लक्ष्मण विठ्ठल गोगारी (वय ४२, रा. सोलापूर रुग्णालय मागे, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. रविवारी रात्री ९.३० च्या सुमारास लक्ष्मण हे एमआयडीसी येथील निलम नगरात होते. तेथे पायी जाताना त्यांचा अचानक तोल गेल्याने ते खाली पडले. त्यात त्यांच्या कपाळाला जखम झाली आहे. रात्री १०.५ वाजता मदतनीस लक्ष्मण याने त्यांना रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### खडीत पाय घसरल्याने तरुण जखमी


**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**
सात रस्ता परिसरातील भागात पडलेल्या खडीत पाय घसरल्याने पडून तरुण जखमी झाला. हा प्रकार सोमवारी रात्री दीडच्या सुमारास घडला. विजय शिवशंकर गुडेलू (वय २०, रा. सात रस्ता, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. विजय राहतो त्या सात रस्ता भागात खडी टाकण्यात आली आहे. यात पाय घसरल्याने कपाळाला मार लागल्याने त्यास सकाळी ७.५५ वाजता उषा गुंडेलू यांनी उपचारास दाखल केले. परंतु उपचारादरम्यान तो पळून गेल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### जुळे सोलापुरात २४ हजारांची चोरी

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**
औषध दुकानाचे शटर उघडून दुकानातील पाण्याचे दोन बॉक्स, ४ बॉक्स कॅडबरी व रोख रक्कम असा एकुण २३ हजार ७०० रुपयांचा ऐवज लंपास केला आहे.मेडीकल दुकानात चोरी केली पण सीसीटिव्ही कैद होवू या भितीने सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे डीव्हीआर बॉक्स व वायरिंग तोडून नुकसान केले आहे. एवढे करून चोरटे सीसीटीव्हीमध्ये कैद झाले असून त्याचा पोलिसांकडून शोध सुरु आहे. ही घटना १७ ऑगस्ट रात्री अकरा ते १८ ऑगस्ट पहाटे साडे पाचच्या सुमारास श्लोक मेडीकल शॉप, कुमठेकर हॉस्पिटल समोर,जुळे सोलापूर या ठिकाणी घडली आहे. रामदास महादेव वडणे (वय ३७ रा. शारदा हाईटस दत्त नगर, जुळे सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यावरून अज्ञात चोरट्याविरुध्द विजापूर नाका पोलिसांत सोमवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रामदास वडणे नेहमीप्रमाणे १७ ऑगस्ट रोजी दुकान बंद करून गेले होते. शटर तोडून मेडीकलमध्ये प्रवेश केला,दुकानात सीसीटिव्ही कॅमेरा आहे हे लक्षात आल्यानवर चोरट्यांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे डीव्हीआर बॉक्सच्या वायरींगचे नुकसान केले,व दुकानातून पाण्याचे दोन बॉक्स, ४ बॉक्स कॅडबरी चॉकलेट व रोख रक्कम असा एकुण २३ हजार ७०० रुपयांचा ऐवज लंपास केला आहे.

# आठवड्यापासून शहर-जिल्ह्यात मुसळधार पाऊस

- नदी-नाले दुथडी भरून वाहू लागले
- पंधरवड्यात पडला ११८ मिमी पाऊस
- जिल्हाधिकाऱ्यांनी दिले पंचनाम्याचे आदेश



**सोलापूर : सोमवारी दिवसभर शहरात पावसाची रिपरिप सुरु होती. अनेक ठिकाणी पाणी साचले असून जनजीवन विस्कळीत झाले आहे.** (छायाचित्र : केवल तिवारी)

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**
मे महिन्यात पावसाने तुफान बॅटिंग केल्यानंतर (२३० मिमी) पुन्हा महिना-दीड महिना पावसाने कमी-जास्त हजेरी लावली होती मात्र ऑगस्ट महिन्यात पुन्हा पावसाने तुफान बॅटिंग केली आणि ११८ मिमी इतका पाऊस झाला.

जून ते आजतागायत २२० मिमीच्या पुढेच पाऊस पडल्यामुळे जिल्ह्यातील नदी-नाले, साठवण तलाव, पाझर तलाव भरभरून वाहू लागले. इतकेच नाहीतर उजनी धरणही ओव्हरफ्लो झाले आहे. मात्र काही मंडलात अतिवृष्टी झाल्याने त्या ठिकाणच्या पीक नुकसानीचे गतीने पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले आहेत.

वीर धरण पाणलोट क्षेत्रात पर्जन्यमान वाढल्याने आज (दि.१८) सायंकाळी ६ वाजता नीरा नदीच्या पात्रात सुरू असलेल्या विसर्गात वाढ होवून तो विसर्ग १० हजार ७३६ क्यूसेक्स इतका करण्यात येणार आहे. यामुळे निरा नदीच्या दोन्ही तिरावरील सर्वांनी याबाबत सावधानता बाळगावी, असेही आवाहन निरा उजवा कालवा फलटण विभागाचे कार्यकारी अभियंत्यांनी केले आहे. याचबरोबर जिल्ह्यातील ज्या मंडलात अतिवृष्टी झाली आहे; त्या शेतकऱ्यांच्या खरिपाच्या पिकाचे अतोनात नुकसान झाल्याने आता त्या भागातील नुकसानीचे पंचनामे तलाठ्यांनी सुरू केले आहेत. शासनाने ठरवून दिलेल्या अतिवृष्टीच्या निकषाप्रमाणे पंचनामे होवून याचा अहवाल शासनाकडे लवकर पाठविण्यात येणार आहे. सध्या उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट भागात पंचनामे सुरू केले आहेत तर उर्वरित तालुक्यातील पंचनामे लवकरच करण्यात येणार आहेत.

#### ३३ टक्केपेक्षा अधिक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मिळणार आर्थिक मदत

ज्या शेतकऱ्यांचे अतिवृष्टीमुळे ३३ टक्के किंवा अधिक नुकसान झाले आहे; त्यांना शासनाकडून आर्थिक मदतीचा हात देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली. दरम्यान, जिराईतसाठी हेक्टरी ८ हजार ५००, बागायतसाठी १७ हजार आणि फळबागांसाठी २२ हजार ५०० अशी नुकसान भरपाई देण्यात येणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

#### बोरी नदी काठच्या लोकांना आपत्ती विभागाकडून इशारा

पूर नियंत्रणासाठी बोरी मध्यम प्रकल्पातून एकूण ३०० क्युसेकने सुरू असलेला विसर्ग सोमवारी दुपारी ४:०० वाजता वाढवून ६०० क्युसेक एवढा करण्यात आला आहे. यामुळे बोरी नदी काठच्या गावांतील कोणीही नदी लगत जाऊ नये. कोणत्याही पुलावरून पाणी वाहत असताना पूल ओलांडू नये व योग्य ती खबरदारी घेवून सतर्क राहण्याच्या सूचना जिल्हा आपत्ती विभागाकडून देण्यात येत आहेत.

#### हिप्परगा तलावातूनही वाढतोय पाण्याचा विसर्ग

मराठवाड्याच्या काही गावातील ओढ्यांचे पाणी आणि उत्तर-दक्षिण सोलापूर तालुक्यातील काही गावचे पाणी हिप्परगा तलावात मोठ्या प्रमाणात येत असल्याने हिप्परगा तलावातूनही पाण्याचा विसर्ग रोजच वाढत आहे. पावसाचा जोर असाच राहिला तर अजून पाणी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळेही सोलापूरच्या वसंतनगर, अवंतीनगर आणि इतर काही नगरातील नागरिकांच्या घरात पाणी जात आहे. रस्त्यावरही पाणी येत आहे. यामुळे नगरपालिका प्रशासनाने याकडेही गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी अनेक नागरिकांनी केली आहे.

#### सोमवारीही शहर-जिल्ह्यात दिवसभर संततधार

गेल्या आठवड्यापासून सोलापूर शहर-जिल्ह्यात मुसळधार पाऊस कोसळत असून, यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अतिवृष्टीच्या भीतीने शेतकरी धास्तावले आहेत. आज सोम वारीही शहर-जिल्ह्यात दिवसभर संततधार पाऊस होता. अधून-मधून पाऊसधारा कोसळत होत्या. यामुळे दुचाकी-चारचाकी वाहनधारक, चाकरमानी आणि विद्यार्थ्यांचे बेहाल झाले.

## दुचाकीच्या धडकेने आई व मुलगा जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**
बाळे येथून निराळे वस्तीकडे दुचाकीवर जाणाऱ्या मायलेकाच्या दुचाकीस पाठीमागून अज्ञात दुचाकी चालकाने धडक दिली.या धडकेत आई व मुलगा जखमी झाला,त्यांना दवाखान्यात न नेता (एमएच १३ सीजी ४३९१) हा घटनास्थळावरून निघून गेला आहे याप्रकरणी अज्ञात दुचाकी चालकांवर फौजदार चावडी पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे.

ही घटना पुणे सोलापूर हायवे रोडवर, बाळी पोलिस चौकीच्या जवळ घडली आहे. याबाबत सौरभ शिवाजी अनभुले (वय २५ रा. कमलेश नगर बार्शी रोड बाळे सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात दुचाकी चालकांवर गुन्हा नोंद झाला आहे. १६ ऑगस्ट रोजी सव्वा पाच सुमारास दुचाकीवरून(एमएच १३ ईडी ४५८७) सौरभ व त्याची आई रसिका हे दोघेजण बाळे येथून निराळे वस्तीकडे निघाले होते. जात असताना पुणे सोलापूर हायवे रोडवरील बाळी पोलिस चौकीच्या जवळ आले होते,त्यावेळी पाठीमागून येणाऱ्या दुचाकी (एमएच १३ सीजी ४३९१) ने वेगाने येवून सौरभ च्या दुचाकीस धडक दिली. त्या धडकेत फिर्यादीच्या आईस डोके, उजव्या डोळ्यास गंभीर दुखापत झाली.तसेच सौरभ हा देखील किरकोळ जखमी झाला आहे. सौरभ व त्याची आईस दवाखान्यात न नेता तो दुचाकी चालक तसाच निघून गेल्याचे पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटलं आहे. तपास हवालदार गायकवाड करीत आहेत.

## सुस्ते, तुंगत रस्ताच्या निकृष्ट कामासाठी आंदोलन करणार

- ठेकेदाराचे नाव काळ्या यादीत टाकण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सुस्ते, दि. १८ ऑगस्ट-**
पंढरपूर तालुक्यातील सुस्ते ते तुंगत रस्त्याच्या निकृष्ट कामासाठी आरपीआय रस्ता रोको आंदोलन करणार असल्याचे निवेदन सोलापूर सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासन नाबार्ड - २९ मधून कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पंढरपूर यांच्या अंतर्गत रोपळे तुंगत सुस्ते चार किलोमीटर रस्ता नूतनीकरणासाठी २ कोटी निधी मंजूर झाला होता. रुंदी ३.७५ फुट, खड्डीकरणाचे दोन लेर व डांबरीकरण अशी सात इंच उंची आहे. रस्त्याचे काम काम मे सिध्दकर्म इन्फ्रा पंढरपूर यांनी घेतले होते. सुस्ते ते तुंगत रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम निकृष्ट झाले असून संबंधित अधिकाऱ्यांनी पाहणी करून ठेकेदारास रस्ता दुरुस्त करण्याचे आदेश दिले असून मात्र रस्ता रहदारीचा असून पंढरपूर-मोहोळ रस्त्याला जोडणारा एकमेव मार्ग असून रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते त्यामुळे सुस्ते व तुंगतच्या ग्रामस्थांकडून रस्ता दुरुस्त नको पुन्हा डांबरीकरण होण्याची मागणी जोर धरू लागली आहे. रस्त्याच्या डांबरीकरणचे काम होऊन सहा महिने पूर्ण होण्याआगोदरच रस्ता जागोजागी खड्डे पडले असल्यामुळे आरपीआयच्या वतीने सोलापूर सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे निवेदन दिले आहे. संबंधित ठेकेदाराचे नाव काळ्या यादीत टाकावे तसेच दहा दिवसाच्या आत रस्त्याचे डांबरीकरणाचे काम पुन्हा न झाल्यास पंढरपूर तिर्हे मार्ग सोलापूर रस्त्यावर सुस्ते येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचा निवेदनात उल्लेख केला आहे. निवेदन बांधकाम विभाग सोलापूर अभियंता शामराव कुंभार यांना आरपीआयचे तालुका उपाध्यक्ष भैया फडतरे, ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रेय बोबडे, मतीन शेख यांनी निवेदन दिले आहे.



> आरपीआयच्या वतीने रस्ता रोको करणार असल्याच्या २५ जुलै रोजी सोलापूर बांधकाम विभागाला निवेदन दिले होते. पंधरा दिवस उलटून गेले तरी आणखीही संबंधित विभागाकडून काही कारवाई केली नाही. त्यामुळे आम्ही पंढरपूर तिर्हे मार्ग सोलापूर रस्त्यावर सुस्ते चौकात १५ ऑगस्ट नंतर रस्ता रोको आंदोलन करणार आहे.
>
> **- भैय्या फडतरे,** आरपीआय तालुका उपाध्यक्ष


## एल्ग्रीस सोलर पॉवर सिस्टम; चॅनेल पार्टनर बनण्याची संधी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**
ऊर्जेच्या क्षेत्रात नवे मापदंड निर्माण करणाऱ्या एल्ग्रीस सोलर पॉवर सिस्टम प्रा. लि. ने आजवर १५०० पेक्षा जास्त प्रोजेक्ट्स यशस्वीपणे पूर्ण करून आपली वेगळी छाप पाडली आहे. सोलापूरकरांना स्वच्छ, परवडणारी व विश्वसनीय वीज उपलब्ध करून देत असताना आता एल्ग्रीस सोलरने चॅनेल पार्टनर बनण्याची सुवर्ण संधी उपलब्ध करून दिली आहे.

**रेफरलद्वारे मोठ्या प्रमाणावर कमाई**

एल्ग्रीस सोलरचे म्हणणे आहे की, हर घर सोलर हर घर उज्वल या ध्येयासाठी प्रत्येक सामान्य नागरिकही भागीदार होऊ शकतो. कंपनीच्या नव्या योजनेनुसार कोणालाही फक्त रेफरल्सद्वारे दर महिन्याला ७० हजार पर्यंत कमाई करण्याची संधी मिळणार आहे.

**विश्वासार्हता आणि अनुभवाचा ठसा**

१५०० पेक्षा अधिक प्रोजेक्ट्स पूर्ण करण्याचा अनुभव, वेळेवर प्रोजेक्ट पूर्ण करण्याची शिस्त, व सरकारी पीएम सूर्यघर योजना शी सुसंगत कार्यपद्धती यामुळे एल्बीस सोलरवर हजारो ग्राहकांचा विश्वास आहे.

**स्थानिकांसाठी रोजगार व व्यवसाय**

ही योजना फक्त कमाईपुरती मर्यादित नाही, तर सोलापूरकरांना स्वतःच्या शहराच्या विकासात थेट सहभाग घेण्याची संधी देते. चॅनेल पार्टनर झाल्याने स्थानिक स्तरावर रोजगार, व्यवसाय संधी व आर्थिक स्थैर्य वाढणार आहे.

**कसा बनाल चॅनेल पार्टनर?**

- इच्छुकांनी एल्ग्रीस सोलरच्या अधिकृत टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.
- फक्त ग्राहक रेफर करायचे पुढील सर्व प्रक्रिया कंपनीकडून हाताळली जाईल.
- Toll Free: ०२० ७१५३ ००२७



**संभाव्य चॅनेल पार्टनर्स कोण?**

- ही योजना सोलापुरातील विविध क्षेत्रांतील लोकांसाठी सुवर्णसंधी आहे -
- रिअल इस्टेट एजंट्स व बिल्डर्स नवीन घरं व सोसायटीसाठी सोलरचा थेट फायदा
- होम अप्लायन्सेस / इलेक्ट्रॉनिक डिलर्स ग्राहकांना सोलरसोबत ऊर्जा बचतीचे कॉम्बो
- डॉक्टर्स, शिक्षक व प्रोफेशनल्स स्वतःच्या नेटवर्कमधून रेफरल्स
- कंत्राटदार, प्लंबर, इलेक्ट्रिशियन घराघरात थेट संपर्क असलेले शेतकरी उत्पादक संस्था, सहकारी संस्था व व्यापारी ग्रामीण भागात सौरऊर्जेचा प्रसार
- गृहिणी व युवक - फक्त रेफरल देऊन अतिरिक्त उत्पन्न

**निष्कर्ष :** आज नवी ऊर्जा, नवा व्यवसाय आणि नवा आत्मनिर्भर भारत घडवण्यासाठी एल्ग्रीस सोलरने दिलेली ही सुवर्णसंधी प्रत्येकाने उचलावी. १५०० पेक्षा जास्त प्रोजेक्ट्सच्या यशस्वी अनुभवावर आधारित ही योजना नागरिकांसाठी नवा मार्ग उघडणारी ठरेल.

**योजनेचे तपशील**

- प्रत्येक प्रोजेक्टवर ५,०००
- ३ प्रोजेक्ट्सवर १८,०००
- ५ प्रोजेक्ट्सवर ३२,५००
- १० प्रोजेक्ट्सवर तब्बल ७०,०००




**चला सोलापुरला बनवूया सोलारपूर!**

- १५०० पेक्षा जास्त समाधानी ग्राहकांचा अनुभव सोलापूरची एकमेव कंपनी
- सरकारी सबसिडीचा लाभ अधिकृत मार्गदर्शन व पारदर्शक प्रक्रिया
- खास ग्राहक सेवा केंद्र विश्वासाई सेवा व तत्पर सहकार्य
- दीर्घकालीन बचत - एकदा गुंतवणूक, वर्षानुवर्षे वीजबचत






## शंकर नगरच्या शिवपार्वती मंदिरात महाआरती

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १८ ऑगस्ट-**
येथील महाशिवरात्र यात्रा समिती चॅरिटेबल ट्रस्ट शंकरनगर यांच्या वतीने पवित्र श्रावण मासाच्या समाप्ती निमित्त सोम वार दिनांक १८ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ७:०० वाजता शंकरनगर येथील श्री शिवपार्वती मंदिरात महाआरतीचे आयोजन केले होते. यानिमित्ताने खासदार धैर्यशील मोहिते पाटील व त्यांच्या पत्नी सौ शितलदेवी मोहिते पाटील यांनी सकाळी लघुरुद्र अभिषेक केला सायंकाळी महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम मंदिरासमोरील दीपमाळा कुमारी इशिता देवी धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या हस्ते प्रज्वलित करण्यात आली.

यावेळी यात्रा महोत्सव समितीचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील त्यांच्या पत्नी सौ कांचन माला देवी मोहिते पाटील कारखान्याचे व्हाईट चेअरमन शंकरराव माने देशमुख संचालक मंडळ शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य उपस्थितीत होते मंदिरातील पूजा व नामजप होऊन महाआरतीस प्रारंभ झाला या महाआरतीस परिसरातील हजारो नागरिकांनी शिवभक्तांनी सहभाग घेतला आरती नंतर हर हर महादेवा पार्वती शंकर सदाशिवा हा नाम जप होऊन प्रसाद वाटप करण्यात आले. यावेळी शोभेची दारू कामाचे सुंदर देखावे व तोफा उडवण्यात आल्या श्रावण महिन्यानिमित्त पूर्ण महिनाभर नामजप, शिवलीला अमृत ग्रंथवाचन, हरिपाठ, तसेच प्रत्येक सोमवारी लघुरुद्र अभिषेक आयोजन करण्यात आले होते.

मंदिराचे पुजारी प्रसाद कुलकर्णी व वेदांत कुलकर्णी हे सकाळी संध्याकाळी आरती प्रसाद वाटप आधी धार्मिक कार्यक्रम करतात कुमारी स्वरूपा राणी मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांसाठी नागपंचमीच्या सणाचे आयोजन करण्यात आले होते यामुळे हा परिसर भक्तीमय झाला आहे

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




**श्री नीलकंठेश्वर रथोत्सव**

सोलापूर : शेवटच्या श्रावणी सोमवारनिमित्त श्री नीलकंठेश्वर रथोत्सव मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत सहभागी झालेले भजनी मंडळ.

(छायाचित्र केवल तिवारी)



## महत्वाचे...

### काँग्रेसच्या युवक अध्यक्षपदाचा शेख यांनी दिला राजीनामा

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

शहरात काँग्रेसला एक मोठा धक्का बसला आहे. शहर अल्पसंख्याक युवक काँग्रेसचे अध्यक्ष नजीब शेख यांनी आपल्या पदासह पक्षाचे सदस्यत्व सोडत असल्याचा राजीनामा दिला आहे. मागील काही दिवसांपासून ते अलिप्त होते. अखेर त्यांनी आपला राजीनामा शहर काँग्रेस अध्यक्ष चेतन नरोटे यांच्याकडे सादर केला आहे. नरोटे यांनी शेख यांचा राजीनामा मंजूर केल्याचे समजते. नजीब शेख यांचे वडील दिवंगत सलीम शेख हे माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचे निकटवर्तीय होते. तर नजीब शेख हे खासदार प्रणिती शिंदे यांचे विश्वासू मानले जात होते. दरम्यान, काँग्रेस जिल्हाध्यक्षपदी सातलिंग शटगार यांची नुकतीच नियुक्ती झाली असून, त्यांनी पक्ष मजबूत करण्याचा संकल्प व्यक्त केला होता. काँग्रेस सोडल्यानंतर आता नजीब शेख यांची पुढील भूमिका काय राहणार याची चर्चा रंगली आहे. आता शेख हे कोणत्या पक्षात प्रवेश करणार की अलिप्त राहणार हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.






### कुर्डूवाडीत पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सोलापूर, मॉडेल करियर सेंटर, सोलापूर आणि डॉ. भारत पाटील फाउंडेशन, टेंभुर्णी यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हयातील नोकरी इच्छूक उमेदवारांसाठी गुरुवार, दि. २१ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत श्री गणेश हॉल, वागळे हॉस्पिटल जवळ, माढा रोड, कुर्डूवाडी, (ता. माढा) येथे मुलाखतीसाठी उपस्थित रहावे. मेळाव्यात १० वी, १२ वी, आय.टी.आय. वेल्डर, फिटर, डिप्लोमा, ग्रॅज्युएट, ऑफिस असिस्टंट, कोणतीही पदवी, इलेक्ट्रीशीय, मशिन ऑपरेटर, बी. कॉम, एम.कॉम, अशा प्रकारची ६२१ पेक्षा जास्त रिक्तपदे १० उद्योजकांनी ऑनलाईन अधिसुचित केलेली आहेत. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत ०२१७-२९९२९५६ या दूरध्वनीवर अथवा प्रत्यक्ष भेटीद्वारे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट, पार्क चौक, सोलापुर येथे संपर्क साधावा, असे आवाहन श्री. हणमंत श्रीरंग नलावडे, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर यांनी केले आहे.

# जिल्ह्यात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट

- आरोग्य विभागाची बघ्याची भूमिका
- १२ वर्षांत केवळ ७९ बोगस डॉक्टरांवर कारवाई
- तुकाराम मुंढे यांच्या कारवाईची चर्चा

**तभा वृत्तसेवा । अमोगसिध्द मुंजे**
**सोलापूर , दि. १८ ऑगस्ट-**

महापालिकेकडून शहरातील बोगस डॉक्टरांवर कारवाईची मोहीम उघडण्यात आली असून प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली आहे. मात्र जिल्ह्यात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट वाढला असताना जिल्हा परीषदेचा आरोग्य विभाग बघ्याची भूमिका घेत असल्याची चर्चा सुरू आहे.

बारा वर्षात जिल्ह्यात केवळ ७९ बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्यात आल्याने आरोग्य विभागाच्या कारभारावर आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. राज्यात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट असल्याची कबुली आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली आहे . तरीही सोलापूर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाला बोगस डॉक्टरांवरील मोहिमेला मूहूर्त मिळेना. जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात बंगाली तसेच पदवी नसलेल्या डॉक्टरांकडून मोठ्या प्रमाणात रूग्ण तपासणी रूग्णांच्या जीवाशी खेळण्याचा प्रकार सुरू आहे. शिवाय आर्थिक लूटही सुरू आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी आरोग्य विभागाकडे वारंवार तक्रारही केली आहे. मात्र आरोग्य विभागाकडून बोगस डॉक्टरांवर कारवाई होत नसल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.



२०१४ ते २०२५ या बारा वर्षाच्या काळात आरोग्य विभागाने जिल्ह्यात केवळ ७९ बोगस डॉक्टरांवर कारवाई केली आहे. चालू वर्षी फक्त सहा बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे त्यांच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. जिल्ह्यातील अनेक गावात सध्या बरेच बोगस डॉक्टर रुणावर उपचार करत आहेत. मात्र आरोग्य विभाग ' अर्थपूर्ण ' संबंधामुळे डोळेझाक करत असल्याची चर्चा आहे.

| गुन्हे दाखल झालेल्या बोगस डॉक्टरांची संख्या | |
|---|---|
| अक्कलकोट | १२ |
| बार्शी | ११ |
| करमाळा–मोहोळ | २ |
| मंगळवेढा | ४ |
| माढा | ७ |
| माळशिरस | ५ |
| सांगोला | १० |
| पंढरपूर | ४ |
| दक्षिण सोलापूर | १४ |
| उत्तर सोलापूर | १ |

"आरोग्य विभागाकडून मागील बारा वर्षांत ७९ बोगस डॉक्टरांवर गुन्हा दाखल करण्यात आले आहेत. चालू आर्थिक वर्षात सहा बोगस डॉक्टरांवर गुन्हा दाखल केला आहे. त्यामध्ये अक्कलकोट दोन, बार्शी एक, करमाळा दोन आणि माळशिरस तालुक्यातील एकाचा समावेश आहे.

**- डॉ. संतोष नवले, जिल्हा आरोग्य अधिकारी**

#### आरोग्य विभागाकडून बघ्याची भूमिका

आरोग्य विभागाकडून सन २०१५- १६ मध्ये ३७ बोगस डॉक्टरांवर गुन्हा दाखल करून मोठी कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर आरोग्य विभागाकडून बोगस डॉक्टरांविरुद्ध एखादाही मोठी कारवाई झाली नसल्याचे आकडेवारीवरून दिसत आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग नेमके करतो तरी काय, असा सवाल नागरिकांमधून विचारला जात आहे.

#### जिल्हाधिकारी तुकाराम मुंढे यांच्या कारवाईची चर्चा



२०१५ ते २०१७ या कार्यकाळात तुकाराम मुंढे जिल्हाधिकारी असताना बोगस डॉक्टरांवर कारवाईची मोहीम सुरू केली होती. यावेळी मुंढे यांनी कारवाई सुरू केल्याने अनेक बंगाली व पदवी नसलेल्या डॉक्टर भूमिगत झाले होते. मुंढे यांच्या धाडसी निर्णयाचे रूग्णांकडून कौतुक झाले होते. त्याच पध्दतीने बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## २४ हजार सोलापूरकरांनी केल्या डीजे डॉल्बीच्या विरोधात स्वाक्षऱ्या

**मनपा आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्यासह मान्यवरांचा सहभाग**







**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

नागरिकांच्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक स्वास्थ्यासाठी अत्यंत घातक ठरणाऱ्या डीजे डॉल्बीला सोलापुरात वर्षभर कायमस्वरूपी १०० टक्के बंदी आणावी या मागणीसाठी हजारो सोलापूरकर सोमवारी एकवटले. ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर मंदिरात सजग सोलापूरकर समितीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या एक लाख स्वाक्षरी मोहिमेत पहिल्याच दिवशी तब्बल २४ हजार सोलापूरकरांनी स्वाक्षरी करीत डीजे डॉल्बीला कडाडून विरोध दर्शविला.

सोमवारी सकाळी ६ ते रात्री ११ अशी तब्बल सलग १५ तास ही स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. सोलापूरकर समितीच्या सदस्यांनी सोलापूरकरांना डीजे डॉल्बीचे धोके समजावून सांगत प्रबोधन केले. यावेळी सोलापूरकरांनी उत्स्फूर्तपणे स्वाक्षरी मोहिमेत सहभाग घेऊन डीजे डॉल्बीला विरोध केला.

सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनीही या स्वाक्षरी मोहिमेत स्वाक्षरी करून सोलापूरकरांना डीजे डॉल्बी पासून उद्भवणारे आजार, धोके सांगत प्रबोधन केले आणि कर्णकर्कश डीजे डॉल्बीपासून सोलापूरकरांनी दूर राहात पारंपारिक वाद्याला प्राधान्य द्यावे असे आवाहन केले.

यावेळी प्रशासकीय अधिकारी, डॉक्टर, वकील, नगरसेवक, राजकीय क्षेत्रातील नेतेमंडळी, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, उद्योगपती, व्यापारी, शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी, महिला संघटनांच्या प्रतिनिधी आदींनी या स्वाक्षरी मोहिमेत सहभाग घेतला. सोलापुरातील ज्या सामाजिक संस्था संघटना आणि व्यक्तींना डीजे डॉल्बी मुक्त सोलापूर अभियानात सहभागी व्हायचे आहे त्यांनी ९८६०८२२२८३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन सजग सोलापूरकर समितीतर्फे करण्यात आले आहे.

#### आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्यमंत्र्यांना निवेदन देणार

सोलापूरकर समितीतर्फे एक लाख सोलापूरकरांच्या स्वाक्षऱ्या घेऊन डीजे डॉल्बी बंद करण्याबाबतचे निवेदन सोलापूरचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात येणार आहे.

**डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्या प्रकरण**

## मुसळे-मानेतर्फे दोषमुक्तीचा अर्ज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

येथील डॉ. शिरीष वळसंगकर यांचे आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी मनिषा महेश मुसळे-माने हिचेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता, सदर गुन्ह्याकामी मनिषा हीने दोषमुक्त होवून मिळणेकरिता मा. जिल्हा न्यायाधीश श्री. जयदीप मोहिते साहेब यांचे कोर्टात अर्ज दाखल केला.

यात हकीकत अशी की, दिनांक १७/०४/२०२५ रोजी मनीषा माने हिने डॉ. शिरीष वळसंगकर, डॉ. उमा वळसंगकर व इतर दोघांना ईमेल पाठवला होता, सदर ई-मेल मध्ये मनिषा हिने डॉक्टरांवर घाणेरडे आरोप केले होते, त्यामुळे डॉ. शिरीष हे व्यथीत झाले होते, त्यानंतर मनिषा हिने डॉक्टरांना लेखी माफीनामा लिहून दिला होता, लेखी माफीनामा लिहून दिला तरी मनिषा हीने ती तिच्या निर्णयावर ठाम असल्याचे धमकी दिली होती, त्यामुळे दि. १८/०४/२०२५ रोजी डॉ. शिरीष यांनी स्वतःचे बंदुकीतून गोळी झाडून आत्महत्या केली व आत्महत्येस मनिषा ही जबाबदार आहे अशा आशयाची फिर्याद फिर्यादी डॉ. अश्विन वळसंगकर यांनी सदर बझार पोलिसात दाखल केली होती. तदनंतर पोलिसांनी मनिषा हीस अटक केली होती. दरम्यान पोलिसांनी तपास करून मनिषा हिचे विरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. तदनंतर दि. २५/०५/२०२५ रोजी मा. न्यायालयाने मनिषा हिस जामीन मंजूर केला. मनीषा मुसळे-माने हिने ॲड. प्रशांत नवगिरे यांचे मार्फत सदर गुन्ह्यातून दोषमुक्त होऊन मिळण्याकरिता खालील मुद्द्यांवर अर्ज दाखल केला आहे. आरोपी मनिषा हिने चौघांना ई-मेल पाठवल्याचे दिसते. ई-मेल पाठवल्यानंतर मनिषा हिने माफीनामा दिला त्यात तिने भावनेच्या भरात पत्र पाठवले असे नमूद केले. सदर ईमेल प्रत चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मनीषाने तिचा पगार व अधिकार कमी केल्याबाबत तक्रार केली होती, तिने ई-मेलच्या माध्यमातून धमकी दिली असे जरी गृहीत धरले तरी त्यामध्ये मनिषाचा हेतू दिसून येत नाही तसेच आरोपीचे कृत्य व आत्महत्या यामध्ये थेट संबंध डॉक्टरांनी आत्महत्या करावी असे दिसून येत नाही.



सबंध दोषारोपपत्रातील आरोपांचे व कागदपत्रांचे अवलोकन केले असता मनीषा हिने डॉ. शिरीष वळसंगकर यांना आत्महत्येस प्रवृत्त केले असे कोठेही दिसून येत नाही. मनीषाचे कृत्यामुळे डॉक्टरांना आत्महत्या करण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता असे कोठेही दिसून येत नाही. डॉक्टरांचे आत्महत्येचा व मनीषा वर असलेल्या आरोपांचा थेट संबंध दिसून येत नाही या प्रमुख मुद्द्यांवर मा. न्यायालयात मनीषा हिने प्रस्तुत गुन्ह्यातून दोषमुक्त होऊन मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे त्यावर सरकार पक्षाचे म्हणणे येण्याकरीता पुढील तारीख २६/०९/२०२५ अशी नेमली आहे. यात मनीषा हिचे वतीने ॲड. प्रशांत नवगिरे, ॲड. श्रीपाद देशक, ॲड. सिद्धाराम पाटील हे काम पहात आहेत.

# शिवसेना शिंदे गटाचे कोल्हेंसह पदाधिकारी करणार भाजपात प्रवेश

**● येत्या तीन दिवसांत तारीख व ठिकाण निश्चित करणार : कोल्हे**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे सोलापुरातील शहर समन्वयक तथा माजी उपमहापौर दिलीप कोल्हे यांच्यासह अनेक पदाधिकारी भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. येत्या दोन-तीन दिवसात या पक्षप्रवेश कार्यक्रमाची तारीख आणि ठिकाण निश्चित करण्यात येणार आहे, अशी माहिती स्वतः माजी उपमहापौर दिलीप कोल्हे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

माढा येथे जगदाळे मंगल कार्यालयात शनिवारी १६ ऑगस्ट रोजी प्रा. शिवाजी सावंत व माजी उपमहापौर दिलीप कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली विचार विनिमय करण्यासाठी अकरा तालुक्यातील पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये माढा, मोहोळ, बार्शी, करमाळा, अक्कलकोट, पंढरपूर सांगोला त्याचबरोबर शहर उत्तर. मध्य व दक्षिण सोलापूर या तालुक्यातील अनेक पदाधिकाऱ्यांनी आपली आपली मते मांडली. शिवसेना शिंदेगट पक्षात होत असलेल्या अन्यायावरही या बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली.शिवसेना शिंदे गटात शिवाजी सावंत हे संपर्कप्रमुख असताना देखील अधिकार नसलेल्या लोकांनी पदाधिकाऱ्यांच्या निवडी केल्या. ही बाब पक्षांच्या वरिष्ठांना शिष्टमंडळामार्फत कानावर घालून सुद्धा त्यामध्ये वरिष्ठांनी कोणतीही दखल न घेतल्याने सर्व पदाधिकाऱ्यांनी बैठकीमध्ये प्रा. शिवाजी सावंत व दिलीप कोल्हे हे जो निर्णय घेतील तो आम्हाला एकमताने मंजूर असेल, असे स्पष्ट केले. दरम्यान, प्रा. शिवाजी सावंत व माजी उपमहापौर दिलीप कोल्हे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे, अक्कलकोटचे आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे व भाजप शहराध्यक्ष रोहिणी तडळवकर यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर काल रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोलापूर दौऱ्यावर असले असता त्यांच्याशी चर्चा करण्यात आली.

येत्या दोन ते तीन दिवसांत मुख्यमंत्र्यांनी भाजप प्रवेशाची तारीख दिल्यानंतर भाजप पक्षप्रवेशाचा कार्यक्रम होणार आहे. भाजप पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम मुंबई , सोलापूर की माढा ? कुठे करायचा याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येणार आहे, असे दिलीप कोल्हे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस हरिभाऊ चौगुले, जवाहर जाजू, समर्थ मोटे, मयूर झांबरे, आशिष परदेशी, मनोज चकोलेकर , सागर शिंदे, सुनील निंबाळकर आदी उपस्थित होते.

#### भाजपा पक्षप्रवेश करणारे पदाधिकारी व कार्यकर्ते

प्रा. शिवाजी सावंत, दिलीप कोल्हे, हरिभाऊ चौगुले, जवाहर जाजू, समर्थ मोटे, ऋतुराज सावंत, रवीना राठोड, मंगल कोल्हे, नाना देशमुख, उदयसिंह कदम, सचिन कदम, संजय टोणपे, माधुरी कांबळे, प्रमोद सलगर, भजनदास कटके, युवराज वसगढेकर, समाधान दास, शिवराज पवार, उमेश पांढरे, बालाजी बारबोले, धर्मराज मुकणे, सचिन कदम, सम्मेद सावळे, सुनील निंबाळकर, संजय देशमुख, अनिल कोळी, प्रशांत लोणारी, प्रमोद सलगर, सतीश मस्के, किरण जाधव, अनिकेत मूळ, नवनाथ भजनावळे, सागर शिंदे , धनंजय सुतार, अनिल माळी, मोबीन बेलमे, पंकज कांबळे, नामदेव पाटील, अनुपसिंग बायस, राजू बीटला, ज्ञानेश्वर भंडारी, विनायक म्हेत्रे, सागर सलगर, देविदास निंबोळे, सन्मत यल्दी, सुरेश फरड, विशाल सुरवसे, मल्लिकार्जुन पगडीकर, किशोर चव्हाण, राहुल काटे, ज्ञानेश्वर उंचीकट्टी, उमाकात निकम, युसुफ दाळवाले, धर्मराज मुकणे, महेश मोहोळ, भजनदास कटके, रंजीत कोल्हे, इमरान पठाण आदी पदाधिकारी भाजपात प्रवेश करणार आहेत, असेही दिलीप कोल्हे यांनी सांगितले.

# १६ नोव्हेंबरला 'लोकमंगल'चा सामुदायिक विवाह सोहळा

**विवाह नोंदणीला झाली सुरुवात; आमदार सुभाष देशमुख यांची माहिती**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

दरवर्षी परंपरेप्रमाणे होणारा लोकमंगल फाउंडेशनच्यावतीने आयोजित सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळा यंदा रविवार, १६ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजून ८ मिनिटांनी गोरज मुहूर्तावर विजापूर रोडवरील शिवाजी अध्यापक विद्यालयाच्या प्रांगणात पार पडणार आहे.

हा फौंडशनतर्फे विवाह सोहळ्याचे विसावे वर्ष असून, ४६ वा सामुदायिक विवाह सोहळा आहे, अशी माहिती लोकमंगल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा आमदार सुभाष देशमुख यांनी दिली. विवाह सोहळ्यासाठी सोलापूर शहरासह जिल्ह्यामध्ये लोकमंगल बँक, लोकमंगल नागरी पतसंस्था, लोकमंगल मल्टीस्टेट, आदी एकूण १०० पेक्षा पेक्षा जास्त माहिती केंद्राची व्यवस्था करण्यात आली आहे. विवाह सोहळ्यासाठी नाव नोंदणीसाठी मंगळवार १० नोव्हेंबर अंतिम तारीख आहे. या विवाह सोहळ्यामध्ये जास्तीत जास्त विवाह इच्छुकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन लोकमंगल फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी विकास नगर येथील लोकमंगल फौंडेशनच्या ऑफीसला संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ७७२००९६४८८, ०२१७-२६०६०७० येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या विवाह सोहळ्यात प्रत्येक वधू-वरास विवाहाचे कपडे, हळदीचे कपडे, वऱ्हाडी मंडळीच्या भोजनाची सोय, मानाचा आहेर, स्वतंत्र मेकअप करण्याची व्यवस्था, वधूस मणी मंगळसूत्र व जोडवे देण्यात येणार आहेत. ताट, वाटी, ग्लास प्रत्येकी ५ नग, स्टील हंडा, स्टील डबा, तांब्या आदी संसारोपयोगी साहित्य देण्यात येणार आहे.




विवाह सोहळा यंदा रविवार, १६ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजून ८ मिनिटांनी शिवाजी अध्यापक विद्यालयाच्या प्रांगणात पार पडणार आहे. वधू-वरांची प्रमुख मार्गाने मिरवणूकही काढण्यात येणार आहे. याशिवाय धर्माप्रमाणे विवाह लावून दिले जाणार आहे, आ. देशमुख म्हणाले. या पत्रकार परिषदेला शशी थोरात, मारुती तोडकर, सुजाता सुतार, उत्तम शिंदे, अभय पटणे आदी उपस्थित होते.

#### आतापर्यंत ३१५३ जोडपी विवाहबद्ध

फौंडशनतर्फे होणारा ४२ वा सामुदायिक विवाह सोहळा आहे. आतापर्यंत ३१५३ जोडपी विवाहबद्ध झाली आहेत. यामध्ये हिंदू २४४३, बैद्ध ६७८, मुस्लिम २१, जैन ७ तर ख्रिश्चन समाजाचे ४ विवाह झाले आहेत.

#### जोडप्यांच्या मुलांनाही फाउंडेशनतर्फे मदत

लोकमंगल फाउंडेशन च्या सामुदायिक विवाह सोहळ्यात विवाहबद्ध झालेल्या जोडप्यांच्या मुलांनाही फाउंडेशनतर्फे मदत केली जाते त्यांना लोटस योजनेद्वारे शिक्षणासाठी आर्थिक मदत देण्याची योजना फाउंडेशनने राबवली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




# दु:खाची अत्यंतिक निवृत्ती म्हणजे मुक्ती होय : हभप. डॉ. जयवंत बोधले महाराज

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १८ ऑगस्ट-**

मानवी जीवनामध्ये परमपुरुषार्थ म्हणजे मोक्ष होय; यास सायुज्यता मुक्ती म्हणतात. सलोकता, समिपता, सरुपता, सायुज्यता यामध्ये सायुज्यता मुक्ती ही श्रेष्ठ होय. असे प्रतिपादन श्रीगुरु डॉ जयवंत महाराज बोधले यांनी प्रवचनमालेच्या २४ व्या सत्रात केले. ते यावेळी श्री भगवंत मंदिर येथे चालू असलेल्या श्रीमद्भागवत कथा चिंतन या विषयावर बोलत होते . राजा परीक्षितीला मुक्ती म्हणजे काय हे शुकाचार्य समजावून सांगत आहेत. त्यामध्ये आत्मविज्ञान ,म्हणजे मुक्ती याचा अर्थ सांगताना महाराज असे सांगतात की, 'सर्वत्र आत्मदृष्टी येणे हीच मुक्ती होय' तसेच दुसरा अर्थ पाश हानी म्हणजे मुक्ती होय. श्रीगुरु जयवंत महाराज असे सांगतात की, जीवनात कोणतेही बंधन शिल्लक न राहणे यालाच पाश हानी म्हणतात, तीच मुक्ती होय. श्रीगुरु तिसरा अर्थ असे सांगतात की, आत्मस्वरुप संपत्ती होय म्हणजे परम धामाची प्राप्ती होणे म्हणजे मुक्ती होय. श्रीगुरु जयवंत महाराज चौथा अर्थ सांगताना शोकादी राहित्य म्हणजे कोणतेही दु:ख शिल्लक न राहणे त्याची अत्यंतिक निवृत्ती होणे म्हणजेच मुक्ती होय, असा सांगतात. अशा प्रकारे मुक्ती म्हणजे काय? मुक्तीचे प्रकार विविध दृष्टांतासह सांगितले. याप्रसंगी अनेक उदाहरणे देत भगवंताची माया किती विचित्र आहे हे सुदामा व कृष्ण यांच्या चरित्रातून महाराजांनी उलगडून दाखविले. यावेळी मायेचे तात्विक विवेचन करताना अद्भुत व अनिर्वचणीय अशी ही माया भगवंत नामाशिवाय तरुण जाणे शक्य नाही म्हणून सतत नामस्मरण असावे, असा महत्वपूर्ण संदेश सर्व भाविकांना महाराजानी आजच्या प्रवचनातून दिला. यावेळी डॉ. किरण महाराज बोधले तसेच पुण्याहून भालेकर परिवार तसेच इंदापूरहून धायगुडे महाराज व अनेक भाविक, भक्त उपस्थित होते.



श्रावणमास प्रवचनमाला
भाग - २४

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. १९ ऑगस्ट २०२५ | जागतिक छायाचित्रण दिन |
| विक्रम संवत् २०८२ | अजा एकादशी |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - श्रावण | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. एकादशी (१५.२३) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - आर्द्रा (२५.०७) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - वज्र (२०.२९) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - का (२८.२५) | शनिवार : स. ९ ते १०.३० |



# गुणवंत शिक्षक पुरस्काराने दिनकर भारती सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

ओपन लिंक फाउंडेशन आणि जिल्हा परिषद सोलापूर यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या आचार्य विनोबा भावे या शैक्षणिक ॲपमध्ये जानेवारी २०२५ चा जिल्हा स्तरावरील 'स्टार टीचर' अवॉर्ड आणि जानेवारी २०२५ ते जुलै २०२५ या कालावधीतील जिल्हास्तरीय पहिल्या क्रमांकाचा 'पोस्ट ऑफ मंथ'चा अवॉर्ड अक्कलकोट तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा सलगर येथील कार्यरत पदवीधर शिक्षक दिनकर नंदिनी तुकाराम भारती यांना सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी. कुलदीप जंगम साहेब आणि शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्या हस्ते सन्मानित केले. दिनकर भारती यांच्या या कामगिरीबद्दल जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा सलगरचे मुख्याध्यापक दत्तात्रय पोतदार यांच्यासह इतर शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले.

# दुचाकी वाहनांसाठी आकर्षक नोंदणी क्रमांकासाठी अर्ज करण्याचे आवाहन




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

दुचाकी वाहनांसाठी सुरु होणाऱ्या एमएच-१३-ईडब्ल्यू मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक राखून ठेवण्याकरिता अर्ज स्विकारण्याबाबत प्रक्रिया सुरु करण्यात आली असून, दुचाकी वाहनांसाठी आकर्षक नोंदणी क्रमांकासाठी अर्ज करण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे. वाहनांची नवीन मालिका चालू होण्याच्या दिवशी प्रादेशिक परिवहन कार्यालयात गर्दी होते. त्यामुळे कार्यालयीन व्यवस्थेवर त्याचा ताण पडतो व नागरिकांनाही याचा त्रास होतो. नागरिकांना होणारा त्रास कमी व्हावा व त्यांना हवा असणारा आकर्षक नोंदणी क्रमांक उपलब्ध असल्यास त्यांना सुलभतेने मिळावा. यासाठी ज्या दुचाकी वाहन मालकांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहीत शुल्क भरून हवे असतील त्यांनी दिनांक १९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते सायं ४ या वेळेत विहीत नमुन्यातील अर्ज सादर करावा.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते जिल्हा पर्यटन महोत्सवाच्या लोगोचे अनावरण

## ५ पी ब्रँडिंगद्वारे होणार सोलापूर पर्यटनाचा जागतिक प्रवास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

सोलापूर सोशल फाउंडेशनतर्फे २७ सप्टेंबर जागतिक पर्यटन दिन ते २ ऑक्टोबर महात्मा गांधी जयंती या कालावधीत सोलापूर जिल्हा पर्यटन महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. याच्या लागोचे अनावरण सोलापुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. सुभाष देशमुख आदी उपस्थित होते.

या महोत्सवाचे उद्दिष्ट सोलापूर जिल्ह्याच्या पर्यटनाचा सर्वांगीण विकास करणे आहे. या माध्यमातून ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक, निसर्ग व ग्रामीण पर्यटनाचा प्रचार होणार आहे. या महोत्सवाची संकल्पना ५ पी मार्केटिंग ब्रँडिंग' या तत्वावर आधारित आहे. पहिले पी म्हणजे प्लेसेस - जिल्ह्यातील धार्मिक, सांस्कृतिक, औद्योगिक व ग्रामीण पर्यटन स्थळे. दुसरे पी' म्हणजे पर्सनॅलिटीज - सोलापुरातील कलाकार, संशोधक, आधुनिक शेतकरी, उद्योजक. तिसरे पी म्हणजे प्रॉडक्ट्स - स्थानिक खाद्यसंस्कृती, कृषी उत्पादन व औद्योगिक निर्मिती. चौथे पी म्हणजे प्लेसमेंट - तरुणांसाठी जास्तीत जास्त रोजगार निर्मिती. पाचवे पी म्हणजे पॉल्युशन फ्री एन्व्हायर्नमेंट - वृक्षलागवड व पर्यावरण संवर्धन. दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस सोमवारी सोलापूर शहराच्या दौर्यावर होते. त्यावेळी त्यांच्या हस्ते सोलापूर पर्यटन महोत्सवाच्या लागोचे अनावरण करण्यात आले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. सुभाष देशमुख, आ. विजयकुमार देशमुख, आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे, आ. समाधान आवताडे, आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे व मान्यवर उपस्थित होते.



### सोलापूर पर्यटनाचा ब्रँड देशभरात उंचावणार

या पर्यटन महोत्सवामुळे सोलापूर जिल्ह्याच्या पर्यटन क्षमतेला नवे व्यासपीठ मिळणार आहे. यातून ग्रामीण व शहरी भागातील अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये पर्यटनाविषयी जागरूकता निर्माण होईल. जिल्ह्यातील नागरिकांना पर्यटन क्षेत्राशी जोडले जाण्याची संधी उपलब्ध होईल. स्थानिक उद्योग व बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळेल. जिल्ह्यात रोजगार निर्मितीला गती मिळेल, या महोत्सवामुळे सोलापूर पर्यटनाचा ब्रँड राज्यभरात आणि देशभरात उंचावणार आहे, असे आ. सुभाष देशमुख यांनी सांगितले.

# लोकमान्य संयुक्त महामंडळाच्या अध्यक्षपदी दत्ता भोसले



## मिरवणूक प्रमुखपदी गणेश शेंगर यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

लोकमान्य संयुक्त गणेशत्सव महामंडळाची नुकतीच बैठक हृदयसम्राट स्व. कै. मुरलीधर घाडगे मु.पैलवान येथे नुकतीच संपन्न झाली. ही बैठक पुरुषोत्तम बरडे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, राजन जाधव, खलिफा पैलवान दत्तात्रय कोलारकर, प्रतापसिंह चौहान, श्रीकांत घाडगे, शिवाजी चव्हाण ,अंबादास शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

सुरुवातीस मानाचा श्री पणजोबा गणपती व हृदयसम्राट स्व. कै. मुरलीधर घाडगे मु.पैलवान यांच्या फोटोस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालण्यात आला. बैठकीस जवाहर जाजू,शेखर फंड, बजरंग जाधव, सुहास कोलारकर, राहुल बनसोडे, देविदास घुले, सचिन स्वामी, महेश जगदाळे, विजय कांबळे, पत्रा तालीम युवक क्रीडा व सांस्कृतिक मंडळ उत्सव अध्यक्ष आदित्य घाडगे, मारुती सावंत, बसवराज कोळी, पवन पाटील, योगेश क्षीरसागर, अनिकेत व्यवहारे, संकेत ढोबळे, आकाश जाधव, विजय व्यवहारे, आदिनाथ जावळे, मनोज जाधव, वैभव दांडगे, पुरवंत काळे, बसवराज गुब्याड उपस्थित होते.

### नूतन पदाधिकारी

उत्सव अध्यक्ष दत्ता भोसले, कार्याध्यक्ष योगेश क्षीरसागर, उपाध्यक्ष - बसवराज कोळी / सारंग नाईकवाडी, सेक्रेटरी - राजू हुंडेकरी, सह सेक्रेटरी सज्जन वडने, खजिनदार - मारुती सावंत, मिरवणूक प्रमुख - गिरीष शेंगर, प्रसिद्धी प्रमुख - वैभव गंगणे, कार्यालय प्रमुख - प्रवीण जाधव.

# बिगारी कर्मचारी प्रसेनजित शिंगे झाले एलएलबी परीक्षा उत्तीर्ण

## महापालिकेत सेवा करीत 'आता थांबायचं नाय'चा दिला संदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

शिक्षणाचे महत्त्व जाणून सोलापूर महापालिकेत चतुर्थश्रेणीतील बिगारी कर्मचारी म्हणून काम करत प्रसेनजित शिंगे यांनी एल.एल.बी ही विधी शाखेची पदवी परीक्षा चांगल्या गुणांनी संपादन केली आहे. यापूर्वी त्यांनी विविध चार पदव्या आणि एक पदविका (डिप्लोमा) परीक्षा उत्तीर्ण केली आहे. नोकरी करीत शिक्षण घेऊन आता थांबायचं नायचा जणू संदेश दिला आहे. पाचवी पदवी घेऊन सर्वांपुढे एक नवा आदर्श ठेवत महापालिकेच्या शिरपेचात एक मानाचा तुरा रोवला आहे.



सोलापूर महापालिकेत लाड कमिटी अंतर्गत चतुर्थश्रेणीतील बिगारी सफाई कर्मचारी म्हणून प्रसेनजित शिंगे हे चार वर्षांपूर्वी रुजू झाले. सध्या ते प्रभाग १० व ११ मध्ये बिगारी कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत. विशेष म्हणजे प्रसेनजीत शिंगे यांनी महापालिकेत रुजू होण्यापूर्वीच सोलापुरातील दयानंद महाविद्यालयातून बीए (भूगोल), एम.ए.( भूगोल), एम.ए. (इतिहास), एसव्हीसीएस महाविद्यालयातून बी.एड पदवी, सॅनिटरी इन्स्पेक्टर डिप्लोमा (आरोग्य निरीक्षक) आणि आता एलएलबी परीक्षा उत्तीर्ण केली आहे.

### शिक्षणामुळे माणसाच्या विचारांना दिशा मिळते : प्रसेनजित शिंगे

शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हा मूलमंत्र प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला. त्यांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून बिगारी कर्मचारी म्हणून कार्यरत असतानाही मी शिक्षण थांबविले नाही. पुढील पदवी शिक्षण घेतले आहे. याचा उपयोग महापालिकेच्या सेवेत मला निश्चित होणार असल्याची भावना कर्मचारी प्रसेनजित शिंगे यांनी व्यक्त केली.

# शंकरलिंग मंडळच्या अध्यक्षपदी चंद्रकांत बडवणे



**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

श्री शंकरलिंग तरुण मंडळाची सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. मंडळाच्या ट्रस्टी अध्यक्षपदी मल्लिनाथ थळंगे व उपाध्यक्षपदी संगमनाथ बागलकोटी यांच्या उपस्थितीत नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. अध्यक्षपदी : कुमार चंद्रकांत बडवणे, उपाध्यक्ष जगदीश मल्लिकार्जुन गिडवीर, खजिनदार उमेश धनशेट्टी, मिरवणूक प्रमुख : सचिन दसमाने व सुरज बडवणे. यावेळी ट्रस्टी सदस्य व कार्यकर्ते उपस्थित होते.

# फोटोग्राफर दिंडी पदयात्रेचे आज आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

जागतिक फोटोग्राफर दिनानिमित्त मंगळवार दि. १९ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता फोटोग्राफर दिंडी पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.चार हुतात्मा पुतळ्यापासून या दिंडीस प्रारंभ होणार आहे. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे या दिंडीचा समारोप करण्यात येणार आहे. यात सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील फोटोग्राफी करणारे पारंपारिक पेहरावत सहभागी होणार आहेत. पालखी आणि भजनी मंडळाचा यात समावेश राहणार आहे.

# अहद चॅरिटेबल ट्रस्टतर्फे आरोग्य तपासणी शिबीर

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

अहद चॅरिटेबल ट्रस्टच्या उद्घाटन समारंभाचे औचित्य साधून आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. निर्मल हॉस्पिटल व टेके आय क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमानाने डॉ. चेतन आयवले, डॉ. किरण राठोड, डॉ. विशाखा टेके, डॉ. रमाकांत टेके यांच्या मार्गदर्शनाखाली ५५० जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली. शिबिराचे उद्घाटन व प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. इस्माईल शेख, ॲड. सिराज शेख, माजी नगरसेवक किसन जाधव, इलियास सिदिकी, जमीर शेख, रियाज सय्यद, समीर शेख, मंगलगिरी, अय्युब शेख, हमीद, तन्वीर शेख यांच्या उपस्थितीत करण्यात आले. प्रास्ताविक संस्थापक अध्यक्ष युसूफ शेख यासंनी केले तर सूत्रसंचालन अध्यक्ष अन्सार शेख व सहसवि समीर शेख यांनी केले.

# वैविध्यपूर्ण विषयांवरील पुस्तकांचे प्रकाशन हे चपराकचं साहित्यिक आंदोलन



## लेखक भडकमकर यांचे प्रतिपादान

## चपराक प्रकाशनच्या सात पुस्तकांचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. १८ ऑगस्ट-**

भाषा हे वाचणारे, बोलणारे आणि लिहिणारेच जगवणार आहेत. बाकी कोणतंही राजकीय आंदोलन भाषेचं काहीही भलं करू शकणार नाही. त्यामुळे एकाच वेळी वैविध्यपूर्ण विषयांवरील पुस्तके प्रकाशित होणं हे चपराकचं एक प्रकारचं साहित्यिक आंदोलनच आहे, असे मत सुप्रसिद्ध सिने-नाट्य दिग्दर्शक आणि लेखक अभिराम भडकमकर यांनी व्यक्त केले. चपराक प्रकाशनच्या सात पुस्तकांचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. रमेश शिंदे यांनी लिहिलेले श्री छत्रपती शिवाजी महाराज चरित्र, निवृत्त प्रशासकीय अधिकारी गिरीश गोखले यांचे अरे सरकार सरकार हे आत्मकथन, संदीप वाकचौरे यांची शिक्षणरंग आणि भाषा आणि शिक्षण ही दोन पुस्तके, चंद्रलेखा बेलसरे यांचा ओव्हरटेक हा गूढकथासंग्रह, दीपाली जोगदंड यांचा फन वन हा बालकवितासंग्रह आणि घनश्याम पाटील यांचा धडक बेधडक हा राजकीय लेखसंग्रह अशा सात पुस्तकांचे प्रकाशन श्रमिक पत्रकार भवनात झाले. ज्येष्ठ अभिनेते आणि दिग्दर्शक अरूण नलावडे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते तर उद्योजक राम कुतवळ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अरुण नलावडे, राम कुतवळ यांनी मनोगत व्यक्त केले. प्रकाशक घनश्याम पाटील यांनी प्रास्ताविक केले. कवी माधव गिर यांनी सूत्रसंचालन केले तर संदीप वाकचौरे यांनी आभार मानले.

# शहरात स्वातंत्र्य दिनाचा उत्साह



## बी. एस. कुलकर्णी प्रशाला

बी. एस. प्रशालेत स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. संस्थापक बी. एस. कुलकर्णी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते आर. एस. पी. च्या विद्यार्थ्यांचे संचलन नेत्यांच्या क्रांतिकारकांच्या वेशभूषा सादर करण्यात आल्या. याप्रसंगी ग.ल.कुलकर्णी विद्यालयातील ए.टी.एस. परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्वांना प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच शासनाच्या असाक्षर परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्वांना प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका अर्चना बिराजदार, भीमाशंकर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका आरती गुंडे उपस्थित होते. सूत्रसंचालन कविता थांबत यांनी केले तर आभार स्वरांगी मोहोळकर यांनी मानले.



## आसरा चौक

स्वातंत्र्य दिनानिमित्त आसरा चौक येथे ७० फूट राष्ट्रध्वज क्रेनवर लावून मानवंदना देण्यात आली सुरवातीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व राष्ट्रगीत घेण्यात आले व सर्व उपस्थितांना खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी आरपीआय पश्चिम महा. उपाध्यक्ष रावसाहेब परिक्षाळे, माजी जिल्हा अध्यक्ष धर्मा माने, खुतबुद्दीन अत्तार पी.जी.ग्रुप अध्यक्ष शफीक शेख, रसूल शेख, समीर पटेल, समीर मुंडेवादी, आसिफ शेख, आसिफ खान, अबू शेख, आली शेख, सलीम शेख, अजहर अत्तार, परवेश सौदागर, विजय जाधव उपस्थित होते.



## एस. पी. प्रतिष्ठान

एस. पी. व भीम युवक क्रीडा मंडळाच्या वतीने स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. एसपी चौक भवानी पेठ सारनाथ नगर येथे भारतीय तिरंगा ध्वजारोहण एसव्हीसीएस मुख्याध्यापक मुख्याध्यापक राम ढालेचे नेते सिद्धेश्वर पांडगळे यांच्या हस्ते करण्यात आले व राष्ट्रगीत गाऊन तिरंगा ध्वजास सलामी देण्यात आली व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी एसपी प्रतिष्ठानचे संस्थापक समीर पांडगळे, उप मुख्याध्यापक रामेश्वर झाडे, पर्यवेक्षक महादेव वांगीकर, शेखर बडगेरी, प्रशांत सरवदे, किशोर राजगुरू, पप्पू कांबळे, नामदेव बनसोडे, दयानंद बाळशंकर, सुरेश जाधव, टायगर पांडगळे, यश चंदनशिवे, मंगेश पांडगळे, आदित्य वडवेराव, सचिन बडगिरी, अभिनंदन राजगुरू, आकाश रेड्डी, आर्यमान जाधव, अभी जमादार, प्रथमेश तेग्गेल्ली, गणेश उमाप आकाश बनसोडे, निकेकित बनसोडे उपस्थित होते.

## ग.ल. कुलकर्णी विद्यालय

ग. ल. कुलकर्णी विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला त्यावेळी ही संस्थापक श्री. बी. एस. कुलकर्णी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मुख्याध्यापिका ऐश्वर्या कुलकण, शिक्षिका संगीता शिवशरण यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी ग.ल.कुलकर्णी विद्यालयातील ए.टी.एस. परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्वांना प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच शासनाच्या असाक्षर परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्वांना प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका अर्चना बिराजदार, भीमाशंकर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका आरती गुंडे उपस्थित होते. सूत्रसंचालन कविता थांबत यांनी केले तर आभार स्वरांगी मोहोळकर यांनी मानले

# सात वर्षानंतरही मंद्रूपला नवीन पाणीपुरवठा योजनेची प्रतीक्षा

## अनेक वॉर्डात महिन्यातून एकदा पाणीपुरवठा, पावसाळ्यातही नागरिकांची पाण्यासाठी भटकंती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

जानेवारी २०१८ मध्ये तत्कालीन पाणीपुरवठामंत्री बबनराव लोणीकर व आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते मंद्रूपच्या नवीन पाणीपुरवठा योजनेचा शुभारंभ करण्यात आला . ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी योजनेचे काम पुर्णत्वास नेऊन नागरिकांना सुरळीत व मुबलक पाणीपुरवठा करणे गरजेचे असताना ठेकेदारांच्या मनमानी व प्रलंबित कामामुळे नवीन योजनेतून पाणीपुरवठा सुरू होण्यासाठी सात वर्षे प्रतिक्षा करावे लागले. सत्ताधिकाऱ्यांकडून १५ ऑगस्टला नवीन योजनेतून गावाला सुरळीत पाणीपुरवठा करण्याचे जाहीर करण्यात आले. मात्र अद्याप अनेक वॉर्डात महिन्यातून एकदा पाणीपुरवठा सुरू असल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. मंद्रूपच्या नागरिकांना नवीन पाणीपुरवठा योजनेतून मुबलक पाणीपुरवठ्याची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

तत्कालीन आमदार रतिकांत पाटील यांच्या कार्यकाळात मंद्रूपला नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली. त्यानंतर लोकवर्गणी आणि शौचालय अटीमुळे नवीन योजनेच्या कामाला मूहूर्त मिळाले नाही. काम प्रलंबित राहण्यासाठी सत्ताधारी व विरोधकही पाठपुरावा करण्यात अपयशी ठरले. त्यामुळे २००४ च्या काळातील योजना प्रत्यक्षात येण्यासाठी जवळपास २० वर्षे प्रतीक्षा करावे लागले. वीस वर्षानंतर योजना प्रत्यक्षात येत असताना नवीन योजनेसंदर्भात विविध त्रुटीही सांगण्यात येत आहे. ठेकेदारांनी चुकीचे व नियमबाह्य काम केल्याचे सांगण्यात येत आहे.

भाजपाच्या कार्यकाळात योजना पूर्ण करून मंद्रूपच्या नागरिकांना सुरळीत व दररोज पाणीपुरवठा करण्याचा प्रयत्न झाला. मात्र ठेकेदारांनी काम पूर्ण करण्यास विलंब लावल्याने स्वप्न अपूर्ण राहिले. ग्रामपंचायतीवर कोरे गटाची सत्ता येऊन अडीच वर्षे उलटले तरी अद्याप नवीन योजनेतून पाएीपुरवठा सुरू झाला नाही. त्यामुळे पंधरा कोटी निधी खर्चूनही अनेक वॉर्डात पंधरा ते वीस दिवसातून एखदा पाणीपुरवठा करण्यात येत आहे. त्यामुळे मंद्रूपच्या नागरिकांना ऐन पावसाळ्यात पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.

### सत्ताधाऱ्यांचा अयशस्वी प्रयत्न

सत्ताधाऱ्यांनी श्रेय घेण्यासाठी १५ ऑगस्ट रोजी नवीन योजनेतून पाणीपुरवठा करण्यासाठी प्रयत्न केला. रात्री जलवाहीनी जोडणी करण्यात आली. अनेक टाक्यांमध्ये पाणी सोडून तपासणी करण्यात आली. मात्र १५ ऑगस्ट रोजी मंद्रूपच्या नागरिकांना पाणीटंचाइपासून स्वातंत्र्य मिळाले नाही. गावातील अनेक टाक्यांमध्ये पाणी सोडून तपासणी करण्यात येत असल्याने मंद्रूपच्या नागरिकांना सुरळीत व दररोज पाणीपुरवठयासाठी आणखी काही दिवस प्रतीक्षा करावी लागणार आहे.

### महिन्यातून एकवेळेस पाणीपुरवठा

वॉर्ड क्रमांक १ मध्ये महिन्यातून एकदा पाणीपुरवठा करण्यात येत असल्याने नागरिकांना पाण्याची प्रतीक्षा करावी लागत आहे. सत्ताधिकाऱ्यांकडून नवीन योजनेचे गाजर दाखविण्यात येत असल्याने सुरळीत व दररोज पाणीपुरवठा कधी होणार ? असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे. अनेक वर्षांपासून वॉर्ड क्रमांक १, २ व ३ मधील नागरिकांना पाणीटंचाइचा सामना करावा लागत आहे. मात्र सत्ताधाऱ्यांकडून उपाययोजना होत नसल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे.

---

### महत्वाचे...



## महाराष्ट्र विद्यालयात पालक-शिक्षक मेळावा

**बार्शी, दि. १८ ऑगस्ट-**

महाराष्ट्र उच्च माध्यमिक विद्यालय बार्शी येथे विद्यार्थी पालक शिक्षक मेळावा (कला विभाग) आयोजित करण्यात आला होता. यावेळी विद्यालयाच्या प्राचार्या के. डी. धावणे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच उपप्राचार्य बागल यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन बेडकुते व डमरे यांनी केले. आभार घावटे यांनी मानले.



## क्रांती ज्योती महिला हक्क समितीच्या जिल्हाध्यक्षपदी सोनाली गाढवे

**बार्शी, दि. १८ ऑगस्ट-**

क्रांती ज्योती महिला हक्क समितीच्या सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी बार्शी येथील सोनाली गौरीशंकर गाढवे यांची निवड करण्यात आली आहे. समितीची महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच बार्शी येथे पार पडली. या बैठकीस संस्थापक अध्यक्षा राधा थोरात उपस्थित होत्या. थोरात यांच्या हस्ते सोनाली गाढवे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी लक्ष्मी क्षीरसागर, रुपाली क्षीरसागर, शिला वाघमारे, रेखा गाढवे, कालींदा पवार, गोळवणबाई बिवने, सुजाता गायकवाड, उज्वला गायकवाड, अंजु देवकर, ललिता खडेंकर, आश्विनी सदावने उपस्थित होते.



## मुख्याध्यापिका संगीता करमाळकर यांचा सेवापूर्तीनिमित्त सत्कार

**करकंब, दि. १८ ऑगस्ट-**

न्यू.इंग्लिश स्कूल करकंब प्रशालेच्या मुख्याध्यापिका संगीता करमाळकर या ३१ जुलै २०२५ रोजी सेवानिवृत्त झाल्या. त्यांच्या सेवापूर्तीबद्दल व त्यांनी केलेल्या कार्याबद्दल आभार व्यक्त करून सत्कार करण्यासाठी प्रशालेतर्फे सत्कार सोहळा आयोजित केला होता. याप्रसंगी मुख्याध्यापिका करमाळकर यांनी मनोगत व्यक्त करताना त्यांनी आपले स्वर्गीय पती रवी विठ्ठल करमाळकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रत्येक वर्षी इयत्ता दहावीमध्ये विज्ञान विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास बक्षीस देणार असल्याचे जाहीर केले. याप्रसंगी संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक आदिनाथ देवकते, मा.अध्यक्ष तथा सेवानिवृत्त गट शिक्षणाधिकारी वसंत बुगड, पुणे विभाग मा.शिक्षण संचालिका सुजाता लोहकरे, संस्था अध्यक्ष संजीवकुमार म्हेत्रे, सचिव अविनाश देवकते, स्कूल कमिटी अध्यक्ष प्रशांत वेळापूरकर समस्त करमाळकर व बुगड परिवाराचे स्नेही, प्रगतशील बागायतदार गुळमे, पत्रकार लक्ष्मण जाधव, राजेंद्र करपे, अरुण लोहकरे, केंद्रप्रमुख खंदारे, रवी वेळापूरकर उपस्थित होते.



## खांडवीच्या मतिमंद व मूकबधीर शाळेस शालेय साहित्य व फ्रीज भेट

**बार्शी, दि. १८ ऑगस्ट-**

डॉ. साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त खांडवीच्या सोजर मतिमंद व मूकबधिर शाळेतील विद्यार्थ्यांना अन्नदान शालेय साहित्य व फ्रिज भेटवस्तू देण्यात आल्या. हा उपक्रम बार्शीतील तरुण सोमनाथ रणदिवे व रामेश्वर रणदिवे या दोन बंधूंनी मित्रांच्या सहकार्यातून केला. यावेळी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली. कार्यक्रमास ज्योतिर्लिंग बाप्पा कसबे- माजी नगरसेवक, दलित महासंघाचे सोलापूर जिल्हाध्यक्ष सुनील अवघडे, जामखेडचे राणा सदाफुले, पुण्याचे राहूल चव्हाण, शाम मोरे, नाथा मोहिते, केशव नेटके, अमोल कांबळे, लक्ष्मण धावारे, नेते आबासाहेब धावारे, माया जाधव, प्रमिला झोंबाडे, रोहिणी चोबे उपस्थित होते. सोमनाथ व रामेश्वर रणदिवे हे वैयक्तिक स्वखर्चातून सदरचा उपक्रम राबवत आहे. यावेळी ज्योतिर्लिंग कसबे, सुनील अवघडे, आबासाहेब धावारे, संदीप मोरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## ओंकार कारखान्यात स्वातंत्र्य दिन साजरा

**पिलीव, दि. १८ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील ओंकार साखर कारखान्यावर स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. यावेळी संचालक प्रशातराव बोत्रे-पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी जनरल मॅनेजर भिमराव बाघमोडे होते. यावेळी प्रगतशील बागायतदार राम मगर यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी कामगार व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. यावेळी नितीन जाधव, बापूराव वाघमोडे, डिसलरी मॅनेजर पि डी पाटील, चिफ इंजिनिअर तानाजी देवकते,धनाजी पवार, मेजर मोहन घोडके, धनाजी पवार, समाधान गायकवाड, ज्ञानेश्वर बोडरे, पिसे उपस्थित होते. रमेश आवताडे यांनी आभार मानले.

---

## लोकमंगल महाविद्यालयातर्फे 'गटशेती' वर व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा मार्फत ग्रामीण कृषी कार्यानुभव (रावे) कार्यक्रमांतर्गत मौजे. राजूर (ता. दक्षिण सोलापूर) येथे गटशेती या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजुर गावचे तंटामुक्त समिती अध्यक्ष अभिमन्यू पाटील होते.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. प्रा. प्रथमेश बाळपुरी यांनी मार्गदर्शनात शेतकरी उत्पादक कंपनी आणि शेतकरी गटांचे महत्त्व हे गटशेती चळवळीसाठी महत्वपूर्ण



असल्याचे नमूद केले. शेतकरी गटांमुळे सहभागी शेतकऱ्यांचे वार्षिक उत्पन्न सरासरी ३० टक्क्यांनी वाढले आहे. गटशेतीमुळे बियाणे, खते आणि कीटकनाशके यांची सामूहिक खरेदी केल्यास १५ ते २५ टक्के खर्च बचत होते. तसेच, सामूहिक विक्रीमुळे पिकांना बाजारभावापेक्षा १० ते २० टक्के अधिक दर मिळतो. अध्यक्षीय मनोगत अभिमन्यू पाटील यांनी केले. कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. अमोल शिंदे आणि कृषी विस्तार विभाग प्रमुख प्रा. प्रज्ञा कुदळे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कृषिदूत आकाश बिराजदार, मयूर दळवी, आकाश आलाट, साई वंशी पाला, दानिश शेख आणि रोहन बंगार यांनी केले.

## प्राणघातक हल्ला, लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी अटकेतील आरोपीस जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१८ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयाने भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत गंभीर हल्ला, लैंगिक अत्याचार आणि धमकी प्रकरणात अटकेतील आरोपी नागनाथ गोरख गुंड (वय ४२, रा. चिंचोली काटी एम.आय.डी.सी., (ता. मोहोळ, जि. सोलापूर) यास सशर्त जामीन मंजूर केला आहे.

मोहोळ पोलिस ठाण्यात गु.र.क्र. ०२७१/२०२५ नुसार भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०९, ७४, ७५(१), ७८, ७९, ११८(१) आणि ११५(२) अन्वये ०६ मार्च २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी हा वारंवार अनैतिक शारीरिक संबंधाची मागणी करत होता व तसेच आरोपी फिर्यादीस गेल्या काही महिन्यांपासून नवरा-बायकोप्रमाणे संबंध ठेवण्याचा दबाव टाकत छेडछाड केली होती. ०१ मार्च २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास फिर्यादी घरात एकटी असल्याचा फायदा घेत आरोपीने लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केला असता फिर्यादीने बचाव करिता विरोध केल्यावर आरोपीने रागाच्या भरात लोखंडी धारदार कात्रीने फिर्यादीच्या गळ्यावर, उजव्या हाताच्या अंगठ्यावर आणि डाव्या पायाच्या गुडघ्यावर वार करून गंभीर दुखापत केली. तसेच वाद सोडविण्यासाठी आलेल्या अर्धांगवायू पतीस व शेजाऱ्याला देखील ढकलून इजा पोहोचवली. घटनेनंतर फिर्यादीस सोलापूर येथील हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. आरोपीने अटकेनंतर आपला जमीन अर्ज मे. जिल्हा व सत्र न्यायालय सोलापूर येथे दाखल केला होता.तसेच मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश केंद्रे यांनी आरोपीचा जामिनाचा अर्ज सशर्त मंजूर केला आहे. वरील प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. कदीर औटी, ॲड. शरद गावडे, ॲड. दत्तात्रेय कापुरे, ॲड. वैभव बोंगे, ॲड. ओंकार फडतरे, ॲड. मोहीम पठाण आणि ॲड. शिवरत्न वाघ यांनी काम पाहिले.

---

## जिल्हा परिषद शाळांमध्ये सिसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा मुहुर्त कधी ?

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १८ ऑगस्ट-**

महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील बदलापूर याठिकाणी शाळेतील लहान मुलीवर अत्याचार झाल्यानंतर सर्व जिल्हा परिषदेच्या शाळेत सिसिटिव्ही कॅमेरे बसविण्याचे शासन जाहीर केले. मात्र वर्ष होऊन गेले तरी अदयापही महाराष्ट्रातील अनेक जिल्हयामध्ये जिल्हा परिषद शाळांमध्ये अदयापही सिसिटीव्ही कॅमेरे बसविलेलेच नाहीत. याबाबत प्रशासन उदासीन दिसून येत आहे.



महाराष्ट्रातील सर्वच जिल्हा परिषद शाळांमध्ये सिसिटीव्ही कॅमेरे बसविण्याचे स्पष्ट आदेश देऊनही अनेक जिल्हयात याचे काम झालेले नाही. शासकीय व खासगी जिल्हा परिषद शाळेतील मुलींच्या सुरक्षीतेबरोबरच शैक्षणिक गुणवत्ता, उपस्थिती, शिस्त यासाठी खरेतर सिसिटिव्ही कॅमेरे आवश्यक आहेत. हे एक प्रकारे आधुनिक तंत्रज्ञान असून याचा शाळांना नक्कीच उपयोग होणार आहे. मात्र प्रशासन याबाबत अद्यापही पुर्णपणे उदासीनच दिसत आहे. यामागे निश्चित कारण काय हे समजु शकले नाही यासाठी आवश्यक असणारा निधी कोण देणार शासन की ग्रामपंचायत स्तरावर असणाऱ्या पंधराव्या वित्त आयोगातुन याचा खर्च करायचा याचा स्पष्ट आदेश नसल्याचे बोलले जात आहे. खरेतर निधीवाचुन हे काम खडले आहे की कोणत्या कारणामुळे याचे कारण अद्यापही गुलदस्त्यातच आहे. पण हा म हत्वाचा प्रश्न कधी मार्गी लागणार याकडे विद्यार्थी व पालकांचे लक्ष लागले आहे.

## ॲक्टिव्ह युथ सेल्फ हेल्प ग्रुपचा वर्धापन दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १८ ऑगस्ट-**

ॲक्टिव्ह युथ सेल्फ हेल्प ग्रुपचा वर्धापन दिन बार्शी येथील संत नरहरी महाराज मंदिरात साजरा झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सभासद योगेश कारंजकर तर प्रमुख पाहुणे म्हणून वक्ता, लेखक सचिन वायकुळे, वृक्ष संवर्धन समितीचे अध्यक्ष, वृक्षमित्र उमेश काळे तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून रोटरी क्लबचे अध्यक्ष संजय हिंगमिरे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात संत नरहरी महाराज, श्री स्वामी समर्थ, श्री महालक्ष्मी यांच्या मूर्तीचे पूजन करून करण्यात आली. प्रथम ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष सागर बिडकर यांनी बचत गटाच्या पाच वर्षाच्या यशस्वी वाटचालीचे आढावा वाचन केले. या वर्धापन दिनानिमित्त क्टिव्ह युथ सेल्फ हेल्प ग्रुपच्यावतीने अल्पबचत योजनेतील सभासदांचा भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. तसेच ग्रुपच्या प्रेरणेने बार्शी व परिसरात स्थापन झालेल्या बचत गटांचा आणि आधीपासून कार्यान्वित असलेल्या बचत गटांचा स्वयंसिद्ध पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी अमर लोमटे, ज्ञानेश्वर वाघमारे, किशोर मोरे, मुकेश कोल्हाळे यांचा उत्कृष्ट सभासद म्हणून सन्मान करण्यात आला तर यावर्षीचे क्टिव्ह युथ पुरस्काराचे मानकरी पोलीस हवालदार संताजी अलाट हे ठरले. प्रास्ताविक अविनाश शीलवंत यांनी केले. तसेच संजय मसुते यांनी सूत्रसंचालन यांनी केले.



## पिलीव येथील नाभीक समाजाच्या अध्यक्षपदी मंगेश वाघमारे

**तभा वृत्तसेवा**
**पिलीव, दि. १८ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील नाभिक समाजाच्या संघटनेच्या अध्यक्षपदी मंगेश प्रभाकर वाघमारे यांची तर उपाध्यक्षपदी अमोल काळे ,खजिनदारपदी सारंग काळे ,सचिवपदी सचिन देवकर, सहसचिवपदी आदिनाथ शिंदे यांच्या सर्वानुमते बिनविरोध निवडी करण्यात आल्या. या निवडीवेळी माजी अध्यक्ष निलेश शिंदे ,सचिन वाघमारे, सुरेश काळे, नंदकुमार काळे, तन्मय काळे ,विवेक काळे, रणजित काळे, ॲड. किशोर काळे, गणेश शिंदे, जाधव ,देवकर, काळे उपस्थित होते. निवडीनंतर मान्यवरांच्या हस्ते सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

---

## पूर्व विभाग मध्यवर्ती मंडळातर्फे पारितोषिक वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

पूर्व विभाग मध्यवर्ती मंडळातर्फे पारितोषिक वितरण सोलापूर : पूर्व विभाग मध्यवर्ती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातर्फे गतवर्षी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण थाटात करण्यात आले.

कन्ना चौक येथील तोगटवीर सांस्कृतिक भवन येथे आमदार विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते हा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पूर्व विभाग मध्य सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे ट्रस्ट अध्यक्ष व माजी महापौर जनार्दन कारमपुरी होते. यावेळी ट्रस्ट सचिव प्रा. अजय दासरी, विश्वस्त विष्णू कारमपुरी, उद्योजक प्रमोद मोरे, दैनिक तरुण भारतचे माजी संपादक, विश्व हिंदू परिषदेचे विभाग सहमंत्री विजयकुमार पिसे, अरविंद शिंदे गोपीकृष्ण वड्डेपल्ली, उमेश मामड्याल, पिंटू



काळे, पुरुषोत्तम पोबत्ती, श्रीनिवास आडम, मेघनाथ येमूल, पूर्व विभाग मध्यवर्ती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत कोंडा, कार्याध्यक्ष विनोद केंजरला, सेक्रेटरी मनोज पिस्के, खजिनदार अनिल जक्कन, मिरवणूक प्रमुख राजदत्त गुंजाळ, शुभम एक्कलदेवी, अविनाश मंगलपल्ली, बालाजी कुंटला, रोहित कोंकती उपस्थित होते.

या कार्यक्रमात उत्कृष्ट देखाव्याचे प्रथम पारितोषिक वितरण आप्पा गणपती प्रतिष्ठानला, लेझीमचे प्रथम पारितोषिक वीर गणपती मंडळाला, पूजा व सजावट प्रथम पारितोषिक पूर्व विभाग मानाचा ताता गणपती मंडळाला, अन्नदान प्रथम क्रमांक पारितोषिक अन्नदाता दत्तनगर बाप्पा गणपती मंडळाला देण्यात आले. प्रारंभी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत कोंडा, प्रास्ताविक विष्णू कारमपुरी यांनी केले. सूत्रसंचालन व्यंकटेश आकेन यांनी तर आभार मिरवणूक प्रमुख राजदत्त गुंजाळ यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नरेंद्र बोमेन, श्रीनिवास चिंताकिंदी, दशरथ नंदाल, महेश द्यावनपल्ली, सिद्राम कोत्तापल्ली आदींनी परिश्रम घेतले.

## विद्यानिकेतन हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची तिरंगा रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

विद्यानिकेतन हायस्कूल व हिंगुलांबिका प्राथमिक शाळेच्या वतीने तिरंगा रॅली काढण्यात आली.

या तिरंगा रॅली दरम्यान विद्यार्थ्यांची भव्य मानवी साखळी तयार करून मानवंदना देण्यात आली. कार्यक्रमास बहुसार शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बापू ढगे, संस्थेचे सचिव विजय पुकाळे उपस्थित होते. प्रारंभी प्रशालेपासून ही रॅली तिरंगा ध्वज हातात घेऊन भारत माता की जय घोषणा देत संयुक्त चौक, भावसार रोड, समाचार चौक या मार्गावरून माणिक चौक येथे पोहोचली. कार्यक्रमास मुख्याध्यापक गोपीनाथ नवले, पर्यवेक्षक शंकर गिरी, ज्येष्ठ शिक्षक विद्याधर रंगदळ, हिंगुलांबिका प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद हंचाटे उपस्थित होते.

## त्रिमूर्ती गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी नारायण गडदे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१८ ऑगस्ट-**

श्री राम गल्ली येथील त्रिमूर्ती गणेशोत्सव तरुण मंडळाच्या अध्यक्षपदी नारायण गडदे यांची एकमताने निवड करण्यात आले. बैठकीत नूतन अध्यक्षपदी नारायण गडदे, उपाध्यक्ष स्वामीराव भोसले, खजिनदार विजय स्वामी, रोहित सुतार, सचिव कैलास मलगोंडा, कार्याध्यक्ष सोमशेखर मलंग, विनायक सुतार, तेज सजावट विनायक भोसले प्रतीक स्वामी तर मिरवणूक प्रमुख म्हणून ज्योती पत्रकार प्रशांत भगरे, शिवानंद फलारी, अरविंद पाटील, सोमशेखर जमशेट्टी यांची निवड करण्यात आली आहे. बैठकीस मंडळाचे अविनाश मंगरुळे, बाबुराव राम शेट्टी, अशोक मलगोंडा, विश्वनाथ स्वामी, संतोष भोसले, ज्ञानेश्वर भोसले, संदीप कुंभार, सचिन



स्वामी, बाळू पाटील, हनुमंत सुतार, धनंजय गडदे, प्रथमेश स्वामी, सिद्धू रामशेट्टी, काशीराया मलगोंडा, महेश पाटील, गणेश भोसले स्वामीनाथआलदी मल्लिनाथ तानवडे विजयकुमार बिराजदार संदीप केत नीलकंठ हिंदोळे शरण बसप्पा आष्टगी राजू गवळी किरण साठे विजय मलंग, श्रीशैल शाली, किरण वेदपाठक उपस्थित होते.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## सुस्ते येथे सुधाकरपंत परिचारक यांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा,**
**सुस्ते, दि. १८ ऑगस्ट-**

पंढरपूर तालुक्यातील सुस्ते येथे दिलीप घाडगे मित्र मंडळाच्या वतीने माजी आमदार सुधाकरपंत परिचारक यांच्या पाचव्या पुण्यतिथी अभिवादन करण्यात आले. यावेळी पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दिलीप घाडगे यांच्या हस्ते स्वर्गीय सुधाकरपंत परिचारक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सरपंच विशाल कसबे, बाळासाहेब लोकरे, अनिल घाडगे, दत्तात्रय बोबडे, राजेंद्र बोबडे, बाबासाहेब करपे, सोसायटीचे चेअरमन संभाजी चव्हाण, हरिभाऊ घाडगे, राजेंद्र चव्हाण, माणिक चव्हाण, अभिजीत घाडगे, आरपीआयचे तालुका उपाध्यक्ष भैया फडतरे, दत्तात्रय वायदंडे, मतीन शेख, जीवन रणदिवे, दिलीप चव्हाण, बाळासाहेब पवार, रमेश रोकडे, अरुण करपे, दत्तात्रय चव्हाण, जनरथ कदम, रवी चव्हाण, रवी जाधव, सागर सुरवसे, बबन पवार, दत्तात्रय नागटिळक, विलास तळेकर, सुमित खवळे आदी उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### श्रावण सोमवारनिमित्त सोमेश्वर मंदिरात भाविकांची गर्दी

**सदाशिवनगर, दि. १८ ऑगस्ट-**



सदाशिवनगर (ता. माळशिरस) येथील शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी १२ व्या शतकातील महादेव मंदिर असून अनेक जुन्या ग्रंथात असून हे मंदिर सोमेश्वर मंदिर म्हणून ओळखले जाते. मंदिरात केलेले कोरीव काम हे चालुक्यकालीन स्थापत्य कलेचा एक उत्कृष्ठ नमुना आहे.या मंदिरात आज शेवटच्या श्रावणी सोमवार दिवशी भाविक दर्शनासाठी गर्दी केली होती. या मंदिराच्या गर्भगृहात छताला उत्तम दगडी रचना आहे. गाभाऱ्यात पाताळलिंगसदृश्य लिंग आहे. गर्भगृहात महादेवाची पुरातन पिंड आहे.प्रवेश द्वारावर सुरेख कोरीव नक्षीकाम केलेले आहे.त्याचप्रमाणे मूर्ती कोरल्या आहेत. गर्भगृहापुढे पुरातन गणेशाची मूर्ती आहे. तसेच दुर्मिळ वराहाची मूर्ती आहे. या मंदिराची बांधणी सिमेंट अथवा चुन्यात झालेली नसून एकात एक दगड गुंफून लॉक पद्धतीने झालेली आहे. मंदिराचे शिखर उंच आहे. मंदिराच्या प्रवेश द्वाराजवळ नंदीची मूर्ती आहे. श्रावण महिन्यात भाविक दर्शनासाठी मोठी गर्दी करतात. वैशिष्ट्यापूर्ण योजनेतून ९० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला होता. या निधीमधून मंदिरा समोर मोठा सभामंडप, संरक्षक भिंत, विद्युतीकरण, रस्त्यापर्यंत पेवर ब्लॉक, मोठी कमान व त्यास गेट बसविण्यात आले असून रंगकाम करून नुतनीकरण करण्यात आले आहे.



### कोळेगांव येथे शालेय साहित्य वाटप

**पिलीव, दि. १८ ऑगस्ट-**

कोळेगांव (ता.माळशिरस) येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली.यानिमित्ताने शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. याप्रसंगी शिवसेना माळशिरस तालुकाप्रमुख सतीश सपकाळ, जिल्हा उपप्रमुख दादासाहेब लोखंडे,कार्यप्रमुख महादेव तुपसौंदर, तालुका उपप्रमुख सुनील साठे, तानाजी भोळे, ॲड. धनंजय दुपडे, माजी उपसरपंच आदीकराव सावंत,जोतिराम सावंत,जनसेवा संघटनेचे नेते नामदेव सावंत,प्रवीण सावंत, प्रा शहाजी पारसे,समाधान वाघमारे उपस्थित होते. यावेळी महादेव तुपसौंदर, दादासाहेब लोखंडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे समर्थक व बहुजन रयत परिषद माळशिरस तालुका अध्यक्ष समाधान वाघमारे व सहकाऱ्यांनी तालुका प्रमूख सतिश सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी औदुंबर धांडोरे,आशिष धांडोरे, लक्ष्मण पारसे, नेताजी धोत्रे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. शहाजी पारसे यांनी केले.



### सांगोला अर्बन बँकेतर्फे 'आपुलकी'चे राजेंद्र यादव यांचा सन्मान

**सांगोला, दि. १८ ऑगस्ट-**

सांगोला अर्बन बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त उत्कृष्ट सामाजिक कार्याबद्दल आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव यांचा आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या हस्ते बँकेच्या सभागृहात सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

### महावितरणतर्फे २० ऑगस्ट रोजी ग्राहक तक्रार निवारण दिन

**पंढरपूर,दि. १८ ऑगस्ट -**

महावितरणतर्फे जिल्ह्यातील सर्व विभागीय कार्यालयांमध्ये दि.२० ऑगस्ट रोजी ग्राहक तक्रार निवारण दिनाचे आयोजन केले असल्याची माहिती अ. भा. ग्राहक पंचायतीचे जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली. वीज ग्राहकांच्या विविध प्रकारच्या तक्रारी निवारण्यासाठी महावितरणतर्फे दर महिन्याच्या तिसऱ्या बुधवारी आयोजन करण्यात येते त्याप्रमाणे २० ऑगस्ट रोजी ग्राहक तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्यात आले आहे तरी २० ऑगस्ट रोजी जिल्ह्यातील पंढरपूर, बार्शी, अकलूज, सोलापूर शहर व सोलापूर ग्रामीण अशा सर्व विभागीय कार्यालयांमध्ये सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत ग्राहकांनी उपस्थित राहून आपल्या तक्रारी मांडून त्यांची सोडवणूक करून घ्यावी. यावेळी अतिरिक्त कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता, सहा. अभियंता हे अधिकारी उपस्थित राहून समस्या सोडविणार आहेत. तरी पंढरपूर, बार्शी, अकलूज, सोलापूर ग्रामीण, सोलापूर शहर या ठिकाणी सर्व प्रकारच्या वीज ग्राहकांनी आपल्या अवाजवी बील, सरासरी बील आकारणी, वीज बिल वेळेत न मिळणे, मीटर रीडिंग वेळेत न घेणे, योग्य दाबाने वीजपुरवठा न होणे, नविन मीटर वेळेत न मिळाल्यामुळे ग्राहकांना स्वखर्चाने आणलेल्या मीटरची संपूर्ण रक्कम न मिळणे, शेतकरी ग्राहकांना वेळेत डी.पी.बदलून न मिळणे, सोलर सिस्टीम अशा कोणत्याही स्वरुपातील लिखित तक्रार अर्जासह उपस्थित राहावे, असे आवाहन महावितरण सोलापूर मंडलचे अधिक्षक अभियंता सुनिल माने, दीपक इरकल, विनोद भरते, सुभाष सरदेशमुख, विनय उपाध्ये, सुहास निकते,माधुरी परदेशी, अण्णा ऐतवाडकर, पांडुरंग अल्लापूरकर, संभाजी लंगोटे यांनी केले आहे.

## वाळूज (दे) परिसरात बिबट्याचे ठसे

### शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**तभा वृत्तसेवा,**
**वाळूज, दि. १८ ऑगस्ट-**



मोहोळ तालुक्यातील वाळूज (दे) येथील जाधववस्ती शेजारील ऊसाच्या शेतात बिबट्याचे ठसे आढळून आल्याने ग्रामस्थ व शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे.

शुक्रवारी सकाळी पांडुरंग कोळी हे शेळ्या चारण्यासाठी गेले असता मारुती कादे यांच्या ऊसाच्या शेतातील चिखलात प्राण्याचे मोठे ठसे दिसले. प्रसंगावधान राखून त्यांनी या ठशांचे फोटो वनविभागाला पाठवले. वनपरिक्षेत्र अधिकारी योगेश घोडके यांनी या ठशांचा तपास करून ते बिबट्याचेच असल्याची पुष्टी केली. माहिती मिळताच वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून परिसरात गस्त व शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे.वनपरिक्षेत्र अधिकारी घोडके म्हणाले, सदरचे ठसे हे बिबट्याचेच असल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र आतापर्यंत या प्राण्याने मानवी वस्तीत किंवा पाळीव जनावरांवर हल्ला केलेला नाही. नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क राहावे. आमचे पथक सतत गस्त घालत असून परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे.

**वनविभागाने नागरिकांना पुढील सूचना दिल्या आहेत**
**शेतात एकट्याने जाणे टाळावे.**
**सोबत काठी ठेवावी.**
**रात्री बाहेर पडताना टॉर्च व मोबाईलवर मोठ्या आवाजात गाणी वापरावीत.**
**जनावरे सुरक्षित बंदिस्त गोठ्यात बांधावीत.**
**अफवांवर विश्वास न ठेवता थेट वनविभागाशी संपर्क साधावा**



## विठ्ठल व धाराशिव कारखान्याच्या संचालकांनी घेतली शरद पवारांची भेट

### आ. अभिजीत पाटलांचे केले कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १८ ऑगस्ट-**

दिल्ली येथे देशाचे नेते तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खा. शरदचंद्र पवार यांची पंढरपूर येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना व धाराशिव साखर कारखाना यांच्या संचालक मंडळांनी सदिच्छा भेट घेतली.

यावेळी सोलापूर जिल्ह्यातील सर्वांगणीक विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. ऊस, केळी, द्राक्षे, डाळिंब, केळी खसंशोधन यावर चर्चा करून पवार यांनी मार्गदर्शन केले.

या बरोबरच श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तथा माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांना व्हिडिओ कॉलद्वारे संपर्क करून मतदारसंघातील करत असलेल्या कामांविषयी कौतुक केले. अधिवेशनामध्ये अभ्यासपुर्ण प्रश्न उपस्थित करत आहेत यांची देखील नोंद पवार यांनी घेतली आहे. यावेळी खासदार शरद पवार यांनी आमदार पाटील यांचे कौतुक केले. यावेळी दिनकर चव्हाण, संभाजी भोसले, दशरथ जाधव, सुरेश भुसे, अशोक तोंडले, अशोक घाडगे, सिताराम गवळी, कालिदास साळुंखे, दत्तात्रय नरसाळे, नवनाथ नाईकनवरे, धनंजय काळे, साहेबराव नागणे, बाळासाहेब हाके, जनक भोसले, सिद्धेश्वर बंडगर, विठ्ठल रणदिवे, प्रवीण कोळेकर, सचिन वाघाटे, सचिन पाटील, तानाजी बागल, समाधान गाजरे, महेश खटके, गणेश ननवरे, उमेश मोरे, धनाजी खरात तसेच धाराशिवचे संचालक संतोष कांबळे, भागवत चौगुले, सुरेश सावंत, संदीप खारे, संजय खरात, सुहास शिंदे यांनी भेट घेतली.




## सुधाकरपंत परिचारक यांच्या पुण्यतिथीनिमित्त २६७ जणांचे रक्तदान

### राजकीय व विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १८ ऑगस्ट-**

वाखरी (ता. पंढरपूर) येथे पांडुरंग परिवाराच्या वतीने कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक यांचे पाचवे पुण्यस्मरण श्रद्धाभावाने व विविध सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरे करण्यात आले. दिवसभर धार्मिक, सामाजिक कार्यक्रमांमधून सुधाकरपंतांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

रक्तदान शिबिराने पुण्यस्मरण कार्यक्रमाची सुरुवात झाली. यामध्ये २६७ जणांनी रक्तदान करून सुधाकरपंतांच्या समाजसेवेच्या परंपरेला सलाम अर्पण केला.

यानंतर हभप जयवंत बोधले महाराज यांनी कीर्तनातून सुधाकरपंतांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. त्यांच्या समाजप्रेम, लोकाभिमुख कार्यपद्धती आणि कर्मयोगी वृत्तीचे प्रभावी वर्णन करून उपस्थितांना प्रेरणादायी संदेश दिला.

दुपारी पांडुरंग परिवाराने पुष्पांजली अर्पण करून सुधाकरपंतांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. दिवसभर परिसरातील नागरिक, शेतकरी विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून सुधाकरपंतांना अभिवादन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पांडुरंग चे चेअरमन प्रशांत परिचारक, युटोपियन शुगरचे उमेश परिचारक, व्हा. चेअरमन कैलास खुळे, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला अर्बन बँकेचे चेअरमन सतीश मुळे, मार्केट कमिटीचे चेअरमन हरीश गायकवाड, व्हाईस चेअरमन राजू बापू गावडे, विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती सदस्य जळगावकर, पंचायत समिती सभापती जयश्री व्हरगर, संत दामाजी सहकारी साखर कारखान्याचेचेअरमन शिवानंद पाटील, धनश्री परिवार प्रमुख शिवाजीराव काळुंखे, बी.पी. रोंगे, पंढरपूर-मंगळवेढ्यातील मान्यवर, पांडुरंग कारखान्याचे संचालक, मार्केट कमिटीचे संचालक, जिल्हा परिषद सदस्य, नगरपालिकेचे सदस्य, ज्येष्ठ संचालक दिनकरराव मोरे उपस्थित होते.

## आनंदनगरात ज्ञानेश्वरी पारायण सोहळा



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१८ आँगस्ट -**

येथील विघ्नहर्ता गणेश मंदिर आनंदनगर टाकळीरोड येथे संपन्न झालेल्या ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास भाविकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद देत सहभाग नोंदविल्याची माहिती या पारायण सोहळ्याचे प्रमुख आयोजक तथा द.ह.कवठेकर प्रशालेचे माजी मुख्याध्यापक दत्ता तरलगट्टी यांनी दिली.

या पारायण सोहळ्या बद्दल माहिती देताना दत्ता तरळगट्टी यांनी सांगितले की, येथील श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचा रविवार दि.१० आँगस्ट २०२५ पासून प्रारंभ झाला. पारायण सोहळ्याची अधिष्ठान स्थापना आजरेकर-आंबेकर फडाचे मालक ह.भ.प.भागवत महाराज चवरे यांच्या हस्ते सकाळी झाली. त्या नंतर दुपार पासून प्रत्यक्ष पारायणास सुरुवात झाली. या सोहळ्या मध्ये चाळीस ते पंचेचाळीस भाविक प्रत्यक्ष पारायणास उपस्थित होते. या बरोबरच टाकळीरोड उपनगरीय भागातील भाविक देखील या सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दरम्यान असा सोहळा पहिल्यांदाच टाकळीरोड उपनगरीय भागात होत असल्याने चांगला त्याला प्रतिसाद मिळाला आहे.

या पारायणाच्या सर्व वाचकांना ह.भ.प.भागवत महाराज चवरे यांनी ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट म्हणून दिला. हे पारायण रयत शिक्षण संस्थेचे माजी शिक्षक हरिश्चंद्र कोरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले.

या पारायणाची समाप्ती श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज जळगाकर यांच्या हस्ते ग्रंथ पूजनाने झाली. यावेळी आपल्या मनोगतात त्यांनी हे वर्ष माऊलींच्या जन्मोत्सवाचे हे ७५० वे वर्ष आहे. माऊलींच्या ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यात जर आपणास ज्ञानेश्वरी ग्रंथ वाचता आला नाही, पारायण करता आले नाही तरी प्रत्यक्ष पारायण सोहळ्याच्या ठिकाणास जरी प्रदक्षणा घातल्यास वाचनाचे फळ मिळते असे सांगितले.

श्री.जळगावकर महाराज यांच्या हस्ते हरिश्चंद्र कोरे गुरुजी यांचा सन्मान विघ्नहर्ता गणेश मंदिराच्या वतीने करण्यात आला.या सोहळ्यात विघ्नहर्ता गणेश भजनी मंडळाच्या सदस्यांनी तसेच भाग्यश्री बिडकर यांनी विशेष सहाय्य केले. या पारायण सोहळ्यास इतर उपनगरातील सीमा चिंचोळकर,मनिषा घोसे व मनिषा गदगे या उपस्थित होत्या. सोहळ्याची समाप्ती उपनगरातून दिंडीने व महाप्रसाने झाली.

हा पारायण सोहळा द.ह.कवठेकर प्रशालेचे माजी मुख्याध्यापक दत्ता तरळगट्टी यांच्या संकल्पनेतून साकार झाला. या पारायण सोहळ्यासाठी सुरेश भिंगे, अक्का लवटे, जयश्री वास्ते, सुनिता जाधव,सौ.सोनंदकर, सुनंदा पाटील, सौ.घोडके, व इतर महिला सदस्यांनी सहकार्य केले.

## छायाचित्राची क्रांती व प्रगती..!

**जागतिक छायाचित्रकार दिन विशेष**

**सतराव्या शतकात छायाचित्राची सुरुवात झाली. छायाचित्र पूर्णतः प्राप्त होण्यासाठी १८व्या शतकात शेवटी पिन होल कॅमेऱ्याची निर्मिती होऊन २१ व्या शतकात डिजिटल कॅमेरापर्यंत येऊन पोहोचली.**

----------------------

या जगात हे कलेचे क्षेत्र नसते तर इतिहासात पुरावा म्हणून फक्त लेखी स्वरूपात मांडणी झाली असती. इतिहासात छायाचित्राचे महत्व निर्माण झाले. आजही छायाचित्रामुळे आपण मंगळापर्यंत पोहोचलो. मंगळ ग्रहापर्यंत काय स्थिती आहे, कसे वातावरण आहे आणि ती प्रगती सातत्याने सुरू राहिली आहे, ती छायाचित्रामुळे. भारतातला आतंराळवीर शुभांश शुक्ला अभियान पूर्ण करून भारतात परतला. त्यांनी टिपलेले छायाचित्र अथवा त्यांनी चित्रीकरण केलेले चित्र हे देशाने ग्राह्य मानले आहे. तसेच कारगिल, पेहलगामा, सिंदूर या भारताच्या कारवाई युद्ध कारवाईवर छायाचित्राचे महत्व निर्माण झाले आहे. यामुळे शत्रूवर नेमका हल्ला करण्यात छायाचित्राचे फार मोठे योगदान आहे. हे विसरून चालणार नाही. भारताने जगाला पुरावे देण्यासाठी छायाचित्राचाच वापर केला. ही छायाचित्रकाराबद्दल अभिमानाची गोष्ट आहे. ही छायाचित्रामुळे झालेली प्रगती



आहे. छायाचित्रामुळे भरपूर प्रश्नांची उत्तर उपलब्ध झाली, पुरावा म्हणून ग्राह्य मानली गेली.

छायाचित्र कला ही अस्तित्वात नसती तर जगात फार मोठा गोंधळ झाला असता. व्यक्तीशः हीच ती व्यक्ती आहे, असं ग्राह्य मानलं गेलं नसतं. महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद, रवींद्रनाथ टागोर, जमशेदजी टाटा ते आतापर्यंत पंतप्रधान नरेंद्र मोदी अशा अनेक मान्यवरांची नावे घेता येतील. छायाचित्रामुळे सोशल मीडियात वापर वाढला. अनेकांना याचा फायदा होत गेला आणि होतो आहे. या छायाचित्रामुळे घडलेली घटना काही सेकंदात छायाचित्रेत करून जगभर प्रसिद्धी करण्यासाठी सोशल मीडियामध्ये मोठा मोलाचा वाटा आहे. आता जगात ए.आय. तंत्रज्ञानामुळे या छायाचित्रांमध्ये नवीन क्रांती झाली आहे. संगणक तज्ञ अच्युत गोडबोले म्हणतात हजारोंच्या पटीत घेतलेल्या छायाचित्रांमुळे एआय माणसाला हयातीत असल्याचे चित्रण दाखवण्यात येऊ लागले आहे. ही एक छायाचित्रातील क्रांतीच म्हणावी लागेल. छायाचित्रामुळे चॅनल, युट्युब, सोशल मीडिया, ट्विटर, गुगल यांना मोठा फायदा झाला आहे. यामुळे आर्थिक विकासात फार मोठी क्रांती झाली आहे. मोठ्या मोठ्या नावाजलेल्या कंपन्या या क्षेत्रात आपले बस्तान बसू लागले आहे. ही छायाचित्रामुळे झालेली प्रगतीच म्हणावी लागेल. आताकायद्याच्या चौकटीत बसवण्याचाही प्रयत्न सुरू झालेला आहे. यासाठी नवीन नवीन कायदे संशोधन करावे लागतील. यामुळे याचा गैरवापर टाळला जाऊ शकतो. छायाचित्र क्षेत्र हे तसे पाहता दुर्लक्षित राहिले आहे. हे क्षेत्र फार मोठे असून भारताला या क्षेत्रात आपले योगदान वाढवण्याची गरजच आहे व संशोधन करण्याची गरजही आहे. एकविसाव्या शतकातही भारताला साहित्यासाठी उदा. कॅमेरे, लेन्सेस इतर गोष्टींसाठी जपान, रशिया, चायना, फ्रान्स व अमेरिकावर अवलंबून राहावे लागत आहे. मेड इन इंडियामध्ये या क्षेत्राने भरीव कामगिरी करून देशाच्या आर्थिक विकासात वाढ करण्याची गरज आहे. येणाऱ्या नवीन पिढीने शास्त्रज्ञांनी या क्षेत्रात मोठी उडी घेण्याची गरज आहे. छायाचित्र रेकॉर्ड म्हणून याकडे पाहिले गेलेले आहे. छायाचित्र टिपणे हे एक कौशल्य असून मनाला आनंद देणारी गोष्ट आहे. छायाचित्रामुळे माणसांच्या घडलेल्या घटनांचे छायाचित्रीकरण ठेवणे व त्यांचा आयुष्यभर आनंद घेणे हे छायाचित्राचे महत्त्व मानले गेले आहे. आपल्या पूर्वजांची छायाचित्रांमुळे ओळख समाजात चिरंतर ठेवता आली आहे. यामध्ये छायाचित्र लग्नाचे फोटो एवढे मर्यादित न राहता त्यामध्ये प्री वेडिंग, वेडिंग, सिनेमॅटिक, पोर्ट्रेट, कँडी असे क्षेत्र निर्माण झाले आहे. यामुळे कौशल्यवान छायाचित्रकारांना एक पर्वणीच म्हणावी लागेल. युवक स्पेसिलायझेशन करण्यास सुरुवात केली आहे. तसेच इंडस्ट्री छायाचित्रण, निसर्ग दृश्य छायाचित्रण, व्यक्तीचित्र छायाचित्रण, या क्षेत्राला मोठी क्रांती झाल्याचे दिसून येत आहे. अठराव्या शतकाच्या सरते शेवटी पिन होल कॅमेरापासून सुरुवात झालेली छायाचित्राची प्रगती आज एकविसाव्या शतकातल्या डिजिटल कॅमेराच्या पर्यंत येऊन पोहोचली आहे. हीच छायाचित्राची खरी ओळख.

**- केवल तिवारी,**
छायाचित्रकार - ९८८११ ३३११७